वर्णमुद्रा

# वर्णमुद्रा

इ–जर्नल
(मुद्रितप्रत, केवळ
खासगी वितरणासाठी)

अंक पंधरावा / नोव्हेंबर–डिसेंबर २०२३

किंमत : १५०/– देणगीमूल्य (मुद्रितप्रतीसाठी)



# अनुक्रमणिका


। मुखपृष्ठ ।
राजेंद्र आनंदराव पाटील (पारा)
। सुरुवातीचे काही शब्द।
मनोज सुरेंद्र पाठक
। पायरव आणि पडघम ।
अमोल विनायकराव देशमुख, शैलेंद्र मेहता, गणेश कनाटे, पाब्लो नेरुदा
। स्मरणसूक्त ।
मुग्धा देशपांडे
। चित्रे/ रेखाचित्रे ।
राजेंद्र आनंदराव पाटील (पारा)
। कथा ।
डॉ.स्मिता घैसास
शुभंकर पवार
। सहोदरांचा शोध ।
कॉन्स्टन्टिन कवाफीस – शैलेंद्र मेहता
। लेख/ललित लेख/टिपण ।
दीपक बोरगावे
शिरीष चिंधडे
अश्विनी अयाचित
। गंभीर किंवा गमतीदार।
पीएचडी : एक करणे – श्रीनिवास हेमाडे
लीना पांढरे यांची फेसबुक पोस्ट



। संपादन साहाय्य ।
नंदिनी देशमुख, शरद बिन्नोर, अभिषेक वाघमारे
। निर्मिती साहाय्य ।
उमा नाबर, महेश गवाणकर, भाग्यश्री बनहट्टी

# सुरुवातीचे काही शब्द

२०२० मध्ये प्रकाशन संस्थेचे मुखपत्र असावे, ह्या विचाराने उचल घेतली आणि इ जर्नल प्रकरणास सुरुवात झाली. त्यावर्षी उत्साहात सात अंक निघाले आणि त्या ऑनलाईन अंकांचा एकत्रित मुद्रित अंक 'वर्णमुद्रा २०२०' मित्रमैत्रिणी, सुहृदांना देता आला. पुढे २०२१ हे वर्ष कोरोनामुळे झाकोळले गेले, २०२२ मध्ये सुरुवातीला एक अंक काढला आणि पुढे काही जुळून आले नाही. २०२३ मध्ये नंदिनी देशमुख, शरद बिन्नोर आणि अभिषेक वाघमारे ह्या मित्रांची साथसंगत लाभली आणि इथवरचा प्रवास सहजपणे करता आला. ह्या तिघांसोबतच उमाताई नाबर, भाग्यश्री बनहट्टी आणि महेश गावणकर ह्यांचेही हात मदतीला असतातच हे कृतज्ञतेने नमूद करतो.

अंक काढणे म्हणजे काय असते? हे एकप्रकारचे शेअरिंग आहे. जे जे आपणांसि ठावे ते ते इतरांसि सांगावे! परंतु हे पूर्णपणे म्हणता येणार नाही. कारण अंकासाठी येणाऱ्या/मागविलेल्या साहित्याचे वाचन करताना लक्षात येते की अरेच्चा, हे तर आपल्याला सुद्धा माहिती नव्हतं की. असे आनंदाचे क्षण मागील अनेक अंकांमधून अनुभवता आले. विशेषतः 'स्मरणसूक्त' आणि 'सहोदरांचा शोध' ह्या दोन विभागातून ही गोष्ट ठळकपणे घडून आली.

अंकाचे इ स्वरूप हे वर्षानुवर्षे हा ठेवा जतन करून ठेवणारे आणि ग्लोबली उपलब्धता असणारे आहेच शिवाय मुद्रित स्वरूपाची चाह असणारे अनेक मित्र सुद्धा आहेतच, ज्यात एक मी स्वतःसुद्धा आहे.

२०२४ सुरू झाले आहे. एकेकदा विचार येतो की, हे किती दिवस–कशासाठी–कुणासाठी–का करायचे? पण माझी मलाच ही दोन उत्तरे आठवतात –

कला हा आपण स्वीकारलेला एक जीवनमार्ग असतो. एका अनामिक व प्रबळ ओढीने आपण त्याकडे ओढले म्हणा अथवा ढकलले जात असतो. या वाटेने जाणाऱ्या प्रत्येकालाच लौकिक यश मिळेल याची जशी खात्री देता येत नाही, तसेच वैयक्तिक समाधान मिळेल असेही नाही. पण ही ओढ इतकी प्रबळ असते की, पुढेपुढे तर या दोन्ही गोष्टीही अतिशय किरकोळ वाटू लागतात आणि त्याच वाटेने जात राहणे हीच अंतिम फुलफिलमेंट ठरते.

जी. ए. कुलकर्णी

'आपल्या अस्तित्वाच्या तुकड्यातुकड्यांचे
काम करीत भाषेच्या सडसडण्याचा आवाज
ऐकणे, याशिवाय दुसरे काहीही नव्हते करण्यासारखे.'

वसंत आबाजी डहाके

तेव्हा २०२४ मध्ये 'उद्या पुन्हा हाच खेळ' सुरू असेल.

**मनोज सुरेंद्र पाठक**

# कविता

अमोल विनायकराव देशमुख



## १. मर्जिखातर

अंजी राजी होते मधूनच शाळा बंद करायला
अन् राजी होते रानात घरात
घराचा डोलारा सांभाळण्यासाठी
लावायला हातभार

ती राजी होते म्हणेल त्या लफंडराशी
बांधायला सातही जन्माच्या गाठी

' नको बाबाला दुःख होईल '
म्हणून ती
बोलत नाई कुठलाच अपशब्द
' नको बाबाला राग येईल '
म्हणून ती
जात नाई चारचौघी मैत्रीणीना दोन शब्द बोलायला
' नको बाबाला काही वाटेल '
म्हणून ती
दाबत राहते तिच्या मनातील सात्विक इच्छा
' नको बाबाला वाईट वाटेल '
म्हणून ऐकते ती न पटणारी कोणतीही गोष्ट

ती केवळ आणि केवळ बापाच्या
मर्जिखातर
पोखरून पोखरून घेते
या अनंत विश्वात भेटणाऱ्या एकमेव
स्वत्रंत अस्तित्वाला

केवळ बापाच्या मर्जिखातर
ती दाबत असते तिच्या सर्व कळाझळा
केवळ बापाच्या मर्जिखातर
चालते ती निधड्या छातीने
बापाने दाखवलेल्या
तापलेल्या कोणत्याही मार्गाने

लागते ती एकदाची संसाराला
नी पुढे चालत राहते
मागच्याच वाटा
नवऱ्याच्या मर्जिखातर

दाबलेला कापूस सर्कण पेटावा
तसा तो घेत नाई थांबण्याचं नाव
तसं तिचं अस्तित्व टोटली
पेटलेलच असतं
जलमापासून

तिच्या मर्जिशिवाय....

## २. भाकर...

मारुतीच्या सप्त्याच्या सांगत्याची
पंगत द्याची म्हणून
शेशेरावच्या
माळोदात बसली बैकट
मारुती मंदिराच्या इश्वस्त मंडळातील
मिश्यावाल्या टोपीवाल्या पांढऱ्या कुर्त्यायच्या
मोटमोट्या लोकायची

सगळ्यायच्या इच्यारानं ठरलं मग
घरपरत
एकसे एक रुपये पट्टी आन
दोन थैल्या गहू नायतर एक डब्बा तेल

आन मंडळातील आजुन कोण किती देतय
आपापल्या मनानं चला बोला आता
असा म्हनला सखा तात्या
तसा शेशेरावनं चापला कुर्त्याचा पांढरा खिसा
आन काढले त्यातून
कडकडीत नोटायचे धा हजाराचे बंडलं

तितक्यात थरथररत
लटलट कापणारी
एक खळगुटी भिकारीन
आली माळोदासमोर
आन अडखळत आर्जव करीत बोलली
माय वाढ ग भाकरीचा टूकडा
नायतर दे चिल्लर रुपाय दोन रुपये
दोन दिस झाले पोटाला नाई टूकडा

तवा शेशेराव फिस्कुन मनला
चिल्लर नाई जा म्होरं
हे भिकारी बी आईन कामाच्या वक्तालाच
पदर पसरीतात

## ३. पांडूच्या बायकोची गोष्ट

धाग्याला धागा जोडून
पांडूची बायको शिवते फाटकी क्षणे
खोचून खाचून पदर
न खचता जोडते रूपायला रूपाय
म्हणतेही कशी
बाईऽऽ रुपाय नाई त उपाय नाई
अन् हौसेला म्हणते ओझे

सोपं नव्हतं त्यांना नशिबाला पटकी येऊन
घुस लागलेल्या घरावानी घराला घरघर लागल्यावर
पुन्हा उभं करणं नव्यानं हा परपंच साळसूदपणे
पण तिच्या जिद्दीपुढं ती चिडिछाप घरघर काय चीज

त्याच्यापासून ते दोन पाखरायपर्यंत
कोसळू देत नाही ती आत्मविश्वासाचा तटस्थ वड
लागू देते तिच्या साध्यासुध्या इच्छांना वळींबा

ती धीट आहे त्याच्याहून
आलेलं तुफान
घेते सामावून अक्षरशः पदरात

नीट आहे ती खूप
विस्कटलेल्या आयुष्याच्या पसाऱ्याला
क्षणात आवरायला

मुलांची होते गुरू
मैत्रीण त्याला समजून घ्यायला
होते घराची आनंदमय दिवाळी
होते पदर दुःख पुसायला

आलं संकट मातीत डीळ खुपसावी तसं सावरते
अन् होते छत घराचं वादळविजा पाऊस
थोपावयाला

तिच्यात असते एक घर
गणगोत सांभाळणारं
हिरवं सोनं देणारं आपट्याचं पानं असते ती
दोन्ही कडून जोडणारं

त्यांचा बैल वारला कसल्याशा आजाराने
अन् रान गेलं व्याजाच्या घशात
तेव्हा तिच्या खांद्यावर ठेवून त्याने डोके
कितीतरी वेळ लहान लेकरासारखा रडला तो
अन् तेव्हा ती सावरत म्हणाली त्याला
नका तुम्ही दुखवू स्वतःला
हे दिवस करणार नाहीत मुक्काम या घरात
पुन्हा करू उभा हा धूसर झालेला सवसार

सुखासुखी सावरता येणं शक्य नव्हतं हे सारं सारं
पांडूच्या बायकोला

## ४. स्तर

सावकार आप्पा शेठजी सावजी
यायच्या दुकानातून नेतात
धोंडू महादू हमीद गणपत किसन
करून उसनवारी उधारीवर
फवारणीचे औषदं बीबियानं
ठेवून उगवतीच्या कोंभावर लाखांशी भरोसा

फवारणी झाल्याव
गया शेशी मिरी निती
जोहरा परवीन मुन्नी करतात मजुरीनं खुरपणी
अन् मालकाच्या रेडिओवर ऐकतात
माधुरी उर्मिला करिश्मा ऐश्वर्या
दीपिका क्याटरीना अनुष्का यायचे गाणे
लता साधना आशा अलका यायच्या सुरेल आवाजात

घरी आल्यावर
सावकार बंटी मारवाडी आप्पा राजू दुकानदार
यायच्या दुकानावर करतात गर्दी
धापाच रुपयाचं घ्यायला पामतेल
लिहून खातेवहीवर
उद्याच्या जखमेचा हिसाब

बोगस निघाल्या बियानावर
आवळू शकत नाईत मूठ
त्या बलाढ्य हुकमतीवर
हे लोक
आपल्याला काय करायचं म्हणून
फाट्यावर मारतात नजर
कांत्राव गुरुजी उमराव तलाठी अजय पोपा
मनु ग्रामसेवक

अशा उतरंडींना हातभार लावतात
राजू सरपंच अनिल सभापती प्रकाश मामु अंकू म्हाराज

## ५. वळखणे

दूरवर असलेल्या कुण्यातरी
माणसाला जनावर डसलं
खूप हळहळला सखा तात्या
ऐकून ती खबरबात....

अजीज भंगारवाल्याच्या
पोरीला सोडून दिलं नवऱ्यानं
कुणाचं बी चांगलं व्हावं
कोनत्याबी लेकिबाळी नांदाव्या सुकानं
मनून
सुंदर वाऱ्यानं जोडले आभाळाला हात

दूषित पाण्यानं गल्लीतले

लेकरं बिमार पडले भरती केलं तेयला
इस्पितळात
खाटंवर आडवं झालेल्या लेकरांचे चित्र
डोळ्यात जाऊन

डोळे गढूळ झाले.... नाही दिसली त्यात दुसरी
कोणतीच प्रतिमा माझ्याही बाच्या

ही सारी वळखने मया जीती असल्याची...
गल्ली अजून नाई पडलं ढिल्ली
तुमच्या ग्लोबलायझेशनच्या विळख्यानं
യ

## शैलेंद्र मेहता



### एका रात्रीचे प्रवासी

थकलेले पांथस्थ विसावतात
उजळलेल्या सरायांमधून
आठवणींची तंतुवाद्ये छेडीत
आवारातील अश्वत्थ वृक्षाच्या
पानसळीच्या हाकेसरशी
झिळमिळत्या चंद्रप्रकाशात
चढत जाते झिंग
चेतवत दरेक रक्तपेशी
कवडशांची नक्षी
संपूर्ण देहावर कोरताना
अनाकलनीय नमुने
पूर्वसंचित जाते हरवून
नवीन अनुभूतीच्या डोहाळ्यात
रात्र चढत जाते तशी

उद्दीपित हिंदोळ्यावर झुलत
विविधरंगी भावनोत्कट उसासे
धुंदावलेले क्षण मोजता मोजता
क्लान्त पापण्या जडावतात
कोवळ्या किरणांच्या प्रतीक्षेत
दवबिंदूचे सडे निपचित
मैलाचे दगड मोजत
पांथस्थ रचतात मनसुबे
पुढील वाटचालीचे

## पवित्र उकिरड्यावरील प्रवचन

स्वच्छंद भुकेकंगाल चरताना
मायाबाजारातील उकिरड्यावर
क्षतविक्षत घड्यांतून
अखंड पुरवठ्याची खात्री देतात
पाणपोयांचे मुखत्यार
दानशूर कर्णाच्या पोथ्या वाचून
पापक्षालनाच्या आशेने

हिरमुसतात बऱ्याचदा चराऊ सांड
वाण टाकल्याच्या
पापभीरू पश्चातापात
ब्रह्मांडनीती संवर्धक
प्रथम जिगलो (gigolo)
येतो धावून हमखास
त्यांच्या भांबावलेल्या मेंदूंच्या मोक्षाला
करताक्षणी धावा
आश्वस्त भक्तांनी
उकळी आणण्यास
सर्जनशीलतेच्या पाणचट दुधाला

ज्याची मुरली सदैव तयार
शरणागतांना झुलविण्यास
ऑरगॅस्मिक आभासांच्या
भावनोत्कट हिंदोळ्यावर
जरी खोलवर गोंदली जाते
उकिरड्यावर चरणाऱ्याच्या
काळ्या-सावळ्या रापलेल्या त्वचेवर
रंग उडालेल्या मोरपीसांची
वाक्चतुर आदर्शवादाची नक्षी
साचेबद्ध नीरस पद्धतीने
जाणता अजाणता शतकानुशतके
प्रश्न विचारणाऱ्या
द्वाड - स्वैर खिल्लारांच्या नाकात
वेसण चढते पाप -पुण्याची
तर कधी ठेचले जातात वृषण
सार्वजनिक ठिकाणी

बधिरलेल्या संवेदना
अंधपणे
निव्वळ वहिवाट म्हणून
तसदी न घेता प्रश्न विचारण्याची
घेतात बांधून सनातनी घाण्याना
झापडे चढवून डोळ्यांवर
टाकतात ठरवून निकष
शीघ्रपतित सौंदर्यशास्त्राचे
भावविश्वे चटोर - तकलादू
उदंड कानाकोपऱ्यांतून

वासनाकांडाचे होता
गोंडस नामकरण कौतुकाने
गायला जातो
रासलीलेचा महिमा
साजरे करत
चमत्कारांचे दृष्टांत
स्किझोफ्रेनिक शेंदूरजडित
गावगल्ल्यांतले खुजे प्रेषित
मोठ्या उन्मादाने करतात सादर
धरणीकंप घडवण्याच्या नवोन्मेषाने
जुनाच नृत्य प्रकार
नवनवीन एतद्देशीय डगले चढवून

व्यापून टाकतो सारी जमीन
मायाबाजारातील कचऱ्याचा डोंगर

दुर्गंधीची सवय नसानसात भिनलेले
संभावितांचे घोळके मश्गुल
स्वतःच्या माकडचेष्टांना
आगामी ऑलिम्पिकमधे
स्पर्धात्मक क्रीडाप्रकाराचा दर्जा द्यावा
यासाठी आक्रमक आंदोलन उभारण्याच्या
पोकळ वल्गना करत
चव्हाट्या-चव्हाट्यावर
स्वतःचे अंडकोष
अलगद लपवून
अनुदानित राजमान्य कवचाखाली

## निष्पर्ण वस्ती

बसलेले काही फतकल मारुन
बुडाखाली कोरडी जागा पाहून
ठिगळे लावून आकाश जोडण्याच्या आशेने
चमत्कारांवर भरोसा राखून
गाठोडी वाहत माथ्यावर
चिंध्या झालेल्या जीवनाची
तर काही
स्मशानातील राखेत
स्वतःच्याच अस्थी शोधत
आपल्याच क्रोधाग्नीत शाबूत राहिलेल्या
काहींचे मनसुबे गेलेले वाहून
विकासाच्या नाल्यांतून
तरी गळा फुटेपर्यंत मंत्र भुंकत
सदेह स्वर्गगमनाची कल्पना करत
जीव सोडतात साचक्या पाण्यात
सडून जातात देह त्यांचे
गावकुसाबाहेरील शवागारातून
रिमिक्सच्या कोलाहलात
धरतात काही ठेका
आदिबंध चाचपडत
मेंदूतील उरल्यासुरल्या पेशींवर ताण देत
विस्मरणाच्या ढिगाऱ्याखालील
अवशेष शोधत
गळे कापले गेले तरी
हातपाय झाडत
मी
नागडा-उघडा देह ओढत
अनवाणी तापलेल्या रस्त्यावर
मृगजळाचा पाठलाग करता करता
होईल का माझी वाफ
तरंगत मधल्यामध्ये
त्रिशंकू अवस्थेसारखी ?

गणेश कनाटे



## १. मोझार्टचं रेक्वियम
## अ. आपलं रेक्वियम आपणच लिहायला पाहिजे

मृत्यूने मोझार्टच्या गळ्यात आपले दोन्ही हात टाकले
त्याच्या कपाळाचं एक दीर्घ चुंबन घेतलं
जायची वेळ झाल्याचं त्याच्या आत्म्याच्या कानात सांगितलं
शोकसभेत वाजवायचं रेक्वियम लिहून झालं नव्हतं
मोझार्टनेही मृत्यूच्या हातांचे दीर्घ चुंबन घेतलं
जरा थांब म्हणाला नि रेक्वियम लिहून काढलं
आपलं रेक्वियम आपणच लिहायला पाहिजे
मोझार्टने मृत्यूच्या कानात सांगितलं
मग मोझार्ट मृत्यूच्या हातात हात देऊन निघून गेला

## ब. मारिया, मोझार्ट आणि रेक्वियम

मारिया दुएनास मोझार्टचं रेक्वियम वाजवत होती
व्हायोलिन वाजवता वाजवता बो ची एक तार तुटली
मारियाच्या डोळ्यांत एक रक्ताळ रेष उमटली
मारियाच्या डोळ्यांपुढे रेक्वियमचे एक नोटेशन हललं
ते हललेले नोटेशन तिला सोडून कुणालाही दिसलं नाही
तरीही ओल्या ओंजळीत चेहरा लपवून मारिया खूप रडली
मध्येच हात आकाशाकडे नेऊन मोझार्टची क्षमा मागितली
मोझार्ट मारियाला म्हणाला,
तुटलेली तार जगाला दिसली
हललेले नोटेशन तुला दिसलं
तुझ्या हृदयात एक कळ उठली
ती कळ फक्त मलाच दिसली
हेच खरं रेक्वियम असतं
कळलं? वेडी कुठली!
असं म्हणून मोझार्ट आकाशात निघून गेला

रेक्वियम –
* ख्रिस्ती लोक मृतात्म्यास शांती लाभावी म्हणून चर्चमध्ये विशेष प्रार्थनासभा आयोजित करतात. त्या सभेत वाजविण्यासाठी विशेष सांगीतिक रचना तयार केल्या जातात. त्या प्रार्थना सभांना आणि त्या रचनांनाही रेक्वियम म्हणतात.

## २. कुणाचीही, कुणाकडेही तक्रार केली नाही एवढंच

आयुष्यभर
कितीतरी दुखणी लपवून ठेवली
काही छातीच्या तळघरात
काही ओठांच्या कोठडीत
पण कधीही
तळघरात कुणाला शिरू दिलं नाही
कोठडीचं कुलूप काही उघडलं नाही
एक दिवस

खूप वेळ अलार्म वाजत राहिला
त्यांनी कूस बदललीच नाही
साधारणपणे
सगळेच म्हणतात तसे
ते शांतपणे निघून गेले
ते काय म्हणाले असते?
कुणास ठाऊक; नाही?
फक्त त्यांनी
कशाचीही, कुणाचीही, कुणाकडेही
तक्रार केली नाही
एवढंच

## ३. आतड्यांसोबत पिळवटलेला मी

दिवसभर गोळा करतो
हृदयाच्या ओंजळीत
उन्हाच्या काचेचे तुकडे
संध्याकाळ होता होता
रक्तबंबाळ होते ओंजळ
समुद्राकाठी रेस्तराँमध्ये
एका कोपऱ्यात जाऊन
उन्हाच्या तुकड्यांना म्हणतो
काचेचे मणी व्हा रे
माझी दया येते तुकड्यांना
तुकड्यांचे मणी होतात
मी दाभण खुपसतो मण्यांत
आतड्यांचा दोरा करतो
एकेक मणी ओवत जातो
शेवटी आतड्यांना गाठ मारतो
स्फटिकाची नसते खरी
ती मण्यांची माळ असते
पण
माळेत मण्यांसोबत असते
– हृदयाची रक्तबंबाळ ओंजळ
– उन्हाचे तुकडे
– समुद्राची खारट, दमट हवा
– पिळवटलेले आतडे
आणि
– आतड्यांसोबत पिळवटलेला मी

## पाब्लो नेरुदा



### १. हा आहे साधेपणा

स्तब्ध आहे ताकद (सांगतात मला झाडं)
आणि खोली (मुळं सांगतात मला)
आणि शुद्धता (पीठ मला सांगतं)
कुणी झाड नाही म्हणालं मला
''मी आहे सगळ्यात उंच ''
कुण्या मुळानं नाही म्हटलं मला,
''मी आलोय अगदी खोलातून''
आणि भाकरी म्हणाली नाही कधी :
''काहीच नाहीये भाकरीसारखं''

### २. थांब गे धरित्री

परतून ये माझ्याकडे, हे सूर्या
माझ्या गमावलेल्या नशिबापाशी
परत कर मला प्राचीन जंगलातील पाऊस
परत कर तो सुगंध आणि त्या तलवारी
ज्या पडल्या होत्या आकाशातून
पाषाण आणि कुरणांतील निर्जन शांतता
नदीकाठची ओल देवदारांचा गंध
ती जिवंत हवा जसं असतं जिवंत मन
उंच *अराउकारियाच्या
बेचैन दाट झाडीमध्ये धडकणारं

हे धरित्री, परत कर मला तुझी ती विशुद्ध देन
स्तब्धतेचे ते मनोरे जे उभे राहिले होते
आपल्या मुळांच्या महान खोलपणातून :
तिथे परतून जाईन म्हणतो
तो होण्यासाठी जो आज मी नाहीये
परत जाऊन पुन्हा तितक्या आंतून शिकण्यासाठी
भलेही त्या नैसर्गिक परिस्थितीत

मी तगेल न तगेल : हरकत नाही
पुन्हा तो पाषाण व्हायचं, तो काळाकभिन्न पाषाण
तो विशुद्ध दगड, नदी वाहून नेत असते ज्याला तिच्या धारेसोबत.

* चिली देशात आढळणारा एक वृक्ष

### ३) तुझ्यात पृथ्वी

छोटासा गुलाब
गुलाब छोटासा,
कधी-कधी तर
नग्न आणि इवलीशी इतकी
की वाटायचं एकाच मुठीत
मावून जाशील तू
असं बंद करून टाकीन मुठीत तुला
आणि नेईन तोंडापर्यंत माझ्या
पण
अचानकच एक दिवस
माझे पाय स्पर्श करू लागले
तुझ्या पायांना
आणि माझे ओठ तुझ्या ओठांना,
तू मोठी झालीयेस आता,
वर येत आहेत तुझे खांदे दोन पहाडच यावेत
वर असे
तुझी स्तनं इतस्ततः रुळतात माझ्या छातीवर आता
माझे हात पोचतात महत्प्रयासाने कवेत

घेण्यासाठी पातळशा चंद्रकोरीसारख्या तुझ्या कटीला :
उत्फुल्ल झाली आहेस तू प्रेमात, जसं उचंबळून येतं समुद्राचं पाणी :

माझे डोळे जेमतेम मोजतात आकाशाचा
आणखी अधिक असीम विस्तार
आणि झुकवतो मी मला तुझ्यावर
तुझ्यातल्या पृथ्वीचं चुंबन घेण्यासाठी.
ଓଃ





# व्यंगचित्रे

## मुग्धा देशपांडे



गंभीर स्वभाव असलेल्या मला व्यंगचित्रं सुचू शकतील, रेखाटावी वाटतील असं कधीही वाटलं नव्हतं ! पण लहानपणापासून व्यंगचित्र पहायला, वाचायला आवडायचीच. तसं विनोदी कार्यक्रम, विनोदी सिनेमे याचंही वावडं नव्हतं. पण कल जास्त करून गंभीरतेकडेच! मासिकातली, वर्तमानपत्रातील व्यंगचित्र पाहता पाहता काही व्यंगचित्रकारांची चित्रं आवडू लागली आणि लक्षात राहू लागली. शि. द. फडणीस, वसंत सरवटे, आर. के. लक्ष्मण, प्रभाकर भाटलेकर, मारिओ मिरांडा यांची व्यंगचित्र पाहायची. व्यंगचित्रांसंबधी लेख वाचायचे.

जसं जसं वय वाढत गेलं तशी तशी माणसाच्या वागण्यातली, समाजातली विसंगती दिसू लागली, खुपू लागली आणि चीड चीड होऊ लागली. विशेषत: स्त्रियांवर होणाऱ्या साध्या साध्या अन्यायामुळे! बायांनी अगदी पेपर वाचायचा तो सुद्धा दुपारी सगळी कामं आवरल्यावर भाजी निवडता निवडता. पेपरही बिचारा आपला ताठ, नवेपणा सोडून मरगळलेला. बाईसारखाच! ही चीड चीड मी चार-दोन व्यंगचित्रांतून व्यक्त केली. आणि त्या उमेदीच्या, उत्साहाच्या वयात 'मिळून साऱ्याजणी'कडे पाठवली. बहुधा त्यातली एक, दोन विद्याताई (बाळ) यांनी मासिकात छापली. विद्याताईंनी मध्यवर्ती स्त्री असलेल्या उपहासात्मक व्यंगचित्रांचे एक पुस्तकही मला दिले. पण नंतर खंड



पडला.

त्यावेळचे ‘स्त्री’, ‘किर्लोस्कर’चे संपादक ह. मो. मराठे म्हणाले, तुमची कल्पना आणि व्यंगचित्रकार चित्र करतील. दोनचार कल्पना पाठवल्या, पण मनाला पटत नव्हतं, नंतरचे संपादक गोर्ले असताना दोन-चार व्यंगचित्रं प्रसिद्ध झाली; पण मला माझी शैली सापडत नव्हती. व्यंगचित्रावरची पुस्तकं विकत घेत होते. जिथून लेख वाचायला मिळत होते ते आसुसून वाचतच होते. (लेखक मधुकर धर्मापुरीकर यातले ठळक नाव.) त्याबरोबरच माझ्या मनात कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, रोबोटिक ज्या ज्या कल्पना





उगवत होत्या, त्या लिहीत/रेखाटत राहिले. व्यंगचित्रांचे विषय आणि कशी रेखाटणे करावी, याच्या विचारात डायरी भरली. डायऱ्या या चित्रांनी भरत गेल्या, तशी मला व्यंगचित्रातली गंमत कळत गेली. अर्कचित्रं काढायचा नाद त्याचवेळी लागला. मजा येत गेली. खूप व्यंगचित्रं मला गवसलेल्या शैलीत काढत राहिले; पण पाठवली नाहीत.

हे सगळं मी का करत होते ते कळत नव्हतं. माझ्या आनंदासाठी करत होते की, ही माझ्या अभिव्यक्तीची गरज होती!

नंतर इतर गोष्टींकडे मन वळल्यामुळे डायरी बाजूला पडली. काल ‘वर्णमुद्रा’मधील ठोकळांच्या व्यंगचित्रावरचा लेख वाचला आणि पुन्हा त्या नादानं पछाडलंय. काही जुन्या आणि काही नव्या व्यंगचित्रं/अर्कचित्रांनी मनात ठाण मांडायला सुरुवात केलीय. ...



# समानं वृक्षं परिषस्वजाते।

## डॉ. स्मिता घैसास

'अभिमान' बंगल्याचं बॅकयार्ड तरुणाईनं फुलून गेलं होतं. दरवर्षीच्या प्रथेनुसार 'AIConic' मध्ये नव्यानं रुजू झालेले, इंटर्न्स, शिवाय वेगवेगळ्या नामांकित कॉलेज आणि युनिव्हर्सिटीजमधील AIConic Hack--l Athon चे विजेते, आणि सगळा ऑफिस स्टाफ यांच्यासाठी आयोजित केलेल्या बार्बेक्यू डिनरमध्ये कंपनीचा मॅनेजिंग डिरेक्टर स्वतः समीर कारखानीस ग्रिलपाशी उभा राहून बर्गर्स, पनीर क्यूब्ज़, बेबी पोटेटोज, चिकन् लेग्ज उलटत, परतवत, निखारे फुलवत जणू कुठल्याशा अदृश्य स्टेजवर 'परफॉर्म' करत होता!

'सगळं किती अमेरिकनाईज्ड असावं लागतं याला...' वल्लरी, त्याची पत्नी आणि –खउेपळल ची संस्थापक सीईओ स्वीमिंगपूल पलीकडून त्याच्या त्या परफॉर्मन्सकडे नजर टाकत स्वतःशीच हसत म्हणाली. केटरर्सची अक्षरशः फौज दिमतीला असली तरी स्वतः हातात ग्लोव्हज् चढवून बार्बेक्यू ग्रिलजवळ घामेजत उभ्या असलेल्या समीरला त्याच्या "CCC लुक"वरून ती नेहमी चिडवत असे. Carefully Cultivated Casual look!! बुद्धिमत्ता, व्यवसायातील चातुर्य, रिस्क घेण्याची धमक या सगळ्याबरोबर समीरच्या स्वभावात असलेला नाटकीपणा हा त्या दोघांतील संवादाचा आणि विनोदाचा विषय होता. वल्लरी त्याबाबतीत अगदीच विरुद्ध स्वभावाची. विषयाचं ज्ञान, कर्तृत्व यात कमी नसली तरी प्रसिद्धी, दिखाऊपणापासून किंचित दूर राहणारी.

हा सगळा सेटअप पाहून गावाकडून या नोकरीनिमित्त शहरात आलेले आणखीनच अंग चोरून उभे आहेत... त्यांना झगमगाट दाखवून आधी intimidate करायचं, आणि मग ice-breaking साठी कुठल्यातरी सराशी खेळायला लावायच्या! वल्लरी विचार करत होती. ''समीर, आपण या वर्षी बार्बेक्यूपेक्षा जरा साध्या वातावरणात नुसतं डिनर अरेंज करूया का? कितीतरी नवे employees मराठवाडा, विदर्भाकडचे लहान गावातले आहेत! त्यांना नीट जेवताही येत नाही तो सगळा तामझाम पाहून...'' तिनं सुचवलं होतं.

''म्हणजे काय? पुण्यप्रसाद हॉलमध्ये पंगत बसवायची का? प्लॅस्टिकच्या लाल खुर्च्या आणि डगमगणारी टेबलं? They need an introduction to different possibilities, lifestyles! कम्फर्ट झोनमधून बाहेर काढणं हाही उद्देश आहेच ना आपला? नाही का? होऊ देत ना थोडे uncomfortable!'' समीर बेफिकिरीनं म्हणाला होता.

हे संभाषण आठवत ती विचारमग्न असतानाच राज पाटील त्याच्या छोट्या मुलीला घेऊन लॉनवर आला. ''मॅडम, ही सिद्धी!'' वल्लरीनं कौतुकानं त्या छोटीच्या गालाला हात लावत विचारलं,

''अरे, पण अंकिता कुठेय?''

''ती नंतर येणार आहे मॅडम ! आईला घेऊन डॉक्टरकडे जायचं होतं.'' राज म्हणाला. तीन वर्षांपूर्वी आधीच्या कंपनीतून तो AIConic मध्ये जॉईन झाला होता. तो आणि अंकिता खरं तर मिहिकाबरोबरचेच... हे दोघे कसे लग्न करून छान सेटल झाले. छोटी किती गोड आहे... मिहिका मात्र अजूनही आपलं म्हणणं सीरियसली घेतच नाही. किती prospective मुलं सुचवली तरी हिचं आपलं... तितक्यात तिची तंद्री भंग करत राज म्हणाला,

‘‘मिहिका आहे ना मॅडम अजून? जरा तिच्याशी गप्पा मारतो! नाही रे तिला सुट्टी नाही मिळाली. परवाच गेली परत. आता पॅसाडेनामध्ये नवीन पोझिशन मिळालीये. रिसर्च असोसिएट. ती जाईपर्यंत आम्हाला वेळच नव्हता, म्हणून तर या वर्षी उशीर झाला आपल्या डिनरला...’’

‘‘नवीन मंडळी आणि इन्टर्न्स येऊन महिना झाला, नाही का?’’ वल्लरी म्हणाली. आणि

‘‘अरे राज, ती नवीन मुलं बघ. कुणात मिसळत नाहीयेत. जरा त्यांना बोलतं कर!’’

‘‘हो मॅडम, बघतोच एकेकाकडे!’’ राज हसत म्हणाला, आणि वल्लरी निश्चिंत झाली. हा सगळं छान मॅनेज करेल...

अजून दहाजण तरी परिवारासहित येणं अपेक्षित होतं. ते सगळे जमायच्या आधी शांतपणे बेडरूममध्ये बसून चहा घ्यावा असा विचार करत ती पायऱ्या चढत आत किचनमध्ये गेली, आणि नेहमीचा डीटॉक्स टी घेऊन वर बेडरूमकडे निघाली. लॅन्डिंगवर पोचताच तिला बेडरूमचं दार किंचित उघडलेलं दिसलं. आत शिरून पाहते, तर तिथे आरशासमोर उभी राहून विदिशा मोडक स्वतःचे केस सारखे करत होती.

‘‘विदिशा? हे काय? इथे?’’ चमकून वल्लरी उद्गारली.

‘‘अं... ते खाली लॉनजवळच्या बाथरूम्समध्ये सगळे जात होते ना! मग मी इथे आले!’’

‘‘अगं, खालच्या मजल्यावर आहे की बाथरूम!’’ वैताग लपवत वल्लरी म्हणाली,

‘‘हो... माझ्या लक्षात नाही आलं...’’ विदिशा तिथून सटकत पुटपुटली.

‘‘आगाऊ...’’ वल्लरी संतापली होती. विदिशा तिच्या बालमैत्रिणीची संयुक्ताची मुलगी. लग्नानंतर तब्बल बारा वर्षांनी जन्मलेली. हिच्या जन्मानंतर संयुक्ता एका महिन्यातच दगावली. आईविना वाढलेली मुलगी. आजी-आजोबा जवळच लॉ कॉलेज रोडवर राहायचे. त्यांच्यामुळे शालेय शिक्षण, बारावी पार पडली आता इंजिनिअरिंगला ॲडमिशन घेतली होती. हॅकथॉनमध्ये भाग घेत पहिली आल्यामुळे तिच्यापेक्षा सीनियर वर्गात असलेल्यांबरोबर तिला AIConic ची paid इन्टर्नशिप मिळाली होती. सुपर टॅलंटेड! बुद्धीची चमक दर्शवणारा चेहरा, सुरेख फीचर्स संयुक्तासारखेच, सणसणीत उंची, फिट्नेस सगळ्याच गोष्टी तिचा कॉन्फिडन्स वाढवणाऱ्या! संयुक्ता गेली तेव्हा वल्लरी न आर्बर, मिशिगनमध्ये होती. समीरला त्याच सुमारास एका एक्झिक्युटिव्ह M.B.A. प्रोग्रॅमसाठी त्याच्या कंपनीनं स्पॉन्सर केलं होतं. तो एका वर्षासाठी भारतात बेंगलोरला आला होता. स्वतःची नोकरी, मिहिकाची शाळा यामुळे वल्लरी बेंगलोरला येऊ शकली नव्हती. समीरला यू.एस.मध्येही M.B.A. करता आलं असतं, पण भारतातल्या काही संधी त्याला चाचपून पाहायच्या होत्या. हेड ऑफिस यू.एस.मध्ये आणि शाखा भारतात हे मॉडेल फक्त मोठ्याच नाही, तर स्मॉल ॲन्ड मीडियम म्हणतात तशा एखाद्या कंपनीलाही शक्य होईल, असं वातावरण निर्माण होत होतं. वल्लरीनं हेल्थकेअरसाठी जे सॉफ्टवेअर डेव्हलप केलं होतं, ते तर यू.एस.मधील मेडिकल इन्शुरन्स आणि तत्संबंधीचे किचकट कायदे पाहता भारतात डिप्लॉय करणं जास्त व्यावहारिक होतं. त्यानुसार भारतात नेटवर्किंग करणं समीरला गरजेचं वाटलं होतं. Heal Connect हे सॉफ्टवेअर रुग्णाच्या तक्रारीनुसार त्या त्या गावातील लोकेशन्समधले डॉक्टर्स सुचवत असे. त्याकाळी ही आता साधीशी वाटणारी सर्व्हिससुद्धा नावीन्यपूर्णच होती. पण अशी modest सुरुवात झालेला तो छोटा व्यवसाय हळूहळू पार मेडिकल टूरिझमपर्यंत जाऊन पोचला होता. मिडल ईस्ट, ईस्ट युरोप, आफ्रिका अशा देशातील रुग्णांना भारतातील उत्तम आणि किफायतशीर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, त्यांच्या नातेवाइकांची राहण्याची सोय, हॉस्पिटलमधे ने-आण, ट्रीटमेंटनंतरचं रिलॅक्सेशन, आरामाची व्यवस्था इथवर सगळ्या सेवा आता Heal Connect वापरून बुक करता येत असत. त्यायोगे डॉक्टर्स, मोठमोठी स्पेशलिटी हॉस्पिटल्स, हॉटेल्स, लॉजिस्टिक्स, ट्रॅव्हल अशा कित्येक सर्व्हिसेसचं नेटवर्क तयार झालं होतं. या व्यवसायात स्थिरता, संपन्नता येतेय, तोच वल्लरीला MasterStok या ट्रेडिंग सॉफ्टवेअरची संकल्पना सुचली होती.

आर्टिफिशियल इंटलिजन्स हा प्रकार फॅशनेबल आणि buzz word होण्याच्या दशकभर आधी तिनं आणि तिच्या खास निवडक टीमनं data -driven decision making वापरून हे सॉफ्टवेअर डेव्हलप केलं होतं. MasterStok चा डेमो पहाताक्षणी समीरच्या सुपीक डोक्यातून अनेक महत्त्वाकांक्षी योजना ओसंडून वाहू लागल्या होत्या. MasterStok मध्ये अंतर्भूत असलेल्या Real time decision making मुळे शेअर्सच्या किंमती वाढताच क्षणार्धात ते विकून नफा मिळवणं शक्य होतं. निरनिराळे सिनॅरिओज् टेस्ट करताना लक्षात आले आवश्यक ते इन्फ्रास्ट्रक्चर उभं करणं, डायरेक्ट मार्केट ॲक्सेससाठीच्या कायद्यांची माहिती करून घेणं, कस्टमर्सना अशा ऑटोमेटेड ट्रेडिंगबद्दल माहिती देऊन आश्वस्त करणं हे सगळं त्यानं उत्साहानं, आणि ज्या धडाडीनं खांद्यावर पेललं त्याला तोड नव्हती. यानंतर AIConic असं नवं नामकरण होत स्थापन झालेल्या उद्योगानं हेल्थकेअर सेक्टरपलीकडे वेगानं झेप घेतली होती. वल्लरीनं हेल्थकेअर स्वतःकडे ठेवत MasterStok बहुतांशी समीर आणि त्याच्या मार्केटिंग टीमवर सोपवून टाकलं होती. बघताबघता सेनापती बापट रस्त्यावरील छोटं ऑफिस अपुरं पडू लागल्यानं पुणे-मुंबई रस्त्यालगत सहा मजली ऑफिसची बिल्डिंग दिमाखात उभी राहिली होती. समीरच्या परिश्रमांनी AIConic या नावाला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली, हे मान्य करताना त्याच्याबद्दल अभिमान वाटला, तरी कुठेतरी त्याच्या वेगाची तिला किंचित भीतीही वाटत असे...

''वल्लरीऽऽ, जरा खाली ये पटकन् PLEASE!!'' समीरची हाक ऐक येताच वल्लरी खडबडून जागी झाल्यासारखी उठून उभी राहिली. कपातला डिटॉक्स चहा कधीच गार होऊन गेला होता. विदिशाचा अगोचरपणा आठवून तिची नजर पुन्हा ड्रेसिंग टेबलकडे गेली. तिचा हेअरब्रश खाली पडला होता. उचलून वर ठेवताना त्यात तीन-चार पिंगट लांब केस दिसले. विदिशा! Really... किती उर्मट आहे ही मुलगी... माझा हेअरब्रश वापरला?

समीरनं पुन्हा एकदा हाक मारल्यावर ती घाईनं पायऱ्या उतरून बॅकयार्डमधील लॉनवर पोचली.

''We have a problem!'' समीर म्हणाला. तिच्या प्रश्नार्थक चेहऱ्याला उत्तर म्हणून त्यानं डावीकडे मान वळवत इशारा केला. बागेतून स्वीमिंगपूलकडे जाणाऱ्या कॉरिडॉरमध्ये अविनाश मोडक, विदिशाचे बाबा उभे होते. तोल सांभाळण्यासाठी त्यांनी गुलमोहराच्या खोडाचा आधार घेतला असला तरी तांबारलेले डोळे, आणि अडखळणारी जीभ त्यांची 'तर्र' अवस्था स्पष्ट करत होती. सिक्युरिटीला बोलावत वल्लरीनं त्यांना घरात घेऊन जायला सुचवलं.

''हा कशाला आला इथे?'' समीर करवादला.

''मी नाही बोलावलं. बघते, काय म्हणतोय!'' वल्लरीनं वैतागत उत्तर दिलं.

गेले काही महिने अविनाश मोडक भेटीसाठी तिला वेळ मागत होता. 'महत्त्वाचं बोलायचंय!' यापलीकडे कारण न देता सततचा तगादा लावल्यासारखा दर आठवड्यात फोन यायचा. वल्लरीच्या मनात अविनाशबद्दल आकस होता. संयुक्ताच्या मृत्यूनंतर विदिशाची जबाबदारी पूर्णतः संयुक्ताच्या आईवडिलांवर ढकलून हा माणूस व्यसनाधीन झाला होता. कॉलेजमध्ये स्कॉलर म्हणून ओळखला जाणाऱ्या अविनाशची ओळख आता दारुड्या, निरुपयोगी अशा विशेषणांनी होत असे. संयुक्ताच्या आईवडिलांनी त्याच्या घरी येण्यावर बंदी घातल्यापासून अधूनमधून त्यांच्या दारात उभा राहून मुलीवर हक्क सांगत तमाशा करण्यापर्यंत अविनाशची मजल गेली होती.

''आता इथे काय गोंधळ घालायचाय याला...'' लिव्हिंगरूममध्ये शिरत वल्लरी स्वतःशीच म्हणाली... सिक्युरिटीवर तैनात असलेल्या नीलेशनं अविनाशला सोफ्यावर बसवलं होतं.

''आज स... सगळ्यांना... फॅमिलीला बो.. बोलावलं ना! म्हणून आलो!'' अविनाश अडखळत म्हणाला, ''विदिशा मुलगी ना माझी? मग !! कशी हुशार आहे!''

आवाजात संताप न येऊ न देता वल्लरी म्हणाली, ''काय काम होतं? वेळ नाही जास्त मला!''

''कधीच नसतो! कॉलेजमध्येपण माझ्याकडे पाहायला तुला वेळ नव्हता! आतापण नाही!'' हसतहसत अविनाश म्हणाला. वल्लरी त्याच्या अवस्थेकडे पाहतच राहिली.

''मुद्द्याचं बो.. बो लतो... विदिशाला यू.एस.मध्ये जायचंय इंजिनियरिंगला.. तू पैसे देशील? तिची मावशीच ना तू! मला घर विकावं लागेल एवढा खर्च करायचा तर...''

''ती हुशार आहे. सहज स्कॉलरशिप मिळवेल. बोलू आपण नंतर.'' स्वयंपाकघराकडे बघत वल्लरीनं हाक मारली,

''सुनंदाताई, यांना कॉफी द्या!''

''ना... नाहींऽऽऽ कॉफी नको. समीरला सांग. मला ड्रिंक ऑफर कर, म्हणावं! साला बोलत पण नाय माझ्याशी! बार आहे ना मागे? मी चाललो...!'' अविनाश उठत म्हणाला. वल्लरीचा संयम संपत चालला होता.

''इथे बस. नाही तर घरी जा! मी ड्रायव्हरला सांगते.'' ती निक्षून म्हणाली.

''नाही जात घरी...'' डोळे मिटत अविनाश म्हणाला. ''तुला काऽऽही माहित नै... हो ना?'' कपाळावर किंचित आठ्या घालत वल्लरी थबकली.

''काय? विदिशा समीरचीच मुलगी...'' दात विचकत अविनाश म्हणाला. ''तिचा हक्कच आहे पैशावर त्याच्या! ''

''Out! आत्ता नीघ. काय बरळतोस शुद्धीवर आहेस?'' वल्लरी खेकसली.

''खरंच... तो सारखा यायचा घरी... संयुक्तापण... तिलाही आवडायचा... बघ हवं तर घे खात्री करून... पण तिला स्पॉन्सर कर... विदिशा B.S. तिथे करणार म्हणते... पोस्ट ग्रॅज्यएशनपर्यंत वाट नाही बघायची तिला... मी कु... कुठून देऊ पैसा...?''

पुढचं काही वल्लरी ऐकू येईनासं झालं. कुणीतरी अचानक कानफटात दिल्यावर जशा झिणझिण्या येतील तसं काहीतरी होत होतं. मागे लॉनवर संगीताचे सूर आणि त्यावर ठेका धरत जल्लोश करणारे आवाज... मायक्रोफोनवरून समीरच्या घोषणा... तिला तिच्या नावाचा पुकार ऐकू आला. 'I call upon our CEO ...' ती जवळजवळ धावत बाहेर पडली. डिनर सुरू करण्यापूर्वी Hack-AI- thon च्या विजेत्यांना पुरस्कार आणि मानचिन्हं दिले जात होते. आजूबाजूला दरवळणाऱ्या परफ्युम्सच्या सुगंधात बार्बेक्यू आणि इतर बफेचे दरवळ मिसळत होते. स्टेजवरून एकेकाला सन्मानित करत हसताना वल्लरीचा जीव घुसमटत होता. 'Our youngest winner...' म्हणताच विदिशा ड्रेस आणि केस उडवत स्टेजवर पोचली तेव्हा एक क्षण वल्लरी थिजून गेली. हातातील करंडक विदिशाला द्यायला इतका वेळ का लागतोय, म्हणून सगळे जरा गोंधळल्यासारखे तिच्याकडे पाहत होते.

''Let's give everyone a big hand!'' म्हणत समीरनं टाळ्या वाजवत वेळ निभावून नेली. फोटो सेशन, डिनर कसं यंत्रवत पार पडलं तिला कळलं नाही. अविनाशच्या ज्या बरळण्यानं तिची शुद्ध हरपल्यासारखी झाली होती, त्यावर समीरशी कधी आणि कसं बोलायचं हा मोठाच प्रश्न होता. उद्या दिवसभर एकामागोमाग मीटिंग्ज... आणि परवा वाराणसी विद्यापीठात होणाऱ्या Innovation Challenge साठीचा प्रवास! डोक भणभणून बधीर झालं होतं. पण शेवटी थकव्यानं ताणावर मात केली, आणि ती झोपेच्या आधीन झाली.

सकाळी जाग यायच्या आधीच समीर उठून जॉगिंगसाठी गेला होता. ठणकणारं डोकं चाचपताना तिला कालची संध्याकाळ आठवली. उठून बसत तिनं फोनकडे नजर टाकली. फारसा उशीर झाला नव्हता. शिवाय आज जवळच्या ऑफिसमध्ये जायचं होतं. हायवेची गर्दी सहन करावी लागणार नव्हती.

ऑडिटरनं आजची मीटिंग पुढे ढकलल्याचा मेसेज दिसल्यावर तिला किंचित हायसं वाटलं. ''Thank God for small favors...'' तंद्रीतच ब्रेकफास्ट आवरून ती कारमध्ये बसली. पहिल्या मीटिंगच्या विषयावर लक्ष केंद्रित करत मनाशी काही नोंदी करता●करता ड्रायव्हरनं ऑफिसच्या गेटमधून गाडी आत वळवल्याचं तिच्या ध्यानात आलं.

पहिली मीटिंग संपल्यावर सेक्रेटरीला फोन करून चहा मागवताना तिला किंचित गलबला ऐक आला. दुर्लक्ष करत तिनं डोळे मिटून हेडरेस्टवर डोकं टेकवलं, तशी अनेक विचारचक्रांनी वेग घेतला. चहा घेऊन येणाऱ्या प्यूननं दारावर हलकी टकटक करून आत प्रवेश केला, तसे गश्मीर, म्हणजे तिचा सेक्रेटरी, आणि विदिशा या दोघांचे तापलेले आवाज ऐकू आले. चहाचा घोट घेतेय तोच दार जोरात ढकलून विदिशा आणि तिच्या मागोमाग गश्मीर आत आले.

''मॅडम, मी सांगितलं, तुम्ही बोलावल्याशिवाय कुणी इन्टर्न येत नाही तुम्हाला भेटायला म्हणून! या ऐकतच नाहीत,●पाहा!'' गश्मीर चाचरत म्हणाला.

''ही इमर्जन्सी आहे. I have to talk to you!'' विदिशा बेदरकारपणे म्हणाली.

गश्मीरला खुणेनंच 'It's Ok' म्हणत तिनं विदिशाकडे मोर्चा वळवला.

''तुला काही मॅनर्स? ही पद्धत आहे वागायची?'' वरकरणी अधिकारवाणीनं बोलत असली, तरी काल अविनाशनं निर्माण केलेलं संशयाचं भूत वल्लरीला भेडसावत होतं.

विदिशा म्हणाली, ''ते राहू दे. माझं ऐकून तर घ्या आधी. You are in trouble! I mean it...''

वल्लरीनं बसायला न सांगताच खुर्ची ओढून बसत विदिशा म्हणाली, ''इथून MasterStok ॲक्सेस करता येईल ना आपल्याला? मला त्यातलं एक module तुम्हाला दाखवायचंय..''

विदिशा क्षणभर अडखळली. MaserStok चं व्यवस्थापन अलीकडं समीर पाहत असल्यामुळे तिनं गेल्या कितीतरी वर्षांत अपग्रेड्स, लेटेस्ट व्हर्जन्स स्वतः पाहिल्याही नव्हत्या...

विदिशा हसत म्हणाली, ''ओके, मला वाटलं होतं, You are a hands-on person. आता टेक्निकल डिटेल्स पाहत नाही तुम्ही बहुतेक! मग बरोबर! That figures...''

''काय सांगायचंय नक्की?''

''गेला महिनाभर मी तो सगळा code case पाहिला. MasterStok चं decision making नीट स्टडी केलं. मग एक गंमत दिसली! विदिशा'', दहा-पंधरा मिनिटं बोलत राहिली.

सगळ्या टेक्निकल जॅर्गनमधून स्पष्ट होत होतं, की स्टॉक्स फायदेशीररीत्या ऑटोमॅटिकली क्षणार्धात विकण्यासाठीची जी सब-सिस्टिम होती, त्यात विक्रीनंतरच्या नफ्यातून एक अत्यंत छोटासा अंश एका बँक अकाऊंटमध्ये वळता केला जात होता. इनव्हेस्टर्सकडून अधिकृतरीत्या जे कमिशन घेतलं जायचं ते वेगळं! पण त्यांच्या अकाऊंट्समध्ये नफा डिपॉझिट् होण्याआधी हे छुपं ट्रान्झेक्शन घडवून आणलं जात होतं.

''Very smart and very fraudulent!'' विदिशा शेवटी उद्गारली.

''आणखी एक सांगते! ते मुंबईचं इनोव्हेशन लॅब नावाचं जे काही आहे ना? तिथंही काहीतरी गोलमाल आहे, असा माझा अंदाज आहे! स्टॉक मार्केटच्या जवळ आहे ते खूप. डायरेक्ट मार्केट ॲक्सेससाठी जे low latency network लागतं ते तिथे असायची शक्यता आहे. तिथं बसवलेले सायन्टिस्ट्स हे ट्रेडिंग सुपरवाईज् करतात बहुतेक. तशी परवानगी नसते लॅबमधून! म्हणजे टॅक्स ब्रेक्स रिसर्चसाठीचे घेऊन हे काम तिथून होतंय असं मला नक्की वाटतंय.

कारण इथून नेटवर्क इतकं हाय स्पीड नाही वाटलं मला. You need to sell those stocks in a tiny "fraction of a second' window!''

विदिशा जोरजोरात खोल श्वास घेत होती. ''या स्केलवरचा फ्रॉड? Right under my nose?''

तिच्याकडे पाण्याचा ग्लास सरकवत विदिशा कुत्सितपणे म्हणाली, ''You may need this. हे सगळं तपासून पहा वाटल्यास आणि जमल्यास. पण त्यापूर्वी माझ्या काही रिक्वायरमेंट्सही ऐकून घ्या. मला यू. एस. मध्ये B.S साठी फंडिंग हवंय. ते काही या इन्टर्नशिपच्या स्टायपेंडमधून सुटणार नाही. I need a solid backing. सगळं शिक्षण पूर्ण होईपर्यंत मला पैशाची काळजी वाटणार नाहीं, आणि आरामात राहता येईल इतके पैसे हवेत. मी जॉब मिळाल्यावर ते परत करेन. एकदा डिग्री मिळाली की मला नक्की पैसे मिळतील. ॲडमिट् लेटर्सपण आहेत माझ्याकडे. टॉप युनिव्हर्सिटीज् अर्थातच!''

''I would be happy to...'' वल्लरी पटपटली.

''You have no choice!'' म्हणत विदिशा उठून उभी राहिली आणि पाठ फिरवून चालू लागली. बाहेर जाण्यापूर्वी थबकत वळून छद्मी हसत ती म्हणाली, ''तुझ्याकडे बाबा कसा पाहत असतो, हेही लक्षात आलंय माझ्या कितीदा! तुला तू म्हटलं तर चालेल ना? मावशी! तुम्हा मोठ्यांना काय वाटतं? तुम्ही दिवसभर कुठेकुठे उडून आपापल्या झाडांवर परत आलात, की तुमच्याकडून घास भरवून घ्यायला आम्ही डोळे मिटून तयार असावं? त्या बदल्यात तुम्ही कसेही वागलात तरी माफ? मी फेवर नाही मागत. यातलं काही सोशल मीडियावर गेलं तर काय होईल विचार कर जरा! ''

''मी सगळं तपासून मग बोलेन तुझ्याशी. I heard you. You may leave. Thank you.'' वल्लरीनं धुमसतच समारोप केला. समीरला फोन लावला तरी तो मीटिंगमध्ये असल्याने त्यानं तो घेतला नाही. उरलेल्या दिवसभरातील मीटिंग्ज पार पडल्या खऱ्या, पण कुठलेच निर्णय आज होऊ शकले नाहीत. There was too much to process... उद्या वाराणसी विद्यापीठात AIConic Innovation Challenge साठी जायचं होतं. ती स्वतः तिथं असणार म्हटल्यावर विद्यार्थ्यांची आणि उत्तर प्रदेशात निर्माण होणाऱ्या अनेक स्टार्टअप्सचीही मोठ्या संख्येनं उपस्थिती अपेक्षित होती. कॉम्प्युटर सायन्स विभागाचे प्रमुख डॉ. मनोज उपाध्याय अतिशय उत्साही आणि विषयाचं उत्तम ज्ञान असणारे प्राध्यापक होते. खरं तर किती उत्सुकतेनं ती अशा इव्हेन्ट्सना जात असे; पण यावेळी या सगळ्या पाठोपाठ बसलेल्या धक्क्यांमुळे तिला त्या प्रवासाचं ओझं वाटू लागलं होतं. ऐनवेळी ही भेट रद्द करणंही योग्य नव्हतं. कंपनीचे Technical experts, HR सगळे वाराणसी विद्यापीठात पोचले होते. इव्हेंटची जय्यत तयारी चालू असल्याचे अपडेट्स सतत मिळत होते. कसाबसा दिवस गुंडाळून ती घरी निघाली.

कारमध्ये बसतानाच मिहिकाचा फोन आला. तिचा आवाज ऐकताना किंचित सुखावत म्हणाली, ''कसं वाटतंय नवीन सगळं, मिकी? How is Paadena?''

''ऐक ना मॉम ! त्या तुझ्या मैत्रिणीच्या मुलाशी बोलले फेस टाईमवर. ठीक वाटला. पुढच्या महिन्यात मी न्यू यॉर्कला जाणार आहे, तेव्हा भेटायचं ठरलंय!'' मिहिकानं पहिल्यांदाच दिलेल्या किंचित पॉझिटिव्ह प्रतिसादानं वल्लरी थोडी आनंदली. पण तिला थांबवत मिहिका म्हणाली, ''अजून नक्की काही नाही, OK? जरा gambling सारखं वाटतं हे सगळं!''

''खरं आहे तसं तुझं... पण तरीही.... एकटी नको राहूस, असं वाटतं... सगळे निर्णय काही अंशी जुगारासारखेच असतात.'' ती मनाची मरगळ जरा दूर ढकलत उसनं अवसान आणून म्हणाली. मिहिकाशी बोलताना दिवसातल्या घडामोडी किंचित बाजूला पडल्या.

घरी पोचल्यावर नेहमीची छोटी सुटकेस भरताना तिनं हेअरब्रश पॅक करायला घेतला आणि तिला कालची संध्याकाळ आठवली. तो ब्रश उलटापालटा करून पहाताना त्यात गुंतलेले विदिशाचे ते पिंगट केस पाहताच तिच्या डोक्यात एक सणक गेली. मनाला लागलेली टोचणी सहन होत नव्हती. खरंच हिची हशारी, बेदरकार वागणं, आणि नाटकीपणा हे कॉम्बिनेशन समीरसारखंच वाटतं बरेचदा... एकेक प्रसंग आठवत, काही एक निर्णय घेत तिनं ते केस सोडवून झिपलॉक बॅगेत बंद केले. ड्रेसरवरचा समीरचा कंगवा तपासून पाहताना त्यातही त्याचे काही आखूड सॉल्टपेपर केस मिळाले. ते वेगळ्या बॅगमध्ये लॉक करत तिनं वाराणसीच्या ओमेगा हॉस्पिटलला फोन लावला. HealConnect चं नेटवर्क इतकं मोठं होतं की पालकत्वासाठीची DNA टेस्ट कुणाच्याही नकळत सहज जमवता येणार होती. तिनं डॉ. मुखर्जींना फोन लावला आणि त्यांच्या लॅबमध्ये या टेस्टसाठी किती वेळ लागेल याची चौकशी केली. ''डिटेल्स बादमें मिलके बताऊँगा मॅडम... आप डॉ रंजनासे मिलिये. सॅम्पल उनको सौंप देना. मैं दिल्लीमें हूँ! मिलते है।'' मुखर्जी म्हणाले. त्यांच्या म्हणण्यानुसार आठवडा तरी लागणार होता या टेस्टसाठी...

मुंबईहून वाराणसीला दुपारची थेट फ्लाईट होती. एअरपोर्टला जायला निघाल्यावर तिला काहीसं शांत वाटू ला लागलं होतं. प्रश्न आणि तिढे सुटले नव्हते. पण काहीतरी निर्णयांच्या खूणगाठी बांधल्या गेल्या होत्या, आणि त्यानं किंचितशी साफसफाई होऊन मनातली जळमटं एकीकडे बाजूला होत होती. वाराणसीला पोचल्यावर हॉटेलमध्ये चेकइन करून ती विद्यापीठात जायला तयार झाली. क्रीम कलरची टसर सिल्क, कानात पोवळ्याचे मोठे डॅंगलर्स. मिनिमलिस्टिक एलिगन्ट. ही साडी तिला आईनं पीएच. डी. मिळाल्यावर Commencement Ceremony साठी घेतली होती. आईच्याच शब्दात वर्णन करायचं तर 'सरस्वती सारखी!'

विद्यापीठाच्या कारमधून डॉ. उपाध्याय स्वतः तिला इव्हेंटच्या ठिकाणी घेऊन जायला आले होते. 'आर्टिफिशियल इंटलिजन्सच्या वापरासंदर्भातील नैतिकता आणि पारदर्शकता' - Ethicality and Transparency in Al या इव्हेंटच्या थीमबद्दल कारमध्ये त्यांच्याशी चर्चा घडणं साहजिक होतं. तिनं काही लेटेस्ट पब्लिकेशन्स त्यांच्या निदर्शनास आणून देताना म्हटलं,

''हे प्रशिक्षण विद्यार्थीदशेतच मिळालेलं चांगलं.'' प्रोफेसर उत्साहानं तिचं म्हणणं ऐकत होते. ते म्हणाले,

''मॅडम, तुम्ही आमच्या विभागासाठी हा कोर्स घ्याल का? निदान काही लेक्चर्स तरी? नवीन विषय आहे. सगळे नुसते चॅट जीपीटी आणि लार्ज लँग्वेज मॉडेल्स LLM पलीकडे काही बोलतच नाहीत आजकाल. हे संभाव्य धोके तुमच्याकडून ऐकले तर जरा तरी भानावर येतील लोक. युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑटोनॉमस आहे. मी येत्या सेमिस्टरमध्ये हा विषय सिलॅबसमध्येच समाविष्ट करू शकतो...''

वल्लरी हसत म्हणाली, ''मीच शिकवावं असं नाही! पण कुणीतरी याबद्दल awareness आणला पाहिजे हे नक्की!'' खरं तर AI संदर्भातील नैतिकतेवर बोलायचा आता आपल्याला हक्कच नाही, असं तिला स्वतःच्याच कंपनीत allegedly घडणाऱ्या फ्रॉडमुळे वाटत राहिलं. विदिशानं सांगितलेलं पडताळून पाहण्याइतका वेळ मिळाला नव्हता. समीरचीही गाठ पडली नव्हती सकाळी. प्रोफेसर उपाध्याय जी स्तुती करत होते ती ऐकताना ती काहीशी कानकोंडी होत होती. स्वतःची चूक नसली, तरी सीईओ म्हटल्यावर जबाबदारी तिचीच होती. ''Yes. The buck stops with me...''

दोन्ही बाजूच्या हिरव्या झाडीतून बदामी रंगाच्या टुमदार इमारती डोकावत होत्या. कॉम्प्युटर सायन्स विभाग

इतर विभागांच्या मानानं मोठा असला, तरी जुन्या बांधकामांची रंगसंगती न बिघडवता बांधल्यामुळे ठिगळ लावल्यासारखा विसंगत वाटत नव्हता. एक शतकभराची परंपरा असलेल्या त्या विद्यापीठात पार प्राचीन ते अत्याधुनिक विषयांचे विभाग एकाच कॅम्पसवर पाहायला मिळतात, याचं परदेशातून वाराणसी पाहायला येणाऱ्यांनाही नवल वाटतं, असं उपाध्याय म्हणत होते.

इमारतीजवळ कार थांबताच दोघे उतरले. दारातच स्वागतासाठी उभ्या असलेल्या विद्यार्थिनीनं खास पारंपरिक पद्धतीनं चंदनमिश्रित टिळा लावून गळ्यात हार घालून तिचं स्वागत केलं. टाळ्यांच्या कडकडाटात वल्लरी इमारतीमागील स्टॉल्सकडे गेली. Innovation Challenge चे जज् म्हणून आलेले AIConic मधील तज्ज्ञ आदल्या दिवसापासूनच सगळे स्टॉल्स फिरून प्रत्येक एन्ट्री समजावून नोंदी करत होते. यातून शॉर्टलिस्ट झालेल्या पाच एन्ट्रीज्मधून तीन स्वतः वल्लरी आज निवडणार होती. इतर स्टॉल्सनाही भेट देऊन, उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांशी अनौपचारिक गप्पा मारत high potential असणारे विद्यार्थी हेरून ठेवणं हाही महत्त्वाचा हेतू होताच. तशा एन्ट्रीजची लिस्ट आणि त्या सादर करणाऱ्यांची नावं घेऊन HR चा कुश डोंगरे तिच्याकडे पळत आला.

''मॅडम, यांच्याबरोबर एक सेशन करता आलं तर बरं होईल. आठदहा जण तरी आधीच ऑफर देण्यासारखे चांगले आहेत.''

वल्लरीनं हसून दुजोरा दिला आणि ती स्टेजकडे वळली. सगळे सोपस्कार, विजेत्यांची निवड, प्रश्नोत्तरांच्या फैरी, भाषण, पारितोषिक वितरण होता होता सहा वाजून गेले. त्यानंतर निरोप, हाय टी... 'आता आज गंगारती गाठता येणार का आपल्याला?' असा विचार मनात येतोय, तेवढ्यात तिला बॅगेतून आणलेली विदिशा आणि समीरची hair root samples आठवली. ती टेस्टसाठी द्यायची होती. पण उपाध्यायांनी तर तिला रात्री सगळ्या स्टाफबरोबर आणि स्टार्टअप उद्योजकांबरोबर बॅंक्वेटसाठी आमंत्रित केलं होतं. शेवटी तिनं डॉ. रंजनाला फोन लावून दुसऱ्या दिवशी सकाळची अपॉईंटमेंट घेतली. फ्लाईट उद्या रात्री दहाची होती. इतक्या सगळ्या मंडळींनी तिला भेटायची इच्छा व्यक्त केली होती, की आजचा उरलेला वेळही पूर्णपणे विद्यापीठालाच द्यावा, असं तिनं ठरवलं. डिनरच्या आधी गंगारती पहाण्याचा तिचा मनसुबा होता, पण तो तसाच राहू दिला. उपाध्याय उत्साहाच्या भरात ''मॅडम आपल्याकडे स्पेशल AI Ethics चा कोर्स शिकवणार आहेत!'' असं सांगत सुटले होते. त्यावरून होणाऱ्या असंख्य चौकश्यांना संतुलित उत्तरं देताना तिला संयम ठेवावा लागत होता.

सकाळी ब्रेकफास्टनंतर इलेक्ट्रिक रिक्षा घेऊन ती थेट ओमेगा हॉस्पिटलमध्ये पोचली. आज इतर ठिकाणी मीटिंग्ज आहेत, असं सांगत विद्यापीठाची कार तिनं नाकारली होती. डॉ. रंजना जोशीच्या क्लिनिकमध्ये जाऊन तिनं तिच्याकडे केसांची सॅम्पल्स दिली. ती न्याहाळत रंजना म्हणाली. ''ये तो ठीक है, मै लॅब भिजवाऊंगी। Next Monday तक आ जाएंगे रिझल्ट्स... पर डॉ. मुखर्जी आपसे बात करना चाहते है...''

मुखर्जी दिल्लीहून परत आले होते. त्यांच्या ऑफिसकडे तिला एक वॉर्डबॉय घेऊन गेला. आलिशान खुर्चीतून आपला भलामोठा देह सावरत उठून डॉक्टर म्हणाले,

''What a pleasure Madam! शेवटी आज भेट झाली.''

वल्लरीशी बोलताना त्यांनी पालकत्वाच्या चाचणीतील संभाव्य त्रुटी तिला समजावून दिल्या. त्या टेस्टसाठी केसांशिवाय, रक्त, दोन्ही गालांच्या आतल्या बाजूचे swabs, त्वचा अशी सगळी सॅम्पल्स लागतात. Paternity test is quite complex to conclude...'' ते म्हणाले.

वल्लरी ही सगळी गुंतागुंत ऐकत निराश होत तिथून उठली. ''करा तुम्ही हेअर रूट्स घेऊन टेस्ट. मी इतर

सॅम्पल्सबद्दल विचारते!'' म्हणत बाहेर पडली, आणि हॉटेलवर परत जाण्यासाठी रिक्षेत बसली.

रूममधल्या एसीनं सुखावत ती धाडकन् पलंगावर पडली. समीरला कसं कन्फ्रंट करावं याचा विचार करतानाच तिचा डोळा लागला. जाग आली तेव्हा अंधारून आलं होतं. साडेपाचच वाजले होते तरी वाराणसी जरा पूर्वेकडे असल्यामुळे सूर्योदय आणि अस्त दोन्ही थोडे लवकर! चेहऱ्यावर गार पाणी मारून फ्रेश होत तिनं समीरला तडक व्हिडीओ कॉल केला आणि यावेळी तो त्यानं घेतलाही. परवापासूनचे मनात साठलेले प्रसंग भडाभड बोलून मोकळं होताना तिच्या डोळ्यात पाणी जमू लागलं होतं.

''इतका मोठा फ्रॉड करताना किती लोकांना मॅनेज केलंस, समीर? यू. एस.मध्ये धजला असतास हे करायला? हे घेऊन ती विदिशा मीडियाकडे जायची धमकी देतीय. काय स्केलचं स्कॅन्डल होईल?'' तिनं भडकून विचारलं. पालकत्व पडताळण्यासाठी DNA test करायला दिल्याचंही त्याला ऐकवलं, आणि जाब विचारला, तेव्हा तिला जरा शांत वाटलं. त्याला न सांगता टेस्ट करून घ्यायची आणि मग त्याच्याशी बोलायचं असं ठरवलं होतं; पण ऐनवेळी तिनं सगळा सोक्षमोक्ष आजच लावायचा निर्णय घेतला. समीर त्या मानानं बराच composed होता.

''दोन्ही उत्तरं देतो तुला वल्लरी. अविनाशनं हा आरोप पहिल्यांदा नाही केलेला... विदिशा लहान होती तेव्हाही त्यानं हा तमाशा केलाय माझ्याकडून पैसे उकळण्यासाठी. DNA tests मी स्वतः विदिशाच्या आजीआजोबांना विश्वासात घेऊन करून घेतल्या कित्येक वर्षांपूर्वी! समीर म्हणाला.

''विदिशा कायमेरिक आहे. गर्भाशयात अगदी सुरुवातीच्या स्टेजला जर दोन झायगोट्स म्हणजे भ्रूणं एकत्र झाली, तर जन्माला येणारी व्यक्ती chimeric असते. म्हणजे त्यांच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागात दोन भूणातून आलेले ते दोन प्रकारचे DNA वाटले गेलेले दिसून येतात. त्यामुळे विदिशाच्या केसांच्या मुळांमध्येच नेमका तिच्या बापाचा DNA प्रकार असेल असं नाही. तो तिच्या शरीराच्या दुसऱ्या भागातही असू शकतो. असं असेल तर फक्त केसाच्या सॅम्पलवरून पालकत्व सिद्ध होणार नाही. त्यामुळे तू केस कलेक्ट करून दिलेस तरी आरोपी 'बाल बाल बच गया!' असं होऊ शकतं...'' हा विनोद अस्थायी आणि अवेळी होतोय, हे लक्षात येताच तो पटकन् म्हणाला,

''रक्त, स्किन, केस वगैरे वेगवेगळी सॅम्पल्स एकत्रितपणे घेऊन टेस्ट करावी लागते. अशा केलेल्या टेस्टमधून दोघात एक DNA टाईप कॉमन दिसून आला तर मात्र ते पितृत्वाचं positive indication म्हणता येतं. तर ही सगळी सॅम्पल्स घेऊन, मी तिचा बाप नाही, हे मी त्याला सिद्ध करून दाखवलं होतं. आणि हाकलून दिलं होतं अरे, पण सिद्ध करायची वेळ येते म्हणजे शंकेला कारण होतं ना? ती कळवळत म्हणाली.

''नाही. आत्मविश्वास होता काही निष्पन्न होणार नाही म्हणून. त्याला conclusively हाकलण्यासाठी करावं लागलं सगळं. ब्लॅकमेल कसं खपवून घ्यायचं?'' वल्लरी यावर काही बोलणार तोच समीर म्हणाला,

''हां! तो दुसरा फ्रॉड मी केला. कमिशन उत्तम मिळत होतं हे खरं आहे. तो कस्टमरच्या नफ्यातील एक thin slice काढून घेणं निव्वळ थ्रिलसाठी. गेल्या दहा वर्षांत काही लाख साठले आहेत. खूप मोठी रक्कम नाही... पण तुझे सॉफ्टवेअर चालवायचं तर ते स्पेशल इन्फ्रास्ट्रक्चर आवश्यक होतं. सरळ मार्गानं डेडिकेटेड low latency network मिळणं खूप महाग. वांद्याच्या एका खासदारानंच सुचवलं. स्टॉक एक्सचेंजजवळची जागा 'इनोव्हेशन लॅब'साठी मिळवून दिली. मी या सिस्टिमचा फायदा घेतला फक्त.''

रूममधले पडदे सरकवत वल्लरी म्हणाली, ''आता तीन गोष्टी कर. एक तर MasterStok संबंधित व्यवसाय आधी स्वच्छ कर, किंवा बंद कर. कसं ते तू पहा. दुसरं म्हणजे, विदिशासाठी Education fund तयार कर. तिला कर्ज म्हणून हवाय, पण मी तिला तो व्याजाशिवाय देऊ इच्छिते. I am actually thankful to her... तिसरं म्हणजे ते टेस्ट रिपोर्ट्स मला आत्ता पाठव. मला ते verify करायचेत. मी आठवड्याभरानं येईन. इथं काही academic

programs सुरू करावे म्हणते.'' त्याला जास्त पुढे बोलायची संधी न देता तिनं कॉल आटोपता घेतला.

सहा वाजत आले होते. आत्ता निघाल्यास गंगारती साधता येणार होती. ती कपडे बदलून तडक बाहेर पडली. रिक्षातूनच गश्मीरला फोन करून फ्लाईट बदलून चार दिवसांनंतरचं तिकिट पाठवायला सांगितलं. उपाध्यायांना फोन करून त्यांची कोर्स शिकवण्यासाठी दर दोन आठवड्यांनी वाराणसीला यायची ऑफर स्वीकारली. कोर्स डिझाईन करण्यासाठी थांबणार असल्याचं कळवल्यावर ते अक्षरशः लहान मुलासारखे हर्षभरित झाले! मिहिकाला फोन करून व्हॉईस मेसेज ठेवला. तिची सकाळ झाली नव्हती अजून.

रिक्षातून उतरून चालत, आजूबाजूची वर्दळ पहात दशाश्वमेध घाटावर पोचताच एक रापलेल्या चेहेऱ्याचा काटकुळा छोट्या तिला गाठून म्हणाला, ''दिया लीजिए ना मेडम!'' तिनं त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. घाटावर आरती सुरू व्हायला काही मिनिटंच उरली होती. तितक्यात समीरचा पुन्हा फोन आला. ''आपण प्रोफिटेबली विकू शकतो MasterStok!'' तो म्हणाला. आणि ते रिपोर्ट्स मी पाठवलेत स्कॅन करून... मेल बघ...'' ''Thanks. मला सगळं स्वच्छ करून हवंय. काही पेनल्टीज पडल्या तरी हरकत नाही...'' फोन कट् करत ती म्हणाली.

तो छोट्या परत तिच्याजवळ येऊन तिच्या हाताला हात लावत म्हणाला, ''गंगामैय्या ना, या वर्षी पायऱ्या चढून वर आलीय! देखो तो सिडियाँ डूब गई खूब सारी... जास्त उतरावंही नाही लागणार तुम्हाला. थोड्याच पायऱ्या आहेत... घ्या ना दिवे!''

फुलांनी सजवलेले पळसाच्या द्रोणांचे सुबक दिवे त्याच्या हातून घेत ती नदीच्या काठावर उतरून किंचित झुकली. लहरणाऱ्या लाटा पावलांना सुखवू लागल्या. खरंच गंगा दुथडी वाहत होती. पायऱ्यांवर येऊन भेटत होती. एकेक दिवा प्रज्वलित करून तो लहानगा तिच्या हातात देत होता, आणि हलक्या हातानं ती ते दिवे पाण्यावरून अलगद आत लोटत होती. तो लहानगा उत्साहानं तिला ''वो देखो, वो देखो'' म्हणत आधी अडखळत नंतर वेग पकडणारे दिवे दाखवत होता.

लहरींवर हेलकावत दूर जाणारे ते ज्योतिबिंदू निरखत, हात जोडत ती म्हणाली, 'गंगार्पणमस्तु...'

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - -



# वस्त्रं

## शुभंकर पवार

रिटायर होण्याआधीपासूनच आवड होती. डिटर्जंटचा स्वच्छ वास कपड्यांना असायचा. कॉलेजला असताना जेमतेम एक पायजमा व एक शर्ट वर्षभरातून शिवून मिळत असे. रंग पांढराच. मग त्याला आई नीळ देत असे. ती ही पुरवून पुरवून वापरायची, त्यामुळे हलकीशी नीळ लागलेले ते पांढरे कापड झगझगीत दिसायचे. एक कोळशाची इस्तरी कुठूनशी मिळवली होती. घरी चुलीतील लाकडाचा कोळसा पाडलेला एका टिनाच्या डब्यात भरलेला असे. तो कोळसा इस्तरीत भरणे, कोळसा किंचितसे रॉकेल टाकून पेटवणे आणि जाडसर पुठ्ठ्याने हवा घालून निखारे फुलविणे, त्यावेळी कोळशाला धुराचा एक मंदसा सुवास यायचा. मग चुरगळलेल्या पांढऱ्या शुभ्र कापडावर पाणी मारून त्याचा बोळा करून ठेवलेला असे, तो उलगडायचा. शर्ट असला तर आधी कॉलरवर हलकेसे पाणी शिंपडून इस्तरी फिरवायची, मग बाह्या, अशा क्रमाक्रमाने आन्हिकासारखं 'प्रेस करणे' ही क्रिया पार पडायची.

मग तो स्वच्छ पांढरा ड्रेस घालून चौकात पानटपरीवर जाऊन खर्रा घेऊन त्यातील सुपारी पुरवून पुरवून तोंडात चघळत ठेवायची. कपड्यांना फार जपावे लागे. कारण दुसरे दिवशी कॉलेजला तेच कपडे घालून जावे लागायचे. तेव्हा साहजिकच मैदानी खेळ बाद झालेले.

कॅरम खेळून खेळून त्यात मास्टरी हासिल झाली होती.

कृष्णा टॉकीज चौकात कॅरमचे क्लब्ज् असत. दिवसचे दिवस, कधी रात्री दीड दोन वाजेपर्यंतही तिथे ठाण मांडून बसायचे. विविध थरांतील चॅम्पियन मंडळी येऊन खेळून जायची. हारजीत होत असे, पण निष्णात कॅरम प्लेयर म्हणून त्याला मान होता.

घरी हातावर पोट असले तरी आनंद होता. दोन चार दिवसांआड मटन मच्छी ठरलेली असायची.

राहेलकडे ते वर्ज्य नव्हतेच. मिलिंदच्या घरात अगदीच सोवळे नसले तरी घरी मांस-मटण शिजवून कुणी खाल्लेले नव्हते.

मिलिंदचा बाप दूर कुठेतरी बॉर्डरवर होता तो दर सहा महिन्यांनी गावात येत असे आणि त्याच्या मित्रांसोबत रेस्टहाऊसवरच्या मुर्गापार्टीला मिलिंदला नेत असे.

जेवणापूर्वी ते लोक बापाने मिलिटरीतून आणलेला कडक माल घोटाघोटाने रिचवत व नंतर बरळत ओघळत मुर्गीचा रस्सा ओरपत. मिलिंदने सांगितले होते की, एकदा बाप रात्रभर ओकत होता आणि आई पाठीवरून हात फिरवून फिरवून ती हिरवी पिवळी वांती स्वच्छ करत होती. अखेर एकदाचा कपाळाला बाम चोळून त्यावर रुमाल बांधून बाप डोळे मिटून पडून राहिला व 'साली एसिटिडी!' असा पुटपुटून झोपला.

सकाळी चहा करताना मिलिंदची आई किटकिटत होती, ''सहन होत नाही तर कशाला ढोसता एवढी? भरीस भर मुलालाही घेऊन जाता, चांगले संस्कार सुरू आहेत.'' मिलिंदचा बाप डोकं चोळत गुरगुरत म्हणाला, ''पोस्टात कारकून करायचं आहे का पोराला? अरे वो शेर है शेर! उसको घास मत खिलाव. मेजर बनेगा वो, कर्नल बनेगा. क्यूँ

मेरे शेर?'' आणि पाठीत एक घणसर दणका.

साहजिकच मिलिंदला बिअर,रम, व्हिस्की, चिकन, मटन, भुर्जी, ऑम्लेट ह्या गोष्टी तिघांपैकी जास्त माहिती झालेल्या. पण पोरींच्या बाबतीत त्याच्या एवढी माहिती मात्र कुणालाच नव्हती.पोरींच्या बाबत म्हणजे त्यांचं कुठं काय असतं ते वगैरे.

मिलिंद मित्र होता, फार श्रीमंत नाही, पण खाऊनपिऊन सुखी. त्याचे वडील नोकरीवर होते.

राहेलची आई दवाखान्यात नर्स होती. तिला 'मेरी सिस्टर' असं संबोधत असत.

मिलिंद-राहेल-तो असं त्रिकूट होतं. वस्तुतः अभ्यासाचे विषय, शाळा-कॉलेजं वेगवेगळी होती, तरी मैत्री होती.

वयाने मिलिंद आणि राहेल मागेपुढे आणि दोनेक वर्षांनी तो मोठा होता. शिवाय खेडेगावात शाळेचे दिवस काढल्यानंतर त्याच्यापाशी लैंगिक गोष्टींचा भरपूर साठा होता. तो गावातील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये असल्याने कॉलेजमध्ये मुलीच मुली. त्याच्या वर्गात तर वीसेक मुली आणि तो एकटाच अशी परिस्थिती.

मिलिंद इंजिनियरिंगच्या कसल्याशा डिप्लोमा कोर्सला. तिथे चाळीसेक मुलं आणि एकच मुलगी अशी स्थिती. राहेल बारावीला होता आणि मेडिकलला जावे की इंजिनियरिंगला ते ठरवत होता.

आज कपड्यांचा ढीग जरा जास्तच आहे. हरकत नाही तास दीड तास सहज जाईल. तोवर बायको दुपारची झोप घेऊन उठली की चहा घेऊन मग मिलिंदकडे जाता जाईल.

त्याने पाण्याचे हबकारे कपड्यांवर मारले. लुंगी गुंडाळलेली आणि वर उघडाबंबं असेच घरातले राहणीमान. बरेचदा ह्याच अवतारात अंगणातही जाणं होत असे, तेव्हा बायको किरकिरायची आहो चांगलं नाही दिसत व्हो, शेजारीपाजारी बाया माणसं असतात, तरण्याताठ्या मुली असतात त्यावर ठरलेले उत्तर -

'' गांधीजी पाह्यले का? गांधीजीचा फोटो पाह्यला का?''

'' आरे त्ये गांधीजी हायेत, तुमी नाही ना?'' हे प्रत्युतर.

नंतर एक दीर्घ वादवितंड. नेहमीचेच शिव्याशाप आणि मग कपडे प्रेस करत करत समाधी अवस्था.

आज आपले आणि दोन्ही मुलांचे मिळून साताठ पँटस आणि तितकेच शर्टस् टी शर्टस.. एकेका कापडात गुंतून जात तो तल्लीन होऊन गेला.

कोळसा, रॉकेल, निखारे, संमिश्र वास हे काहीही नव्हते. सुटसुटीत हलकीशी इलेक्ट्रिकची प्रेस, तरी त्याचीही मजा होतीच.

एकेक आठवत राहिलं.

''बालपण माणसात रुतून असतं. त्यातून सुटका नाही, मॅन लिव्हज् इन हिज चाईल्डहूड.'' तो पुटपुटला.



# कॉन्स्टन्टिन कवाफीस

## शैलेंद्र मेहता

(कॉन्स्टन्टिन कवाफीस हा एक प्रसिद्ध ग्रीक कवी ( २९ एप्रिल १८६३ ते २९ एप्रिल १९३३ ) आधुनिक ग्रीक कवितेतील सर्वांत महत्त्वाच्या आणि प्रभावशाली साहित्यिक व्यक्तींपैकी एक म्हणून ओळखला जातो. त्याच्या साहित्यकृतींत आत्मनिरीक्षण, उदास स्वर, तसेच ऐतिहासिक, तात्त्विक व कामुक थीम्स आढळतात.



अलेक्झांड्रिया, इजिप्त येथे जन्मलेल्या, कवाफीसने आपले बहुतेक आयुष्य तेथे घालवले आणि शहराच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक समृद्धीचा त्याच्या कवितेवर खोल प्रभाव पडला. त्याच्या सुरुवातीच्या कवितांना त्याच्या हयातीत मोठ्या प्रमाणावर मान्यता मिळाली नाही, ज्या त्याने प्रामुख्याने आपल्या मित्रांच्या एका छोट्या मंडळामध्ये प्रसारित केल्या. तथापी, त्याच्या कवितेला मरणोत्तर प्रशंसा मिळाली.

कवाफीसची कविता अनेकदा मानवी अनुभव, ऐतिहासिक घटना आणि वैयक्तिक आणि सामूहिक स्मृती यांच्यांतील परस्परसंवादाच्या गुंतागुंतीचा शोध घेते. ज्या काळात समलैंगिकतेला सामाजिकदृष्ट्या कलंकित केले गेले होते, अशा वेळी तो उघडपणे समलिंगी होता आणि त्याच्या ओळखीचा हा पैलू त्याच्या काही कवितांमध्ये दिसून येतो. इथाका, द सिटी, वेटिंग फॉर द बार्बेरियन्स, आणि द लव्ह ऑफ द पोएट सारख्या त्याच्या कविता अनेक भाषांमध्ये अनुवादित झाल्या आहेत व जगभरातील लेखक, विद्वान आणि वाचकांना त्यांनी प्रेरणा दिली आहे. आधुनिक साहित्यावर त्याचा प्रभाव ग्रीक कवितेच्या सीमेपलीकडे पसरला, ज्यामुळे तो व्यापक साहित्यिक परिदृश्यात एक मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व बनला.

कवाफीसची ओळख प्रामुख्याने त्याच्या कवितेवर अवलंबून असली तरी, त्याच्या गद्य कृती, त्याचे विचार, दृष्टिकोन व विविध विषयांसंबंधीच्या आवडींविषयीची अतिरिक्त अंतर्दृष्टी प्रदान करतात व त्या साहित्यिक गुणवत्तेच्या दृष्टीने मौल्यवान आहेत. त्यातून कवितेच्या पलीकडे कवाफीसच्या सर्जनशीलतेचे अधिक व्यापक आकलन होते.)

### (कवाफीसच्या कथेचा अनुवाद)

एका संध्याकाळी मी रमाल्लाह येथील सेंट स्टीफन कॅसिनोमध्ये रात्रीच्या जेवणानंतर बसलो होतो. कॅसिनोमध्ये राहणारा माझा मित्र अलेक्झांडर ए. याने मला आणि आमचा जिवलग मित्र असलेल्या आणखी एका तरुणाला त्याच्यासोबत जेवायला बोलावले होते. त्या संध्याकाळी संगीत नसल्यामुळे, फार कमी लोक आले होते व माझ्या

दोन मित्रांसाठी संपूर्ण जागा मोकळी होती.

आम्ही विविध गोष्टींबद्दल बोलत होतो व आम्ही खूप श्रीमंत वर्गातले नव्हतो, संभाषण अगदी स्वाभाविकपणे पैशाकडे, त्यातून मिळणाऱ्या स्वातंत्र्याकडे व सुखांकडे वळले.

माझा मित्र म्हणाला की त्याला तीन दशलक्ष फ्रँक हवे आहेत. तो त्यांचे काय करू इच्छितो व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, त्याच्याकडे एवढी मोठी रक्कम असल्यास तो काय करणे थांबवू इच्छितो, याचे तो वर्णन करू लागला.

मी, जरा जास्त विनम्र असल्याने, वीस हजार फ्रँकच्या वार्षिक उत्पन्नाने समाधानी झालो असतो.

''माझी इच्छा असती तर'', अलेक्झांडर ए. म्हणाला, ''आता मी किती तरी वेळा लक्षाधीश झालो असतो, पण माझी हिम्मत झाली नाही.''

हे शब्द आम्हाला विचित्र वाटले. आम्हाला आमचा मित्र ए. चे जीवन चांगले माहीत होते पण अनेकवेळा लक्षाधीश बनण्याची संधी त्याच्यासमोर आली हे आठवत नव्हते. म्हणून आम्ही गृहीत धरले की, तो मनापासून बोलत नाही. नंतर तो काहीतरी आनंददायी बोलेल असेही वाटले; पण आमच्या मित्राचा चेहरा खूप गंभीर होता व आम्ही त्याला त्याच्या गूढ भाष्याविषयी स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

तो एक क्षण संकोचला – पण नंतर म्हणाला, ''जर मी दुसऱ्या कंपनीत असतो, तर तथाकथित 'विकसित लोकांमध्ये' अनपेक्षितपणे सापडलो असतो, व मी स्वतःला स्पष्ट करू शकलो नसतो, कारण ते माझ्यावर हसले असते. परंतु आपण तथाकथित 'विकसित लोकां'पेक्षा किंचित वर आहोत, म्हणजेच आपल्या परिपूर्ण आध्यात्मिक विकासाने आपल्याला पुन्हा साधे, पण अज्ञानी न राहता साधे बनवले आहे. आम्ही एक वर्तुळ पूर्ण केले आहे. अशा प्रकारे, स्वाभाविकपणे, आम्ही आमच्या सुरुवातीच्या बिंदूकडे परत आलो आहोत. इतर मधेच कुठेतरी अडकून राहिले आहेत. रस्ता कुठे संपतो हे त्यांना माहीत नाही किंवा त्याचा अंदाजही येत नाही.''

या शब्दांनी आम्हाला अजिबात आश्चर्य वाटले नाही. आमच्यापैकी प्रत्येकाला स्वतःबद्दल व इतर दोघांबद्दल सर्वांत जास्त आदर होता.

''होय,'' अलेक्झांडरने पुनरावृत्ती केली, ''मी हिम्मत केली असती तर मी करोडपती झालो असतो; पण मी घाबरलो.''

''मी तुम्हाला जे सांगणार आहे ते दहा वर्षांपूर्वी घडले होते. माझ्याकडे तेव्हा फारसे पैसे नव्हते, आतासारखे, किंवा त्याऐवजी माझ्याकडे अजिबात पैसे नव्हते; पण एका मार्गाने मी पुढे जात होतो व माफक प्रमाणात जगत होतो. मी शेरीफ पाशा स्ट्रीटवर एका इटालियन विधवेच्या घरात राहत होतो. माझ्याकडे तीन सुसज्ज खोल्या व एक वैयक्तिक नोकर होता, शिवाय त्यात माझ्या मालकिणीच्या इतर चांगल्या सेवांचा समावेश होता.

एका संध्याकाळी मी रॉसिनीकडे गेलो होतो. त्याचे मूर्ख बरळणे पुरेसे ऐकून घेतल्यानंतर, संध्याकाळी अर्ध्या वाटेने मी घरी परतायचे आणि झोपायचे ठरवले. मला दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठायचे होते, कारण अबौकीर येथे मला एका सहलीचे आमंत्रण होते.

जेव्हा मी माझ्या खोलीत आलो, तेव्हा माझ्या प्रथेप्रमाणे मी दिवसभराच्या घडामोडींचा विचार करून वर-खाली येरझारे घातले. पण त्यात काहीच खास नव्हते, याचा विचार करून मी झोपायचे ठरवले व झोपायला गेलो.

मी स्वप्न न पाहता दीड किंवा दोन तास झोपलो असेन, कारण मला आठवते की मध्यरात्री एक तासानंतर मी रस्त्यावरच्या आवाजाने जागा झालो व मला स्वप्न आठवले नाही. साधारण एक–तीसच्या सुमारास मला पुन्हा झोप लागली असावी, जेव्हा मला असे वाटले की एक मध्यम उंचीचा व चाळिशीपेक्षा जास्त नसलेला माणूस माझ्या खोलीत आला आहे. त्याने काळे कपडे घातले होते, जे बरेच जुने होते, आणि एक स्ट्रॉ हॅट. त्याच्या डाव्या हातावर खूप मोठा पाचू असलेली अंगठी होती. हे त्याच्या बाकीच्या पोशाखाशी जुळत नसल्याने मला काहीसा धक्का बसला.

त्याच काळ्या–पांढऱ्या केसांची मोठी दाढी होती, आणि त्याच्या डोळ्यांत काहीतरी विचित्र भाव दिसत होते, एकाच वेळी चेष्टेखोर व खिन्नपणा यांचे मिश्रण. तथापी, एकंदरीत, तो एक सामान्य प्रकारचा होता. ज्या प्रकारचा मनुष्य वारंवार भेटतो. मी त्याला विचारले की त्याला माझ्याकडून काय हवे आहे. त्याने लगेच उत्तर दिले नाही, परंतु आपण चूक तर केली नाही याची खात्री करण्यासाठी माझ्याकडे पाहिले. मग तो मला अजीजीच्या व विनम्र स्वरात म्हणाला, 'तू गरीब आहेस, मला माहीत आहे. मी तुला श्रीमंत होण्याचा मार्ग सांगण्यासाठी आलो आहे. पॉम्पीज स्टेले पासून फार दूर नसलेली मला एक जागा माहीत आहे जिथे एक मोठा खजिना लपवून ठेवलेला आहे. मला स्वतःला या खजिन्याचा काही भाग नको आहे – मी फक्त एक लहान लोखंडी पेटी घेईन, जी तळाशी मिळेल. बाकी सर्व तुझे असेल.''

'आणि या महान खजिन्यात काय आहे?' मी विचारले.

'सोन्याची नाणी', तो म्हणाला, 'सर्व मौल्यवान रत्ने. त्यात हिरे, मोत्यांनी भरलेल्या दहा किंवा बारा सोन्याच्य पेट्या आहेत आणि मला विश्वास आहे' – जणू काही तो आठवण्याचा प्रयत्न करत होता – 'नीलमण्यांसह'.

मला आश्चर्य वाटले की त्याला जे हवे आहे ते घेण्यासाठी तो स्वतः का गेला नाही व त्याला माझी गरज का आहे? त्याने मला माझा आक्षेप मांडू दिला नाही. 'तू कसला विचार करतोस हे मला माहीत आहे. का, तू असा विचार करतोस की, मला जे हवं आहे ते मी स्वतःहून घ्यायला का जात नाही? एक कारण आहे, जे मी तुला सांगू शकत नाही व जे मला प्रतिबंधित करते. अशा काही गोष्टी आहेत, ज्या मी करू शकत नाही.' जेव्हा तो 'मीसुद्धा' म्हणाला, तेव्हा जणू काही त्याच्या डोळ्यांतून एक तेज बाहेर आले व क्षणभरासाठी त्याचे रूपांतर एका अद्भुत भव्यतेत झाले. पण त्याने लगेच आपली विनम्र वाणी पुन्हा सुरू केली. 'अशा प्रकारे माझ्यासोबत येऊन तू माझ्यावर खूप मोठा उपकार करशील. मला कोणाची तरी गरज आहे व मी तुला निवडतो, कारण मला तुझ्या कल्याणाची इच्छा आहे. उद्या मला भेट. मी स्मॉल स्क्वेअरमध्ये, लोहारांच्या दुकानाजवळ असलेल्या कॅफेमध्ये दुपारपासून दुपारी चारपर्यंत तुझी वाट पाहत असेन.'

हे शब्द बोलून तो गायब झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा मी उठलो, तेव्हा सुरुवातीला माझ्या मनात त्या स्वप्नाचा मागमूसही नव्हता. पण मी आंघोळ करून नाश्त्याला बसल्यानंतर ते माझ्या स्मरणात परत आले व मला ते विचित्र वाटले. 'ते खरे असले तरच,' मी स्वतःला म्हणालो आणि मग विसरलो.

मी ग्रामीण भागात सहलीला गेलो व खूप चांगला वेळ घालवला. आम्ही संख्येने पुष्कळ होतो – काही तीसेक पुरुष आणि स्त्रिया – आणि सर्व विलक्षण उत्साहात, परंतु मी त्याचा तपशील सोडेन. कारण त्याचा माझ्या विषयाशी काहीही संबंध नाही.

'इथे माझा मित्र डी. निरीक्षण करतो. ते आवश्यकही नाही. कारण मी किमान त्यांच्याशी परिचित आहे. चुकत नसेन तर, मीही त्या सहलीला होतो.'

'तू होतास? मला तुझी आठवण येत नाही.'

'इंग्लंडला रवाना होण्यापूर्वी मार्कोस जी. ने या सहलीचे आयोजन केले नव्हते का?'

'होय ते खरंय. मग तुला आठवत असेल की आम्ही किती आनंद लुटला. आनंदाचा काळ. किंवा खरंतर, वेळ सहज निघून गेला. पण माझ्या कथेच्या गोषवाऱ्याकडे परत येताना मी खूप थकून व खूप उशिराने परतलो. काही मित्रमैत्रिणींकडे जाण्याआधी मला कपडे बदलायला व जेवायला फारच थोडा वेळ मिळाला होता. एका कुटुंबाकडे, जिथे संध्याकाळची पत्ते खेळायची पार्टी सुरू होती तिथे मी थांबलो होतो, पहाटे अडीच वाजेपर्यंत खेळत होतो. मी एकशे पन्नास फ्रँक जिंकले व खूप आनंदाने घरी गेलो. परिणामी, मी हलक्या मनाने झोपी गेलो आणि लगेच मला झोप

लागली, दिवसभराचा थकवा हा त्यात काही छोटासा घटक नव्हता.

मला झोप लागताच, माझ्यासोबत काहीतरी विचित्र घडले. मला खोलीत एक लाईट दिसली व मी झोपायच्या आधी ती का बंद केली नाही याचा विचार करत होतो, तेव्हा मला खोलीच्या मागून काहीतरी येताना दिसले – माझी खोली बरीच मोठी होती – दाराच्या जागेवरून, एक माणूस, ज्याला मी लगेच ओळखले. त्याने तेच काळे कपडे व तीच जुनी स्ट्रॉ हॅट घातली होती. पण तो नाराज दिसला व मला म्हणाला: 'मी आज दुपारपासून चार वाजेपर्यंत कॅफेमध्ये तुझी वाट पाहत होतो. तू का नाही आलास? मी तुझे नशीब चमकवण्याची ऑफर देतो, परंतु तुला घाई नाही का? मी आज दुपारी कॅफेमध्ये पुन्हा तुझी वाट पाहीन, दुपारपासून चारपर्यंत. येण्यास चुकू नकोस.' त्यानंतर तो मागच्या वेळेप्रमाणे गायब झाला.

पण यावेळी मी घाबरून उठलो. खोलीत अंधार होता. मी लाईट चालू केली. स्वप्न इतकं खरं होतं, इतकं ज्वलंत होतं की त्याने मला चकित केलं आणि हादरवून सोडलं. दाराला कुलूप आहे की नाही हे मी घाबरत घाबरत पाहिले. नेहमीप्रमाणे कुलूप होते. मी घड्याळाकडे पाहिले. साडेतीन वाजले होते. मी तीन वाजता झोपायला गेलो होतो.

मी तुमच्यापासून लपवणार नाही, आणि मी खूप घाबरलो होतो हे तुमच्यासमोर कबूल करण्यास मला लाज वाटत नाही. मी माझे डोळे बंद करायला घाबरत होतो, कदाचित मी पुन्हा झोपी जाईन व माझ्या विलक्षण पाहुण्याला पुन्हा भेटेन. मी खुर्चीत बसून राहिलो, माझ्या नसा ताणल्या गेल्या. पाचच्या सुमारास दिवस उजाडायला लागला. मी खिडकी उघडली व हळूहळू जाग येणारा रस्ता मी पाहिला. काही दरवाजे उघडले होते आणि अगदी लवकर जाणारे काही दूधवाले व बेकरच्या गाड्या तेथून जात होत्या. प्रकाशाने कसा तरी मी शांत झालो व अंथरुणावर परतलो आणि नऊपर्यंत झोपलो.

जेव्हा मी नऊ वाजता उठलो व मला रात्रीची भीती आठवली, तेव्हा तिची तीव्रता कमी झाली होती. खरंच, मला आश्चर्य वाटलं की मी इतका अस्वस्थ झालो होतो. प्रत्येकाला भयस्वप्ने पडतात व माझ्या आयुष्यात अनेकदा पडली होती. परंतु, हे क्वचितच एक भयस्वप्न होते. मला दोनदा एकच स्वप्न पडले होते हे खरे आहे. त्याचं काय? सुरुवातीला, मला स्वतःला ते स्वप्न दोनदा पाहिल्याची खात्री होती का? मी पूर्वी तोच माणूस पाहिला आहे, असे मला स्वप्नात वाटले नाही का? पण माझ्या स्मरणशक्तीचे बारकाईने परीक्षण केल्यावर मी हा समज फेटाळून लावला. मला खात्री होती की मला दोन रात्री स्वप्न पडले होते. तरीही त्यात विचित्र काय होते? असे दिसते की पहिले स्वप्न खूप ज्वलंत होते व त्याने माझ्यावर इतका खोल ठसा उमटवला होता की मला ते पुन्हा दिसले. इथे मात्र माझ्या तर्काला अडचण आली. कारण पहिल्या स्वप्नाने माझ्यावर छाप पाडल्याचे मला आठवत नव्हते. आदल्या दिवशी मी क्षणभरही विचार केला नव्हता. संध्याकाळी आउटिंग व रिसेप्शन दरम्यान मी स्वप्न सोडून इतर सर्व गोष्टींचा विचार केला. त्याचं काय? अनेकदा असे घडत नाही का की, आपण अशा व्यक्तींची स्वप्ने पाहतो, ज्यांना आपण अनेक वर्षांपासून पाहिले नाही किंवा ज्यांचा आपण अनेक वर्षांपासून विचारही केला नाही? असे दिसते की त्यांची स्मृती आत्म्याच्या आत कुठेतरी कोरलेली राहते व अचानक स्वप्नात पुन्हा प्रकट होते. मग, मी दिवसभरात विचार केला नसला तरीही मी चोवीस तासांच्या अवकाशात तेच स्वप्न पाहण्यात काय विचित्र होते? मी पुढे स्वतःला सांगितले की कदाचित मी लपविलेल्या खजिन्याबद्दल वाचले आहे व हे गुप्तपणे माझ्या स्मरणशक्तीवर कार्य करत आहे. पण मी कितीही शोधले तरी मला असा कोणताही उतारा सापडला नाही.

शेवटी मी विचार करून थकलो व कपडे घालू लागलो. मला एका लग्नाला हजेरी लावायची होती, आणि माझी घाई व मी काय परिधान करेन या विचारांच्या एकाग्रतेने माझ्या मनातून स्वप्न पूर्णपणे काढून टाकले. मग मी माझ्या नाश्त्याला बसलो. जर्मनीत प्रकाशित नियतकालिक उचलले व तासभर वाचले – 'हेस्पेरस,' मला नक्की माहीत आहे.

मी लग्नाला गेलो होतो, जिथे शहरातील सर्व फॅशनेबल समाज एकत्र आला होता. त्या वेळी माझ्या अनेक ओळखी होत्या व त्यामुळे समारंभानंतर मी अनेक वेळा पुनरावृत्ती केली की वधू खूप सुंदर होती, फक्त थोडीशी फिकट गुलाबी होती, वर एक चांगला तरुण होता, तसेच श्रीमंत होता आणि यासारखेच काहीतरी मी बोललो. सकाळी अकराच्या सुमारास लग्न उरकले. जेव्हा ते संपले, तेव्हा मी बुल्केले स्टेशनवर एक घर पाहण्यासाठी गेलो, ज्याची मला शिफारस करण्यात आली होती व मी ते कैरो येथील एका जर्मन कुटुंबासाठी भाड्याने घेणार होतो, जे अलेक्झांड्रियामध्ये उन्हाळा घालवण्याचा विचार करत होते. घर खरे तर हवेशीर व व्यवस्थित होते, पण मला सांगितले होते तितके मोठे नव्हते. त्याचप्रमाणे, मी त्याच्या मालकिणीला ती योग्य जागा म्हणून शिफारस करण्याचे वचन दिले. तिने माझे मनापासून आभार मानले व मला दया वाटावी म्हणून तिने तिचे सर्व दुर्दैव माझ्याशी उघड केले – तिचा दिवंगत नवरा कसा व केव्हा मरण पावला, तिने युरोपलाही कशी भेट दिली, ती घर भाड्याने देणाऱ्यांपैकी कशी नव्हती, तिचे वडील कसे होते, कुठल्या हुद्द्याचे वगैरे डॉक्टर होते ते आठवत नाही. ही जबाबदारी पूर्ण करून मी शहरात परतलो. दुपारी एक वाजता मी घरी पोचलो व मनसोक्त जेवलो. दुपारचे जेवण करून कॉफी प्यायल्यानंतर, मी पॅराडाईज कॅफेजवळील एका हॉटेलमध्ये राहणाऱ्या माझ्या मित्राला भेटायला गेलो, जेणेकरून आम्ही दुपारसाठी काहीतरी व्यवस्था करू शकू. ऑगस्टचा महिना होता व कडक ऊन पडले होते. घाम येऊ नये म्हणून मी शेरीफ पाशा रस्त्यावरून हळूहळू चालत होतो. नेहमीप्रमाणे या वेळीही रस्ता निर्मनुष्य होता. मला फक्त एक वकील भेटला, ज्याच्याशी मी मोहरेम बे मधील छोट्या प्लॉटच्या विक्रीशी संबंधित व्यवहार करत होतो. एका मोठ्या ग्राउंड–प्लॉटचा तो शेवटचा तुकडा होता, जो मी थोडा–थोडा विकत होतो, अशा प्रकारे माझ्या खर्चाचा काही भाग भागवत होतो. वकील एक प्रामाणिक माणूस होता आणि म्हणूनच मी त्याची निवड केली. फक्त तो बोलका होता. त्याच्या बोलघेवडेपणाने मला त्रास देण्यापेक्षा त्याने माझी थोडी फसवणूक केली तरी चालले असते. थोड्याशा बहाण्याने त्याने अंतहीन वादविवाद सुरू केला – तो माझ्याशी व्यावसायिक कायद्याबद्दल, रोमन कायद्याबद्दल बोलला, अनेक इतर कायदे, स्मिर्नाच्या त्याच्या जुन्या खटल्यांचा त्याने उल्लेख केला, स्वत: ची प्रशंसा केली, मला हजारो तितक्याच असंबद्ध गोष्टी समजावून सांगितल्या व सर्व वेळ माझे कपडे घट्ट धरून बोलत राहिला, ज्याचा मला तिरस्कार वाटला. मला या हास्यास्पद व्यक्तीची बडबड सहन करणे भाग पडले, कारण प्रत्येक वेळी जेव्हा त्याची बडबड चालू असायची, तेव्हा मी माझ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या विक्रीबद्दल विचारत असे. हे प्रयत्न मला माझ्या मार्गातून दूर नेत होते, पण मी त्याच्यासोबत राहिलो. आम्ही कॉन्सुल स्क्वेअरवरील स्टॉक एक्स्चेंजचा फूटपाथ पार केला, मोठ्या आणि लहान चौकाला जोडणारा छोटा रस्ता पार केला व शेवटी स्मॉल स्क्वेअरच्या मध्यभागी पोचलो, तेव्हा मला हवी असलेली सर्व माहिती मिळाली आणि माझ्या वकिलाला आठवले की त्याला त्या परिसरात राहणाऱ्या एका क्लायंटला फोन करायचा होता, त्याने माझी रजा घेतली. मी क्षणभर उभा राहिलो व त्याला मागे जाताना पाहत राहिलो, त्याच्या बडबडण्याला शिव्याशाप देत, ज्याने मला प्रचंड उष्मा व उन्हात माझ्या मार्गापासून दूर नेले होते.

मी माझी पावले मागे घेत पॅराडाईज कॅफे स्ट्रीटवर चालत होतो, तेव्हा अचानक मी स्मॉल स्क्वेअरमध्ये असावे ही कल्पना मला विचित्र वाटली. मी स्वतःलाच विचारले, मग मला माझे स्वप्न आठवले. 'इथेच खजिन्याच्या प्रसिद्ध मालकाने मला त्याला भेटायला सांगितले होते,' मी स्वतःशीच विचार केला व हसलो आणि यांत्रिकपणे मी काही लोहारांच्या दुकानांच्या जागेकडे डोके वळवले.

भयानक! एक छोटासा कॅफे होता व तिथे तो बसला होता. माझी पहिली प्रतिक्रिया म्हणून मला एक प्रकारची चक्कर आली व मला वाटले की मी खाली पडणार आहे. मी एका स्टॉलकडे झुकलो व पुन्हा त्याच्याकडे पाहिले. तेच काळे कपडे, तीच स्ट्रॉ हॅट, तीच वैशिष्ट्ये, तीच नजर. तो माझ्याकडे टक लावून पाहत होता. माझ्या नसा इतक्या कडक झाल्या की मला वाटले की माझ्यामध्ये वितळलेले लोखंड ओतले गेले आहे. दुपारची वेळ होती. ही कल्पना

– लोक बेफिकीर व असाधारण काहीही घडत नसल्याच्या समजुतीने जात राहिले, तर मला, फक्त मलाच माहीत होते की सर्वात भयानक गोष्ट घडत आहे, तिथे एक भूत बसले आहे, ज्याचा माझ्यावर ताबा आहे. मला माहीत आहे की ती कसली शक्ती आणि कोणत्या नरकापासून उद्भवली आहे, अंधाऱ्या शक्तीने मला जणू पक्षाघात केला व मी थरथर कापू लागलो. भुताने माझ्यावरून नजर हटवली नाही. तो माझ्याशी बोलू नये, मला सोबत घेऊन जाऊ नये, आणि त्याच्याविरुद्ध माझ्या बचावासाठी कोणती मानवी शक्ती येऊ शकते, या भीतीने मी आता घाबरलो होतो! गाडीवानाला कोणता तरी पत्ता देऊन मी जवळ असलेल्या एका गाडीत स्वतःला झोकून दिले, कुठल्या पत्त्यावर ते मला आठवत नाही.

जेव्हा मी स्वतःला थोडंसं सावरलं, तेव्हा मला दिसलं की आम्ही जवळजवळ सिदी गबीर येथे पोचलो होतो. जरा शांत होऊन मी ते प्रकरण तपासायला सुरुवात केली. मी गाडीवानाला शहरात परत जाण्याचा आदेश दिला. 'मी वेडा आहे,' मला वाटले, 'नक्कीच माझी चूक झाली होती. माझ्या स्वप्नातल्या माणसाशी साम्य असणारे कोणीतरी असावे. निश्चितपणे शोधण्यासाठी मला परत जावे लागेल. सर्व संभाव्यतेनुसार तो निघून गेला आहे आणि हा पुरावा असेल की तो तोच माणूस नव्हता, कारण त्याने मला सांगितले होते की तो चार वाजेपर्यंत माझी वाट पाहील.

या विचारांनी मी झिझिनिया थिएटरमध्ये पोचलो; व तिथे, माझे सर्व धैर्य गोळा करून, मी ड्रायव्हरला मला स्मॉल स्क्वेअरवर नेण्याचा आदेश दिला. जसजसे आम्ही कॅफेजवळ आलो, तसतसे मला माझे हृदय धडधडत असल्याचे जाणवले. मी ड्रायव्हरला त्याच्यापासून थोड्या अंतरावर थांबवले, त्याचा हात इतका हिंसकपणे ओढला की तो जवळजवळ त्याच्या सीटवरून खाली पडला, कारण मी पाहिले की तो कॅफेच्या अगदी जवळ आला होता आणि कारण... कारण भूत अजूनही तिथे होते.

मग मी त्याची जवळून छाननी करायला सुरुवात केली, स्वप्नातल्या माणसाशी काही वेगळेपणा शोधण्याचा प्रयत्न केला, जणू काही मी गाडीत बसलोय व त्याची बारकाईने छाननी करतोय – इतर कोणीही त्याचा चुकीचा अर्थ लावला असता व स्पष्टीकरणाची मागणी केली असती. तो – तोच होता हे मला पटवून देण्यासाठी एवढेच पुरेसे नव्हते. त्याउलट, त्याने तितक्याच बारकाईने माझ्याकडे टक लावून पाहिलं व मला जो निर्णय घ्यायचा सामना करावा लागला होता, त्याबद्दल उत्सुकतेने भरलेल्या चेहऱ्याने त्याने माझ्या नजरेला नजर भिडवली. मला असे वाटले की त्याने माझे विचार अंतर्ज्ञानाने जाणले आहेत, जसे त्याने माझ्या स्वप्नात अंतर्ज्ञानाने ते जाणले होते, व त्याच्या ओळखीबद्दल कोणतीही शंका दूर करण्यासाठी, त्याने त्याचा डावा हात माझ्याकडे वळवला आणि मला स्पर्श केला – माझ्या पहिल्या स्वप्नात मला प्रभावित करणारी पाचूची अंगठी मला इतक्या स्पष्टपणे दाखवली की मला भीती वाटली की ते गाडीवानाच्या लक्षात येईल.

मी घाबरून ओरडलो व गाडीवानाला – ज्याला आता माझ्या प्रकृतीबद्दल चिंता वाटू लागली होती, मला रमाल्लाह अव्हेन्यूकडे नेण्यास सांगितले. तिथून दूर जाणे हेच माझे ध्येय होते. जेव्हा आम्ही रमाल्लाह अव्हेन्यूला पोचलो, तेव्हा मी त्याला सेंट स्टीफन्सकडे जाण्यास सांगितले, परंतु मी पाहिले की गाडीवान संकोच करत होता आणि स्वतः कुडकुडत होता, मी गाडीच्या बाहेर पडलो व त्याला पैसे दिले. मी दुसरी गाडी थांबवली व ती मला सेंट स्टीफनला घेऊन गेली.

मी भयंकर अवस्थेत तिथे पोचलो, कॅसिनोच्या मुख्य हॉलमध्ये प्रवेश केला व स्वतःला आरशात पाहून घाबरलो. मी प्रेतासारखा फिका पडलो होतो. सुदैवाने मुख्य हॉल रिकामा होता. मी एका दिवाणावर पडलो व आता काय करायचे, याचा विचार करू लागलो. पुन्हा घरी परतणे अशक्य होते. अलौकिक सावलीच्या रूपात ज्या खोलीत त्याने प्रवेश केला होता त्या खोलीत परत जाणे, ज्याला मी थोड्या वेळापूर्वी एका सामान्य कॅफेमध्ये वास्तविक माणसाच्या रूपात बसलेले पाहिले होते, हा प्रश्नच नव्हता. मी अतार्किक होतो, अर्थातच मला कुठेही

मारण्याची शक्ती त्याच्याकडे होती. पण आतापासूनच काही काळ मी विसंगत विचार करत होतो.

शेवटी मी निर्णयावर आलो. हे सारे माझा मित्र जी. व्ही याला कळवायचे, जो त्यावेळी मोहरेम बे येथे राहत होता.

''कोणता जी. व्ही.'', मी विचारले, ''तो विलक्षण, जो जादूचा अभ्यास करण्यात आपला वेळ घालवणारा?''

''अगदी बरोबर – आणि या निर्णयाने माझ्या निवडीत एक भूमिका बजावली. मी ट्रेन कशी पकडली, मी मोहरेम बे येथे कसा पोचलो, माझ्या शेजारी भूत पुन्हा येईल या भीतीने वेड्यासारखे उजवीकडे आणि डावीकडे पाहत, मी जीव्हीच्या खोलीत कसा अडखळत पोचलो – मला फक्त तेवढेच हलकेसे व गोंधळलेले आठवते. मला स्पष्टपणे आठवते की मी त्याला भेटलो, तेव्हा मी उन्मादाने रडायला लागलो व माझ्या भयंकर साहसाबद्दल त्याला सांगताना थरथर कापू लागलो. जी. व्ही ने मला शांत केले व काहीशा गंभीरपणे, काहीशा विनोदाने, मला घाबरू नकोस असे सांगितले; की कोणताही सैतान त्याच्या घरात घुसण्याची हिंमत करणार नाही, किंवा त्याने असे केले तरी तो लगेचच त्याचा पाठलाग करेल. तो म्हणाला, या प्रकारच्या अलौकिक दृश्यांशी तो परिचित होता व ते कसे निस्तरायचे हे त्याला माहीत होते. त्याने मला विश्वास ठेवण्याची विनंती केली की यापुढे घाबरण्याचे कारण नाही, कारण सैतान माझ्याकडे एका विशिष्ट हेतूने आला होता – लोखंडी पेटी मिळवणे, जे उघडपणे, माझ्या उपस्थितीशिवाय मिळवणे त्याच्या सामर्थ्यात नव्हते. माणसाची मदत त्याला हवी होती. त्याने हे उद्दिष्ट साध्य केले नव्हते व माझ्या दहशतीवरून त्याला आधीच कळले असेल की ते साध्य होण्याची आता कोणतीही आशा नाही. तो निःसंशयपणे दुसऱ्याचे मन वळवायचा प्रयत्न करेल. जी. व्ही.ला फक्त खंत होती की मी त्याला मध्यस्थी करण्यासाठी वेळेत कळवले नाही, जेणेकरून त्याने स्वतः त्या सैतानाला पाहिले असते आणि त्याच्याशी तो बोलला असता; कारण, तो पुढे म्हणाला, इतिहासात, दिवसाउजेडी हे आत्मे किंवा राक्षसांचे दर्शन अत्यंत दुर्मीळ आहे. पण मला यापैकी काहीही आश्वासक वाटले नाही. मी खूप अस्वस्थ रात्र घालवली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मला तापाने जाग आली. डॉक्टरांचे अज्ञान आणि माझ्या मज्जासंस्थेची उत्तेजना हे सेरेब्रल तापाचे कारण होते, ज्यातून मी जवळजवळ मेलोच असतो. जरा सावरल्यावर कोणता दिवस आहे हे जाणून घेण्यासाठी विचारलं. मी तीन ऑगस्टला आजारी पडलो होतो आणि ती सात किंवा आठ तारीख असावी असे गृहीत धरले होते. पण तो सप्टेंबरचा दुसरा दिवस होता.

एजियनमधील एका बेटावरच्या एका छोट्या सहलीने माझे बरे होण्याचे काम लवकर पूर्ण केले. माझ्या आजारपणाच्या संपूर्ण कालावधीत मी माझा मित्र जी. व्ही. याच्या घरी राहिलो, ज्याने दयाळूपणे माझी काळजी घेतली. तथापी, डॉक्टरांना डिसमिस करण्यासाठी जादूद्वारे मला बरे करण्याइतपत शक्ती त्याच्याकडे नसल्यामुळे तो स्वत: वर चिडला होता, याचा मला विश्वास आहे, निदान या प्रसंगात तरी डॉक्टरांनी जितक्या लवकर मला बरे केले असते, तितक्याच लवकर त्यानेही मला बरे केले असते.

पाहा, माझ्या मित्रांनो, मला करोडपती होण्याची संधी मिळाली होती – पण मी हिम्मत केली नाही. मी हिम्मत केली नाही व मला त्याबद्दल खेद वाटत नाही.''

इथे अलेक्झांडर थांबला. खोल विश्वासाने आणि अत्यंत साधेपणाने त्यांने त्याची कथा सांगितली होती त्यामुळे आम्हाला त्याबद्दल कोणतीही प्रतिक्रिया देण्यास मनाई होती. शिवाय, मध्यरात्रीची बारा वाजून सत्तावीस मिनिटे झाली होती. आणि शहरासाठी शेवटची ट्रेन बारा–तीस वाजता निघत असल्याने, आम्हाला त्याचा निरोप घेणे आणि घाईघाईने निघून जाणे भाग पडले.



# मनोगत
## राजेंद्र आनंदराव पाटील (पारा)

जेव्हा मी माझ्या कलानिर्मिती प्रक्रियेबद्दल विचार व्यक्त करतो, तेव्हा माझा अनुभव, माझी समज व मी जेव्हा मी माझ्या कलानिर्मिती प्रक्रियेबद्दल विचार व्यक्त करतो, तेव्हा माझा अनुभव, माझी समज व माझे संचित, विविध घटनांची पार्श्वभूमी, माझी अनुभूती, माझं आकलन व त्यानुसार माझी जी धारणानिश्चिती झालेली आहे, त्यानुरूप माझी विचारांची बैठक ठरत असते, असे मला वाटते.



जसाजसा हा विचार विस्तारू लागतो, तेव्हा त्याला अनेक अंगांनी समजून घेत कलेतून एकसंध, एकत्रित फॉर्म प्रस्थापित करताना, दृश्यकलेतील त्या विचारदर्शनाला एक विशिष्ट असा तुमचा स्वतःचा अंगभूत सृजनआकार प्राप्त होत असतो आणि त्या अनुषंगाने पूरक असे दृक्अभिव्यक्तीचे चिंतनस्वरूप विधान निर्माण होण्यासाठी आवश्यक मनोभावना तयार होत असते.

माझा कलेचा भाव-आविष्कार हा एखादा विशिष्ट असा आशयगर्भित अर्थ असतो की, जो व्यक्तिगत स्वरूपात जरी समोर येत असला, तरी त्याचा आविष्कार हा त्या विषयापुरता मर्यादित राहत नाही, तर त्यात एक सर्वसमावेशक सामजिक बांधिलकीचे भानही असते.

जसाजसा हा विचार एका शृंखला रूपाने पुनरावृत्त होऊन एक अधोरेखित दृक्श्राव्य भाव व विशिष्ट अशी जाणीव निर्माण करतो तर त्यात अनेक दशकांची, शतकांची एक वैचारिक वहिवाट असते आणि त्याची मांडणी करताना जे काही प्रस्थापित कालातीत असे कलेचे समकालीन मूल्य आहे, त्याला धरून माझ्या व्यक्तिगत अनुभवक्षमता वा त्या कक्षेपलीकडे जात विविध प्रकारच्या कल्पना आणि वास्तव संस्कार व स्मरणाच्या आधारभूत संरचना ह्यांच्या आधारे एकाच प्रकारच्या लयबद्ध शैलीमध्ये मी ते साकारत जातो, प्रस्थापित करतो. आणि हे करतेवेळी त्यातून आपसूकच एक आधुनिक अलंकरण व एक सरलतापूर्वक पूरक दृश्यभाव निर्माण होतो; अभिव्यक्त होतो असे मला वाटते.

जीवनातील असे अनेक सामूहिक आणि व्यक्तिगत अनुभव विविध पातळ्यांवर कलेतून जेव्हा विचारदर्शन

घडवतात, प्रवर्तित होतात, तेव्हा एका प्रस्तुतीच्या प्रसूतीची प्रक्रिया सुरू होते, त्यात अनेक अंगांनी त्या विविध प्रवृत्ती, प्रारूप कला-कृतिजन्य कामातून समान आकार, ध्वनी दार्शनिक अंगाने समोर येतो आणि तो विचार पुढे जातो.

माझी चित्रं, कलाकृती तयार होत असताना, किंबहुना ती प्रक्रिया सुरू होताना प्रथमदर्शनी विशेष काही निश्चित असा एक विषय नसतो, परंतु हळूहळू त्यात त्या त्या वेळी होणाऱ्या नियमित कृतीतून विविध, अनंत अशा कालखंडातील घटितांची विविध अवतरणे व त्याचे प्रातिनिधिक आकार, त्यांचे प्रत्यावहन हे निरंतर सुरू राहते. त्या घटितांचे दृक्पटलावर रूपांतरण करताना अनेकदा नित्य वर अनित्याचे पांघरूण घालीत व त्यातून अभिप्रेत असलेली अनेकविध रूपे ही स्मृति-पटलावरून चित्र अवकाशात अवतरत असतात.



त्यातील प्रखर परिणामकारक खुणा ह्या विशिष्ट असा अर्थरूप धारण करत आपल्या अस्तित्वाला पुनःपुन्हा पुनरावृत्त करत लयात्मकतेसह ठोस असा अर्थ प्रस्थापित करत असतात. हे करताना काही आकारखुणांवर विशेष असे अपेक्षित संस्कार हे होत असतातच. त्यावर फुंकर घातली की ते आपल्या धगधगत्या निखर अस्तित्वाची जाणीव करून देतात. आणि त्या अस्तित्वाच्या चाहूलखुणा ह्या निश्चित अशा निरन्तर रूपकातून चित्रात आविष्कार व कार्यकारणभाव निर्माण करतात.

अशी अप्रातिनिधिक स्वरूपाची अमूर्तन प्रस्तुती ही 'सत्' कला, वा सद्भावना देणारी कृती असते, त्यातून विश्वजनकला निर्माण होते, अशी माझी समजूत आहे.

ह्या अशा क्रिया-प्रक्रिया ह्या माझ्या चित्रप्रक्रियेच्या गाभ्यात असाव्यात.

माध्यम आणि विषय ह्यातील तादात्म्य आणि मांडणीचे सामर्थ्य, पोताचे व रंगांचे उपयोजन, त्या त्या रचनेचे अंगभूत स्वरूप अशा संयोगातून एक निर्विवाद चित्र साकार होत असते.

माझ्या कलानिर्मितीप्रक्रियेत प्रमुख्याने मानवी उत्क्रांतीचा सिद्धांत व विविध मानवी प्रवृत्ती, शारीरिक ज्ञानेंद्रिये यांचा अबोध संस्कार व भावनेचा आविष्कार यांना प्राधान्यक्रम असतो. आकारांच्या सृजनाला अंतर्मनाची साथ असली तर अभिव्यक्ती थेट मनाचा ठाव घेण्याची शक्यता वाढत असते, हे विसरून चालणार नाही.

जशी समाजात काळानुरूप जरी अनेक स्थित्यंतरे घडून आली असली तरी त्यातली शिल्लक, टिकणारे, शाश्वत हे अंगभूतपणे उभे असते, शेवटी 'शिल्लक असणे' हे एक प्रकारचे बीजस्वरूप अस्तित्व आहे.

एरवी दैनंदिन जीवनात, रोजच्या आयुष्यात अनेक घटना घडत असतात, त्यात हिंसा, अनर्थ, न्याय-अन्याय, उत्सव, अशी विविध घटिते होत असतात. त्या सगळ्यांवर वारंवार कलेतून प्रतिक्रिया देणे हे कुठल्याही कलावंताचे नित्यकर्तव्य अजिबात नाही.

हे उंटावरून शेळ्या हाकण्यासारखे होईल.परंतु सजगतेने आत्मभान निर्माण करणे, साक्षी असणे, त्या त्या घटनेवर प्रतिक्रिया देणे, उत्सुकता दर्शविणे हे मात्र एक व्यक्ती म्हणून गरजेचे आहे.

माझ्या चित्रप्रक्रियेचा उद्देश हा समाजाला सुखकारक दृक् अनुभव देणे आणि दुःख वा भीती आणि आशे-निराशेतील द्वंद्व, आदींवर एक उपचारक भाव व्यक्त करणे हा आहे असे म्हणता येईल.

शेवटी चित्रकारांकरिता चित्रनिर्मिती ही एक साधीशी बाब आहे. ती निश्चित निरंतरपणे नोंदविणे ही कलावंताची एक जमेची बाजू आहे.

माझ्या चित्रनिर्मितीमध्ये माध्यमाच्या अंगाने विचार करताना माझा विषय विचार ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. माझा भावाविष्कार हा एका अर्थाने भोवतालच्या घटितांचा परिपाक आहे व माध्यमाच्या शक्यतांतून होणाऱ्या परिणामाला प्रवाहीपणे अभिव्यक्त होण्यासाठी जो आवश्यक असा अवकाश मला अपेक्षित असतो तो मी संशोधित करत जातो. त्या प्रक्रियेत हा एक अमर्याद शक्यतांचा प्रदेश आहे अशी जाणीव मला नेहमीच होते.

व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न करीत असताना जो काही अनुभव मला येत असतो, तोच माझ्या चित्रांचा विषय असतो असे मला वाटते.



शेवटी चित्र ही साधी सरळ क्रिया आहे ज्यात तुम्ही असता, हे सत्य पाहणाऱ्याला जाणवणे हेच खरे अपेक्षित आहे.

माझ्या कलेची मांडणी ही भय आणि आशा ह्या जीवनातील दोन परिमाणांवर आधारित असते. भय आणि आशा ह्या बाजू मानवी जीवनाच्या उत्क्रांतीच्या विविध टप्प्यात प्रकट होतात, त्या विविध प्रकारच्या बदलांची ती नोंद असते असेही म्हणता येईल. चांगल्या-वाईट भावभावना आणि वर्तन आदींचा जीवनावर जो काही बरा-वाईट परिणाम होतो, त्या स्वरूपात कलावंतांना विषयबोध होतो. कलेच्या माध्यमातून अनंत काळापासून जीवन हे कसे विकसित होत असते, हे आपणास दिसते. त्यात त्या त्या काळातील मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांवर, त्या त्या संस्कृतींमध्ये त्या त्या समकालीन जीवनपद्धतीत व कलेत हे प्रतिबिंब दिसत असते हे आपणास माहीतच आहे.

माझ्यावर एका विशिष्ट अशा ग्रामीण व नंतर शहरी जीवनानुभवाचा, अनौपचारिक ज्ञान, कलासंस्थांतील शिक्षण, कलासंस्कार, विविध कलावंतांचे, गुरुजनांचे ज्ञानदान यांचा संस्कार आहे

आणि त्यामुळे माझा जो कलाप्रवास आहे तो हे सगळे अनुभव घेताना केलेली भावनेची अभिव्यक्ती, कलाविष्कार हेच माझे चित्र आहे. मी व माझे कलाकथानक त्याचा तपशील ह्याबाबत थोडक्यात असे म्हणता येईल की– माझी कला हेच माझे विधानआहे.

कला शाखेच्या अदम्य आकलनासह स्मृतिमार्गाच्या आंतरिक असलेल्या समजातून मी जे निर्माण केले आहे, जे वेळ, काळ आणि अवकाश यांमधील एक पद्धती म्हणून ते विकसित झालेले आहे.

ते स्वरूप मी माझी कला शैली किंवा विधान म्हणून मी जेव्हा व्यक्त करतो, त्यात दैनंदिन जीवनातील जे काही भौतिक, वास्तविक परिमाण आहे आणि त्याची आध्यात्मिक, सौंदर्यात्मक अनुभूती, कलेत रूपांतरित होण्याची त्यांची क्षमता ही माझ्या दृष्टीचा एक अविभाज्य भाग आहे. ज्यामध्ये तैलचित्र, ॲक्रेलिक, मेटल कास्टिंग, टेराकोटा, मिरर ग्लास इन्स्टॉलेशन आणि डिजिटल इंटरफेस यांसारख्या विविध माध्यमांचा समावेश आहे. ज्याचे मी स्वतः तयार केलेल्या दृक्‌भाषेद्वारे प्रतिनिधित्व केले जाते.जीवनातील द्वैत–अद्वैत हे व्यक्त व अव्यक्त अमूर्ततेचे, वास्तवावर आधारित असे ठोस चिंतनस्वरूप रूपदर्शन आहे.

माझ्या चित्र किंवा शिल्पांमध्ये ज्याप्रमाणे साधनांची उपस्थिती हे विधान साधन म्हणून अत्यंत महत्त्वाचे आहे, मग ती प्राथमिक शेतीची उपकरणे असोत, यांत्रिक साधने असोत किंवा कारागिरांची अवजारे असोत, मानवजातीच्या सांस्कृतिक अस्तित्वाचा एक उंबरठा म्हणून ते आकार काम करतात, जे त्या घटनेची शक्ती वाढवण्यास आणि अप्रत्यक्ष निसर्गाचे रूपांतर करण्यास सक्षम आहेत.

मी अंतिम सार्वत्रिक दृष्टिकोनातून रंग आणि अवकाश आकारांची चित्रभाषा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. ज्यात कलेची गुणवत्ता ही शब्दांच्या पलीकडे आणि सौंदर्याच्या अनुभूतीवर असते, त्रोटक अनुभवाच्या पलीकडे जाऊन वैयक्तिक पातळीवर सातत्याने चिंतनशील राहण्याचा माझा प्रयत्न आहे. आशा, भीती आणि विश्वास यांच्या जीवनातील कथानकाच्या पलीकडचं हे रूपकात्मकपणे होणारं नाट्यमय अवतरण आहे.

कला वैयक्तिक दृष्टिकोनाच्या पलीकडे आहे. ही कलाकल्पना आणि दृश्य परिणाम हे माझ्या धारणेशी आणि ज्या अनुबंधाची मी मांडणी करतो, हे त्या त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ते ते आधारित असते. ती अशी प्रस्तुती असते की, ज्या परिणामस्वरूप एक उतरंड रचना रचली जाते व ही रचना त्या त्या निर्मात्याच्या प्रकृतीवर अवलंबून असते. तसेच अव्यक्त आशय हा कसा अधोरेखित करता येईल, यावर अमूर्तन संकल्पना अवलंबून असतात. अनेक अनुभव, घटना, मूल्य आणि अवमूल्यन, बरी–वाईट आणि विविध घटितं ही व्यक्तिगत पातळीवर अनुभवून खोलवर रुजल्यावर त्यातून ज्या भावभावना निर्माण होतात, त्या सर्जनशील पद्धतीनं कशा रीतीने उपचारक आणि आनंददायी करता येतील, हे स्वतःच स्वतःला दिलेले आव्हान असते. त्याला स्वाध्यायाचा एक प्रयोग असेही म्हणता येईल.

दृक् अनुभव हा प्रस्तुत रूपकात शृंखला–रीतीने मांडणे अपेक्षित असते. ती शैलीची गरज असते. तुमची स्वतःची एक कलाभाषा निर्माण होत असते. त्यातून अपेक्षित आशय हा सकसपणे सौंदर्यपूर्वक रीतीने पोचवणे अपेक्षित आहे. जसे की, संगीतामध्ये, लोकसंगीत, कंट्रीसाईड संगीत ट्यून व लयकरी किंवा Mozart, यांचे परिणामस्वरूप म्हणून निर्माण होणारे जे संगीत असते, त्यात ज्याप्रमाणे भारतीय संगीतामधील परंपरा ह्या जशा विषयासंदर्भात पूरकतापूर्वक असतात आणि आशयगौणत्वावर आधारित असतात, तशाच पार्श्वभूमीवर अमूर्त कलेत एक प्रकारचा एक अप्रत्यक्ष व्यापक अर्थ हा या अमूर्तन कला प्रकारात असतो. ज्याला व्यक्त–अव्यक्ताचा सर्जक मूलाधार आहे तोच कल हा माझ्या चित्रं व शिल्प कामांमध्ये आहे. विस्तारित अनुभव हा एकसंध रूपानं सौंदर्यभाव निर्माण करताना नेणिवेतील विविध साधने, अवजारे हे प्रातिनिधिक होऊन जातात. चित्रपटलावर अधिराज्य करणारे एक रूपदर्शन घडवितात.



# नोम चॉम्स्की : भाषेबद्दल अपारंपरिक दृष्टिकोन

दीपक बोरगावे

(नोम चॉम्स्की (७ डिसेंबर १९२८) यांना ७ डिसेंबर २०२३ या दिवशी ९५ वर्षे पूर्ण होत आहेत. भाषा आणि मन यांचे नातेसंबंध काय आहेत? जाणिवेच्या तळाशी भाषेचे नेमके काय चाललेले असते? मौनातही ही भाषा असते का? फॅसिस्ट संस्कृतीत भाषा कोणती भूमिका बजावते? भाषा आणि साम्राज्यवाद यांचे काही नाते आहे का? लहान मूल भाषा शिकत असताना (भाषाप्राप्ती करत असताना in the process of language acquisition) कुटुंब, समाज, भवतालचे राजकारण, एकूणच 'सांस्कृतिक व्यवस्था' कशी वापरात आणली जाते– मग ती लहान मुलाचे साहित्य असो, अकबर-बिरबल यांच्या गोष्टी असोत, सामाजिक माध्यमातून वापरली जाणारी भाषा असो, नैतिकतेच्या आवरणाखाली केले जाणारे भाष्य असो, कवितेत किंवा सर्जनात्मक लेखनात गुरफटलेलीही भाषा असो... या प्रत्येक अंगाबद्दल नोम चॉम्स्की यांना काहीतरी सांगायचे असते. एकुणात, भाषेबद्दल संपूर्णतः त्यांचा अपारंपरिक दृष्टिकोन नेहमीच नवी अंतर्दृष्टी देणारा असतो. याविषयी नोम चॉम्स्की यांचे नाव जगभर परिचित आहे. ९५व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या भाषाविषयक चिंतनाबद्दल..)

भाषाशास्त्र-अभ्यासाच्या निमित्ताने नोम चॉम्स्की यांचे नाव सर्वप्रथम शिवाजी विद्यापीठात १९७७ मध्ये तत्कालीन आमचे भाषाशास्त्राचे गाढे अभ्यासक आणि प्राध्यापक डॉ. शास्त्री यांच्याकडून ऐकले होते. नंतर पदवी आणि पदव्युत्तर वर्गात भाषाशास्त्र हा विषय शिकवत असताना चॉम्स्कीचा संदर्भ कायम येत राहिला. त्यांची पुस्तके, त्यांचे निबंध, संदर्भ हे अभ्यासाच्या निमित्ताने येत राहिले.

ज्यांना नोम चॉम्स्की थोडेफार माहीत आहेत किंवा जे संपूर्णतः या नावाशी किंवा त्यांच्या योगदानाशी अनभिज्ञ आहेत, त्या सर्वांनी चॉम्स्की जरूर वाचायला पाहिजे. भाषेविषयीचे राजकारण, सांस्कृतिक प्रश्न, रोजच्या जीवनात सर्व क्षेत्रांत घडणाऱ्या असंख्य गोष्टी, या साऱ्या समजावून घेण्याच्या संदर्भात चॉम्स्की यांनी दिलेली अंतर्दृष्टी महत्त्वाची ठरते.

भाषेची व्याख्या करताना त्यांनी भाषेची पारंपरिक व्याख्या नाकारली आहे. उदाहरणार्थ, भाषा म्हणजे माहिती, भावना, कल्पना यांची देवाणघेवाण किंवा संज्ञापन, संचारण, संदेशवहन, संसूचना, संप्रेषण करण्याचे महत्त्वाचे मानवी साधन वगैरे... याउलट ते म्हणतात की, भाषा ही माहिती, भावना आणि कल्पना 'दडविण्याचे जबरदस्त साधन' आहे. संदेशवहन व संप्रेषण करत असताना तुम्हाला जो संदेश द्यायचा आहे, तोच तुम्ही 'संदेश देण्याच्या निमित्ताने' दडवत असता. भाषा ही केवळ संप्रेषण किंवा संदेशवहन म्हणून वापरली जात नाही, तर ती आपल्या अनेक समस्या सोडवण्यासाठी वापरली जाते. आपणास काही सांगायचे नाही, ही गोष्टही भाषा नावाच्या सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात खूप महत्त्वाची असते. भाषा ही प्रमुख्याने संस्कृती-वहनाचे (culture carrier) रूप असते. आपल्या

जीवनात समस्या सोडवण्यासाठी आपण भाषेचा वापर कसा करतो हे पाहणे, या दृष्टीने महत्त्वाचे आणि उद्बोधक ठरते. भाषा ही नेहमी संप्रेषणासाठी वापरली जातेच असे नाही, तर तिचा उपयोग हा बऱ्याचदा संप्रेषण पुढे ढकलण्यासाठी किंवा वेगळाच मेसेज जावा यासाठीही केली जाते.

भाषेच्या वाच्य रूपाचा विचार केल्यास, निरर्थक बोलत राहणे, थापा मारणे, भाषिक रॅगिंग करणे, शिवीगाळ करणे अशी अनेक उदाहरणे आपल्या समोर येतात. भाषेच्या लिखित रूपाचा विचार केल्यास, अर्थ दडवण्याचा प्रयत्न करणे (हे बहुतेकदा कलेच्या क्षेत्रामध्ये अधिक प्रकर्षाने प्रतिबिंबित होते), सैद्धांतिक लेखन, गूढ रम्य लेखन, ललित लेखन, कायद्यात वापरली जाणारी भाषा वगैरे अशी अनेक उदाहरणे देता येतील. नोम चॉम्स्की यांनी भाषेच्या संदर्भात दिलेली ही अंतर्दृष्टी म्हणूनच खूप महत्त्वाची आहे.

नोम चॉम्स्की यांची ओळख 'आधुनिक भाषाशास्त्राचे जनक' अशी आहे. चॉम्स्की हे एकाच वेळी शास्त्रज्ञ आणि तत्त्वचिंतक अशा दोन्ही भूमिका बेमालूमपणे वठवताना दिसतात. ह्यूम, कान्ट, देकार्त, लायबनीझ, स्पिनोझा, आणि यांनी घालून दिलेल्या वैचारिक आणि भाषावैज्ञानिक परंपरा त्यांच्याबरोबर होत्या. रळि विवेचनातून आणि विश्लेषणातून कोणताही विषय सुटलेला नाही, मग तो भाषाशास्त्र, मानवी संबंध, मानसशास्त्र, राजकारण, युद्धबंदी काहीही असो... प्रत्येक विषयाची चिकित्सक चर्चा ही त्यांनी खोलवर केलेली आहे.

त्यांच्या राजकीय भूमिकांमुळे नोम चॉम्स्की हे अधिक चर्चेत राहिले. त्यांनी अमेरिका, इस्राइल, युरोप आणि इतर भांडवलशाही देशांच्या वर्चस्ववादी आणि साम्राज्यवादी धोरणाविरुद्ध कठोर टीका केली. म्हणून त्यांची अमेरिकेतील अग्रणी सार्वजनिक विचारवंत (Public Intellectual) अशी वादग्रस्त ओळख आहे.

त्यांचा 'द रेस्पाँसिबिलिटी ऑफ इंटलेक्च्युअल्स' हा लेख खूप गाजला. २६ फेब्रुवारी १९६७ या दिवशी द न्यूयॉर्क बुक यामध्ये तो प्रसिद्ध झाला होता. या निबंधात त्यांनी व्हिएतनाम युद्धाच्या संदर्भात अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरणावर सडकून टीका केली होती. केवळ पठडीबंद विचारवंत किंवा भाषाशास्त्रज्ञ अशा साच्यात त्यांना अडकून राहणे मान्य नव्हते. वेळोवेळी निर्माण झालेल्या समाजातल्या समस्यांशी आणि त्याच्यांशी जोडून घेऊन नेहमी ठाम भूमिका घेत त्यांनी भाषेच्या ज्ञानाचा उपयोग केला. त्यांचा हा गाजलेला लेख त्यांनी खरंतर तत्कालीन बुद्धिजीवी वर्गाविरुद्ध लिहिला होता. व्हिएतनाम युद्धात झालेला नरसंहार मूग गिळून निवांत पाहणारे हे बुद्धिजीवी आणि त्यांनी केलेले लांगूलचालन याबद्दलचा त्यांचा तो संताप होता.

चॉम्स्की यांचे लेखन आणि संशोधन हे प्रामुख्याने भाषा आणि भाषेचे विज्ञान यासंदर्भात आहे. १९६० ते ९० या कालखंडात त्यांनी या विषयावर तांत्रिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून लिहिले आहे. 'सिन्टॅक्टिक स्ट्रक्चर्स' (१९५७) हे त्यांचे सर्वात प्रभावशाली पुस्तक समजले जाते. याचबरोबर 'आक्ट्सस्पेटस ऑफ द थेअरी ऑफ सिन्टॅक्स' (१९६५) हे पुस्तकही खूप महत्त्वाचे आहे. 'रिफ्लेक्शन्स ऑफ लँग्वेज' (१९७५) आणि 'नॉलेज ऑफ लँग्वेज' (१९८६) या पुस्तकांतून भाषाशास्त्रीय संशोधनाची मीमांसा आहे.

चॉम्स्की यांचे आजपर्यंतचे लेखन आणि संशोधन पाहिले तर त्यांचा आवाका हा फार मोठा आहे, हे सहज लक्षात येते. भाषेकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांनी संपूर्ण बदलून टाकला आहे. म्हणून त्यांना 'बोधात्मक क्रांतीचा प्रणेता' असेही म्हटले आहे.

भाषेची अगम्य गुंतागुंत आणि क्लिष्टता ही नेहमी आवाक्याबाहेरची असते. पण चॉम्स्की यांनी हे प्रश्न सतत सोडवण्याचा प्रयत्न केला.. मग हा प्रश्न सृष्टी, वातावरणातील घटक, रोजच्या आयुष्यातील इच्छा, स्वातंत्र्य टिकवायचे आव्हान किंवा एका विशिष्ट प्रसंगी आपण ठराविक पद्धतीची भाषा का वापरतो? थोडक्यात, भाषेसंबंधीचे कोणतेही प्रश्न असो... ते नेहमी उत्तरांच्या शोधात जात असलेले आपल्याला दिसतात.

चॉम्स्की यांनी आधुनिक भाषाशास्त्राला जन्माला घालून भाषेच्या गुंतागुंतीचा उकल करण्याची भूमिका घेतली.

भाषेचा अभ्यास करताना तत्त्वज्ञानाच्या आणि मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून उकल करून, भोवतालचे राजकारण-समाजकारण, निसर्ग अशा अनेक गोष्टींचा आवाका त्यांचा आहे. हे सारे करताना त्यांनी भाषेच्या पारंपरिक चौकटीला छेद दिला आहे. उजवा किंवा डावा कोणताही विचार असो- लोकांच्या जनचळवळींचा नेमक्या सामाजिक आणि राजकीय आशयावर आणि वर्मावर बोट ठेवून, ठाम भूमिका घेऊन त्यांनी भाषेचा अभ्यास मांडला आहे.

चॉम्स्की यांनी भाषाविषयक जी अंतर्दृष्टी दिलेली आहे, त्या आधारावर आपणांस रोजच्या जीवनातली भाषा, स्त्री-पुरुष नात्यासंबंधीची भाषा, प्रौढ माणसे लहान मुलांशी बोलत असताना वापरली जाणारी भाषा, साहित्य, संगीत, चित्रपट, सामाजिक माध्यमे, शाळा, महाविद्यालये, पाठ्यपुस्तके, प्रबोधन साहित्य, इस्पितळे, रस्त्यावरील भाषा, रॅगिंगची भाषा, राजकारणी मंडळींची भाषा, कायद्याची भाषा, संसद आणि विधिमंडळ अशा संविधानात्मक संस्थांमधून वापरली जाणारी भाषा... अशा अनेक भाषा-उपयोगांवर (Language Use) आपणांस भाष्य करता येऊ शकते, याचे भान त्यांनी दिले. भाषा ही मानवी संस्कृतीच्या केंद्रस्थानी असल्यामुळे आपल्या समस्या सोडवण्याच्या दृष्टिकोनातून चॉम्स्की यांचा भाषाविषयक विचार किंवा त्यांच्या ह्या अंतर्दृष्टीचा अन्वय अनन्यसाधारण आहे, असेच म्हणावे लागेल.

म्हणूनच, चॉम्स्की यांच्या भाषाविषयक मांडणीचा पुनरुच्चार परत परत करायला हवा, हे या निमित्ताने आवर्जून सांगावे, असे वाटते.

नोम चॉम्स्की यांच्यावर 'परिवर्तनाचा वाटसरू'ने एक विशेष अंक प्रसिद्ध केला आहे. तो मुळातून वाचण्यासारखा आहे.

(युगांतर या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला लेख)

# ‘द रेप अव्ह द लॉक’ : अलेक्झांदर पोप

शिरीष चिंधडे



आजकाल लव्ह जिहाद, ऑनर किलिंग, असे शब्द बरेचवेळा वर्तमानपत्रांत वाचनात येतात. शेक्सपिअरने तर अशा दोन कुटुंबांतल्या वितुष्टावर रोमिओ अँड ज्युलिएट हे प्रसिद्ध नाटक लिहिले आहे. मुलीची छेडछाड झाल्यावर कोणीही पिता, नातेवाईक संतापून उठणार. आणि एखाद्या धटिंगण प्रेमवीराने जर एखाद्या सुंदर तरुणीची एखादी मोहक बट कापून टाकली तर त्या संबंधित दोन कुटुंबांत शत्रुत्व निर्माण होणार. ते साहजिक आहे. परंतु अशा एखाद्या प्रसंगावर एखादे छद्म-खंडकाव्य लिहिले जाणे, हे काही सहजासहजी घडणारे काम नाही. सतराव्या शतकात लंडनमध्ये जन्मलेल्या अलेक्झांदर पोप याने लिहिलेले द रेप अव्ह द लॉक हे छद्म-खंडकाव्य एका अशाच खऱ्या प्रसंगावर बेतलेले आहे.

लंडनमधील हॅम्प्टनकोर्ट या उच्चभ्रू श्रीमंती वस्तीतल्या लॉर्ड पेत्र या रंगेल तरुणाने त्याच्या दूरच्या नात्यातल्या, ऑक्सफर्डच्या उमरावाची सुंदर मुलगी ॲराबेला फर्मोर हिच्या केसांची एक बट स्मृतिचिन्ह म्हणून एका मेजवानीच्या प्रसंगी कापली! अर्थातच यामुळे या दोन्ही कुटुंबांत वितुष्ट निर्माण झाले. तेव्हा कवी पोप याचा मित्र आणि आश्रयदाता जॉन कॅरेल याने पोपला सुचवले की, आता हे भांडण मिटवण्यासाठी या प्रसंगावर एखादे फर्मास विनोदी काव्य लिही. म्हणजे हा हास्यसेतू या दोन्ही शत्रूंना पुन्हा मैत्रीच्या धाग्याने बांधून ठेवील (‘‘लाफ द फॅमिलीज टुगेदर’’). झाले! सुपीक डोक्याच्या आणि चेष्टेखोर वृत्तीच्या पोपने चांगले पाच सर्गांचे (खंडांचे) सातशे चौऱ्याण्णव ओळींचे छद्म-महाकाव्य (मॉक-एपिक) लिहिले. तेच हे द रेप अव्ह द लॉक!

त्या काळी इंग्रजी कवितेत पांच-आघाती (बीट्स) द्विपंक्ती (कप्लेट = दोहा) काव्यरचना अतिशय लोकप्रिय झाली होती. तिला ‘हीरोइक कप्लेट’ असेही म्हटले जात असे. पोपने हेच वृत्त आपल्या कवितेसाठी योजले. आणि तयार झाली, इंग्रजी कवितेच्या इतिहासात महत्त्वाचा मैलाचा दगड ठरलेली प्रस्तुतची कविता.

वयाच्या विशीतच पोपने तत्कालीन बडे साहित्यिक ड्रायडन, काँग्रीव्ह, गार्थ, विचर्ली, वॉल्श आदींशी चांगला परिचय करून घेतला होता. याच सुमारास त्याची पहिली कविता ‘पास्टोरल्स’ प्रसिद्ध झाली. एव्हाना त्याची ‘हीरोइक कप्लेट’च्या रचनातंत्रावर चांगली हुकूमत बसली होती. अनेक ओळी नादमय, तालबद्ध, आणि सुभाषितसदृश स्वरूपात प्रगट होऊ लागल्या. लवकरच प्रसिद्ध झाली दुसरी आणि महत्त्वाची दीर्घ कविता, एसे ऑन क्रिटिसिझम. यातल्या या सुभाषितवजा दोन ओळी पाहा–

True wit is Nature to advantage dressed
What oft was thought but ne'er so well expressed.

कवी इथे उत्कृष्ट काव्यरचनेचे केवळ निकष नोंदवत नाही, तर ‘निसर्ग’ या संकल्पनेविषयी तत्त्वविचार मांडतो आहे. योग्य शब्दयोजना असलेली अभिव्यक्ती म्हणजे खरी प्रतिभा, हा विचार इथे सांगितला आहे. पुन्हा ‘नेचर’ ही संकल्पना देखील व्यापक आहे. त्याचा खुलासा देखील कवी पुढील ओळीत देतो–

The rules of old, discovered, not devised
Are Nature still but Nature methodized.

आणि हे अभिजात साहित्यातले नियम कुठे मिळतील, हेही कवी सांगतो–

Be Homer's works your study and delight,
Read them by day and meditate by night.

अशा अखंड चिंतन–अभ्यासातून ते शिकता येतात. पोपच्या संकल्पनेनुसार 'नेचर' म्हणजे अभिजात कलेत, जीवनात रुजलेली शिस्त, यम–नियम, संयम, समतोल, सदभिरुची, सभ्यता, उच्च परंपरा, उच्च सौंदर्य संकल्पना, परिपूर्णत्वाची ओढ, रचनाकौशल्य, अशा पूर्वीच्या अभिजात संस्कृतीत रुजलेल्या, विकसित झालेल्या आदर्शभूत कृती आणि सवयी. त्यासाठी परिश्रम हे आलेच. एखाद्या विषयाचे सखोल अवगाहन केल्यावरच त्याबद्दल बोलणे योग्य ठरते, असे तो म्हणतो–

A little knowledge is a dangerous thing;
Drink deep or taste not the Pierian spring

असा इशारा तो देतो. प्राचीन मेसिडोनिया देशातल्या पाएरीया या प्रांतात प्रत्यक्ष विद्या आणि कलांच्या देवता (म्यूजेस) वास्तव्य करीत होत्या. म्हणजे, काव्य, कला, ज्ञान यांचा सखोल अभ्यास केल्यावरच त्याविषयी मतप्रदर्शन करणे उचित असते, अर्धवट ज्ञानावर अवलंबून राहणे फजिती करू शकते, असे कवी सुचवतो आहे. रामदास स्वामी यांनी हाच उपदेश केलेला आहे–

अभ्यासेनि प्रकटावे । नाहीतरी झाकून असावे
प्रगटोनी नासावे । हे बरे नसे
To err is human; to forgive Divine

मनुष्य प्रमादशील असतो, हे त्याचे सुवचन तर प्रसिद्धच आहे. सुघड आणि अल्पाक्षरी शैलीचे वर्णन करताना कवी लिहितो–

Words are like leaves, and where they most abound
Much fruit of sense beneath is rarely found.

शब्द जणू झाडाची पाने, असती जेथे बहुलपणे,
अर्थाचे फळ दडून राही त्यांच्याखाली क्षीणपणे

त्यानंतर अनेक महत्त्वाच्या कविता त्याने लिहिल्या. त्यांत प्रस्तुतची 'द रेप अव्ह द लॉक' आणि 'डन्सियड' यांचा उल्लेख करावा लागेल. डेनिस नावाच्या एका समीक्षकाने पोपवर खरपूस टीका केली होती. त्यामुळे पोप दुखावला होता. प्रमादशीलता हा मानवी गुण असून क्षमाशीलता हा दैवी गुण आहे, वगैरे उदात्त तत्त्वविचार सांगणारा

पोप आपल्या टीकाकारांना सहजासहजी क्षमा करणारा नव्हता. टीकेला उत्तर देण्यासाठी तो चडफडत होता. अभिरुचीहीन, उथळ, भंपक, मूर्ख समीक्षकांचा समाचार त्याने 'डन्सियड्'मध्ये घेतला आहे. याच सुमारास प्रसिद्ध झालेली त्याची 'एसे ऑन मॅन' ही कविता गाजली. त्यातल्या काही सुभाषितवजा प्रसिद्ध ओळी सहज आठवतात–

Know, then, thyself, presume not God to scan
The proper study of mankind is man

किंवा

An honest man is the noblest work of God

किंवा

For forms of government let fools contest;
Whate'er is best administered is best

लहानपणापासूनच हे रचनाकौशल्य त्याने सहजच कमावलेले दिसते. एके ठिकाणी तो म्हणतो–

As yet a child, nor yet a fool to fame
I lisped in numbers, for the numbers came.

इथे नंबर्स म्हणजे छंदोरचना. लहान असल्यापासूनच ही छंदोबद्ध ओळी लिहिण्याची कुसर त्याला अवगत झालेली होती, असे तो म्हणतो.

आता 'द रेप अव्ह द लॉक'विषयी थोडेसे. मोठी गमतीदार कविता आहे ही. सटायर म्हणजे उपहासात्मक लेखनाचा हा एक उत्तम नमुना आहे. ती 'मॉक-हिरोइक एपिक' देखील आहे. अर्थात एपिक (महाकाव्य) जसे विस्तृत आवाका असलेले, अनेक पिढ्या कवेत घेणारे, नाट्यमय घटनाप्रसंगांची रेलचेल असणारे, अनेक वर्षे समाविष्ट करणारे, एका जीवनपद्धतीचे विवेचन करणारे लेखन असते, त्या अर्थाने हे प्रस्तुतचे काव्य नव्हे. तर ते आहे 'मॉक' शैलीचे म्हणजे विडंबन करणारे लेखन. अभिजात महाकाव्याचे कातडे पांघरून, म्हणजे त्याचा एकूण ढाचा, प्रथा पाळून लिहिलेले हे दीर्घकाव्य आहे. महाकाव्याच्या प्रारंभी जसे इष्ट देव-देवतांना आवाहन (इन्व्होकेशन) करून कार्यसिद्धीस नेण्याची प्रार्थना केलेली असते, जशी प्रार्थना महाकवी मिल्टन आपल्या पॅरडाइज लॉस्ट या महाकाव्याच्या प्रारंभी करतो, तसे पोप देखील करतो. मिल्टनचा प्रारंभ आहे–

Sing heavenly Muse
And chiefly thou, O spirit, that dost prefer
Before all temples the upright heart and pure,
Instruct me

नंतर मिल्टन आपल्या महाकाव्याचा केन्द्रस्थ विषय नोंदवतो–

Of man's first disobedience and the fruit
Of that forbidden tree, whose mortal taste

Brought death into the world, and all our woe

तद्वतच पोप आपल्या काव्याचा प्रारंभ असा करतो–

What dire offence from amorous causes springs,
What mighty contests rise from trivial Things,
I sing-This vesre to Caryll, Muse! Is due;
This even Belinda may vouchsafe to view:
Slight is the Subject, but not so the Praise
If She inspire, and He approve my Lays.

मूळची ॲराबेला फर्मोर पोपच्या कवितेत बेलिंडा या नावाने नायिकेच्या स्वरूपात प्रगटते. ही कविता हे विडंबन का असेना परंतु महाकाव्यात जसे दैवी, अतिनैसर्गिक (सुपर–नॅचरल) अंश उपस्थित राहून विविध घटनाप्रसंग यांत प्रत्यक्ष भाग घेताना दिसतात; तद्वतच पोप देखील आपल्या महाकाव्यात एरियल, सिल्फ, निम्फ, नोम (Gnome) अशी अमानवी पात्रे योजतो. बेलिंडाच्या सुंदर शरीराचे रक्षण करण्यासाठी तैनात केली गेलेली ही सगळी तरंगती अंगरक्षक फौज (Light Militia of the lower sky) बेलिंडाच्या अवतीभवती सतत दक्ष असते. स्वर्गात जसे सर्वांत उच्च, प्रथमवर्गीय, म्हणजे वरच्या स्तरावर देव मंडळी राहतात आणि इतर निम्नवर्गीय जीव, जसे यक्ष, किन्नर, अप्सरा, राक्षस, वगैरे खालच्या स्तरावर वास्तव्य करतात, तसे हे सिल्फ सैन्य खालच्या स्तरावर तरंगते आहे. बेलिंडा ही उमराव खानदानातली तरुणी असल्याने ती सकाळी लवकर उठत नाही, तर अम्मळशाने उशिरा उठते. ती उठल्यावर लगेच आपल्या शयनगृहातल्या आरशाच्या मेजासमोर जाऊन बसते. कवी तिच्या सौंदर्यप्रसाधनमंडित मेजाचे आणि एकूणच या प्रसंगाचे पुढीलप्रमाणे चित्रमय वर्णन करतो–

A heavenly image in the Glass appears
To that she bends, to that her eyes she rears;
This Casket India's glowing gems unlocks,
And all Arabia breathes from yonder Box.
Here Files of Pins extend their shining Rows,
Puffs, Powders, patches, Bibles, Billet-doux.

आपल्याकडे जसे कुंकू लावतात, तसे अठराव्या शतकात फॅशनेबल स्त्रिया पार्टीला जाताना चेहऱ्यावर विविध रंगांच्या टिकल्या लावत असत. त्याचा इथे 'पॅचेस' असा उल्लेख आहे. शिवाय धर्मसापेक्ष आणि निरपेक्ष अशा सर्वच वस्तूंची सरमिसळ बेलिंडाच्या टेबलावर झालेली दिसते. त्यात आहेत पफ, पावडरी, टिकल्या, बायबल आणि प्रेमपत्रेदेखील! बेलिंडा आपल्या सौंदर्यावर निहायत खूष आहे. संपूर्ण प्रसाधनसैन्य देखील तिच्या नटण्यासाठी सज्ज झाले आहे. सिल्फ सैन्याचा सेनापती एरियल आता तिला उजाडणाऱ्या आजच्या दिवसभराचा होरा ऐकवतो. कुणीतरी रंगेल तरणा गडी आज तिला हैराण करणार आहे, असे ग्रहमान आहे; असा अशुभ संकेतदेखील तिला ऐकवतो. तिच्यावर हल्ला होण्याची शक्यता आहे, असाही तो इशारा देतो, आणि उत्तम धोरण म्हणजे आज मुळीच घराबाहेर न पडणे, असेही सुचवतो–

Warned by thy Sylph, oh Pious Maid beware!
This to disclose is all thy Guardian can,
Beware of all, but most beware of Man!

('सर्वांत धोकेबाज असलेल्या मनुष्यापासून सावध राहा' असा टोला जाताजाता कविमहाशय देतात!) परंतु आत्मरंगी रंगलेली, आपखुश बेलिंडा एरियलचा हा इशारा ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही. एवढं नटा-सजायचं आणि नुस्तं घरात बसायचं? मग कोण बघणार हा साजशृंगार? एक प्रसिद्ध हिंदी गाणे आहे-

दिलबरका सिंगार अधुरा रहेता है
-जबतक ना पडे आशिक की नजर!

तेव्हा काही नाही; जायचंच आज आपल्या आवडत्या क्लबात. अशा रीतीने दुसऱ्या खंडात बेलिंडाचा शृंगार पूर्ण होऊन, नखशिखांत नटलेली, मौजमजा, पार्ट्या, नाचगाणी, खानपान यांत रमणारी ही चटकचांदणी टेम्स नदीच्या तीरावर असलेल्या क्लबमध्ये प्रवेशते. तिथे जणू नित्यवत एक निरंतर मेजवानी आहे. त्यामुळे अशा अनेक चांदण्या तर तिथे जमलेल्या आहेतच, परंतु त्यांना साथ देण्यासाठी अनेक रसिक आशुक-माशुक तरुण देखील आलेले आहेतच. शिवाय हेही म्हटले जाते-

हसीनोंके जलवे परेशान रहते
अगर हम ना होते, अगर हम ना होते!

आता प्रारंभिक मनोरंजन म्हणून पत्त्यांचा डाव टाकण्याचे ठरते. गुलहौशी लॉर्ड पेत्र या संधीसाठी टपूनच बसलेला आहे. आव्हान-प्रतिआव्हाने होतात. बेलिंडा तर एकदम चेकाळलीच आहे-

Belinda smiled and all the world was gay!

तिच्या एका स्मितानेच सारे जग प्रसन्नपणाने हर्षोत्फुल्ल होऊन जाते. आता मात्र सर्व सिल्फ सैन्य एकदम दक्ष होते. एरियल सावध होतो. कारण आता तो अशुभ क्षण आलेला दिसतो. एवढा सर्व फौजफाटा सिद्ध असून देखील प्रत्येकाच्या मनात कुठेतरी पाल चुकचुकते आहे-

With beating Hearts the dire event they wait,
Anxious, and trembling for the Birth of Fate.

आता खरा नियतीचा खेळ सुरू होणार असावा.

तिसऱ्या खंडात बेलिंडा टेम्स नदीवरील नौकाविहाराचा आनंद घेऊन हॅम्टनकोर्टच्या क्लबात अवतीर्ण होते. लंडनमधील सर्व लब्धप्रतिष्ठित उच्चभ्रू मंडळी आणि पार्ट्यांना चटावलेल्या नटव्या स्त्रिया यांचा हा आवडता अड्डा आहे. लवकरच प्रत्येक टेबलवर पत्त्यांचे डाव पडतात. बेलिंडा या खेळात प्रवीण आहे. आपले कसब दाखवण्यासाठी ती दोघा चैनीचन्डोलांना 'ओम्बर' नावाच्या खेळाचे आव्हान देते. आणि त्यांना चुकवत, खेळवत

शेवटी त्यांना हरवते. त्यामुळे मघाचा तरुण, लॉर्ड पेत्र खवळून उठतो. आपल्या पराभवाचा सूड उगवण्याचे तो ठरवतो आणि खिशात लपवलेली छोटी कात्री परजतो–

The meeting Points the sacred hair dissever
From the fair Head, for ever and for ever!

एवढी संरक्षणसिद्धता असूनही शेवटी घात झालाच. 'होणारे न चुकेल जरिही ब्रह्मा तया आडवा.' एरियलचे भाकित खरे झाले. केशरक्षणासाठी तैनात असलेले अनेक सिल्फ सैनिक त्या कात्रीने कापले जातात. आपण केलेल्या पराक्रमाचा लॉर्ड पेत्र याला मोठा अभिमान वाटतो. आता आपले नाव प्रेमाच्या इतिहासात अमर होणार, म्हणून तो जाम खूष होतो–

While Nymphs take Treats. Or Assignations give,
So long my Honour, Name, and Praise shall live!

म्हणजे, जोवर मुली पार्ट्या झोडतील किंवा मीलनसंकेत ठरवतील तोपर्यंत माझे नाव आणि माझी कीर्ती जिवंत राहील! 'न ये चाँद होगा, न तारे रहेंगे / मगर हम हमेशा तुम्हारे रहेंगे!'

पोपकवीचा मित्र आणि संपादक बिशप वॉर्बर्टन याने नायिका बेलिंडाच्या वर्णनाबद्दल (आणि वर्तनाबद्दल) एक गफलत झाल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. एकाच वेळी ती भक्त आणि देव कशी असू शकेल? ख्रिश्चन धर्मात असे देव आणि भक्त यांचे सायुज्य नाही. ते हिंदू श्रद्धेत आहे. एकाचवेळी बेलिंडा पूजा करते आणि आपली दैवी प्रतिमा दर्पणात बघते, हे कसे? समीक्षक ब्रूक्स याच्या मते मात्र यात काही विसंगती नाही. बेलिंडा ही सौंदर्यदेवतेची उपासक असल्याने ती जणू स्वतःच देवता बनली आहे. यात गैर काही नाही.

इथे तिसरा खंड संपून सुरू होतो चवथा खंड. इथे आहे बेलिंडाचा विषादयोग. त्यात मिसळले आहेत क्रोध आणि पश्चात्तापाचे कढ. अगदी सकाळीच एरियलने अशुभ संकेतांचा उल्लेख केलेला होता आणि घराबाहेर न पडण्याचा सल्लादेखील दिला होता. तरीदेखील हिला आपली मिरवण्याची, नटण्याची, छानछोकीची, पार्टीबाजीची चटक घरी बसू देईना. आणि आता केवळ हे उसासे, हा त्रागा, ही आदळआपट करत बसायची वेळ आली.

There she collects the force of Female Lungs,
Sighs, sobs, and Passions, and the War of Tongues...
Her eyes dejected and her Hair unbound...
Belinda burns with more than mortal Ire
For ever cursed be this detested Day.
Which snatched my best, my Favourite curl away!
Yet am not I the first mistaken maid
By love of Courts to numerous Ills betrayed...

तिला आता हेही ध्यानात येते की, असे अवमानित होणारी मी काही जगातली एकमेव स्त्री नव्हे. अतिउत्साही चटकचांदण्यांच्या नशिबी असे अमंगळ प्रसंग लिहिलेले असतातच... शेवटी ती एक निर्णय घेते. आता ही उरलेली एकाकी बट ठेवून काय उपयोग? चेहऱ्याचा सारा तोल बिघडायचा. त्यापेक्षा त्या (मेल्याने) आणखी कुठले दृश्यादृश्य केस कापले असते तरी बिघडले नसते... असे दुःखालाप करत बेलिंडा ती उरलेली दुसरी बटदेखील स्वतःच छाटून टाकते!

पाचव्या आणि शेवटच्या खंडात बेलिंडाच्या वृत्ती शांत झाल्या असून ती आता चिंतनशील मनोवस्थेला आलेली आहे. शेवटी दैहिक सौंदर्य म्हणजे अळवावरचं पाणी! कधीतरी ती मोत्ये गळून नाहीतर वाळून, सुकून, विरून जाणारच ना. त्या सुंदर, सुवर्णकांती बटा कधीतरी भगभगीत पांढरा रंग पत्करून कुरूप होणारच : "The locks will turn to grey." आणि खट्याळ पुरुषांचा एवढा दुस्वास तरी काय कामाचा? कोणीच भेटला नाही तर घोडनवरी बनून राहणे आले–

And she who scorns a man, must die a Maid.

तरीही अर्थातच बेलिंडाचा राग या सर्व स्वयंसांत्वनानंतर देखील पूर्णपणे शमलेला नाहीच. ती तपकिरीची एक मोठी चिमूट घेऊन त्या दुष्ट लॉर्ड पेत्रवर हल्ला चढवते. आणि मग तो शिंकांच्या वादळात अडकतो! मात्र या झटापटीत ती कापलेली बट निसटते आणि वर वर आकाशाकडे जाऊ लागते. शेवटी तिचे रूपांतर प्रत्यक्ष प्रेम–तारका व्हीनस (शुक्राची चांदणी) मध्ये होते! म्हणजे इथे दोन्ही गोष्टी साध्य होतात. लॉर्ड पेत्रचे प्रेम (आणि कीर्ती) जसे अजरामर होते, तसेच बेलिंडाचे सौंदर्य देखील चिरंजीव होते. ती जणू प्रत्यक्ष शुक्राची चांदणीच बनते–

This Lock, the Muse shall consecrate to Fame
And midst the Stars inscribe Belinda's Name!

अशा रीतीने बेलिंडाचे नुकसान, तिचा अपमान, यांची चिरस्थायी, भरघोस भरपाई होते. 'द केस अव्ह मिस ॲरबेला फर्मोर' या निबंधात समीक्षक क्लिअंथ ब्रूक्स नायिका बेलिंडाच्या संदर्भात एक वेगळेच निरीक्षण नोंदवतो. पोप याने वापरलेली काही रूपके आणि केलेली वर्णने बेलिंडाच्या लैंगिक किंवा कामप्रेरणांचे सूचन करतात, असे तो म्हणतो. आरशात स्वतःचे प्रतिबिंब निरखताना ती लाजून लाल होते. परंतु पोप याचे वर्णन करताना 'प्युअरर ब्लश' असे शब्द वापरतो. म्हणजे अजून तरी बेलिंडा 'प्युअर' आहे, म्हणजे अजून ती अनाघ्रात, अस्पर्शित, अक्षत कुमारिका आहे. (नंतर 'रेप' होऊन ती आपली शुचिता गमावून बसणार आहे.) मात्र तिच्या कामप्रेरणा प्रमाथी आहेत. पोप याने तिच्या चमकदार डोळ्यांच्या वर्णनासाठी वापरलेल्या सूर्यप्रतिमा अर्थपूर्ण आहेत. सूर्यकिरणांप्रमाणेच तिची नजर भेदभाव न करता मुक्तपणे सर्वत्र भिरभिर फिरते. कदाचित सावज शोधते आहे. मात्र सूर्य जाळतो, तशीच तिची नजरदेखील जाळणारी आहे.

ब्रूक्सच्या मते, 'केस' हे देखील या कवितेतले मध्यवर्ती असलेले कामसूचक रूपक आहे. त्यातून सुफलता, सुपीकता, यांचे सूचन आहे. शिवाय आकर्षणाचे साधन म्हणूनदेखील ते मानले जातेच. (काही इस्लामिक देशांत हिजाब, नकाब, बुरखा अनिवार्य असून डोक्यावरची एक बटदेखील दिसत कामा नये, अशी सक्ती अजूनही आहेच की. त्यामागे हा विचार असणार.) बेलिंडाच्या कष्टपूर्वक केलेल्या केशभूषेवरच (coiffeur/hairdo) हल्ला झालेला असल्याने या नखरेल सुंदरीला तो जणू 'रेप'सारखाच मानसिक धक्का बसलेला आहे. परंतु ती अगदीच निर्मळ, निष्पाप, निरागस मनाची युवती आहे का? आपल्या आकर्षक केशरचनेचे असे जाणीवपूर्वक प्रदर्शन करून, आपल्या बटांना असे मुक्त नर्तन करायला लावून ती 'रेप'साठी आव्हान आणि आवाहन करते/देते आहे का? अर्थात असे हेत्वारोप करणे म्हणजे बेलिंडाचा (आणि एकूणच स्त्रीत्वाचा, तिच्या सौन्दर्यासक्त वृत्तींचा) अधिक्षेप ठरेल. अशा हल्ल्यांबद्दल स्त्रीलाच/तिच्या शृंगाराला जबाबदार धरणे कवीला (आणि कुणाही सुसंस्कृत व्यक्तीला) मान्य होण्यासारखे नाही. पोप याने वापरलेल्या 'चायना जार' वगैरे काचेच्या, चीनी मातीच्या वस्तूंना इथे वेगळा अर्थ दिसतो. त्या जशा ठिसूळ, नाजूक, सहज भंग होणाऱ्या असतात तशीच स्त्रीची पवित्रता, तिचा 'व्हर्च्यू' थोड्यादेखील आघाताने चक्काचूर होऊ शकतात, असे अर्थनिर्णयन ब्रूक्स करतो. पोप याने वर्णन केलेल्या पत्त्यांच्या खेळातदेखील

ब्रूक्स याला कामप्रेरणा आढळतात! कवितेच्या शेवटपर्यंत हे कामप्रेरणेचे सूचन उलगडायचा प्रयत्न या समीक्षकाने केला आहे. अगदी शेवटी बेलिंडा रागाने बेभान होऊन जेव्हा त्या दांडगट प्रेमिकावर प्रतिहल्ला चढवते, तेव्हा तो धटिंगण 'मरायला' तयार होतो. इथे ब्रूक्स अठराव्या शतकात, विशेषतः जॉन डन वगैरे मेटॅफिजिकल कवींच्या कवितेत येणारा 'डाय', 'डेथ' असा उल्लेख म्हणजे 'कामपूर्तीचा अत्युच्च क्षण', हा अर्थ सांगतो! हे समाधान त्या धटिंगणाला (आणि नायिकेला देखील?) मिळणार आहे! तशी त्याची अपेक्षा आहे. अर्थात फार सूचक आहे हे सर्व वर्णन आणि विवेचन.

ब्रूक्सचे सारेच अर्थनिर्णयन आपल्यावर बंधनकारक थोडेच आहे? पण तो एक दृष्टिकोन आहे आणि ब्रूक्स त्यासाठी सलग आणि तर्कशुद्ध दाखले देतो, म्हणून त्याचा विचार करायचा. पोप स्वतः आपली नायिका हिला आदरपूर्वक वागवू इच्छितो. सुसंस्कृतपणा, सुज्ञपणा (गुड सेन्स) यांना सामाजिक व्यवहारात आदराचे, मानाचे स्थान असणे आवश्यक आहे, हे पोप याचे या कवितेतले केन्द्रस्थ प्रतिपादन आहे, हे नजरेआड होता कामा नये. मात्र एकूण सारे पेल्यातले वादळ आहे, एवढे मात्र खरे.

अशा बहुतेक सर्व लेखनातून पोप समाजचिंतन करताना दिसतो. समाजातील, विशेषतः उच्चभ्रू थरातील व्यक्तींचा दंभ, खोटारडेपणा, नीतीविरहित वर्तन, पोषाखी भपकेबाज चैनबाजी आणि जीवनशैली, उथळपणा, अशा अवगुणांची तो खिल्ली उडवतो. एव्हाना तो इंग्लंडचा सर्वांत प्रसिद्ध आणि मान्यवर कवी बनलेला होता. स्विफ्ट, गे, ऑक्सफर्डचा एक आश्रयदाता उमराव डॉ. आर्बथनॉट आदी लब्धप्रतिष्ठित मंडळींच्या साहाय्याने त्याने 'स्क्रिब्लेरस क्लब' (साहित्यमंडळ) (१७७२) स्थापन केला होता. त्याद्वारे समाजातील दंभ, उथळ वृत्ती यांची खिल्ली उडवणाऱ्या कवितालेखनाला तो प्रोत्साहन देत असे. पुढे त्याने होमर या ग्रीक महाकवीच्या 'इलियड' आणि 'ओडिसी' या महाकाव्यांची छंदोबद्ध भाषांतरे प्रसिद्ध केली. यातून त्याला बक्कळ द्रव्यप्राप्ती झाली. वयाच्या बाराव्या वर्षी त्याने एक गीत लिहिले. तरीही जरासे मानभावीपणाचे वाटेल अशा त्या 'द क्वाएट लाइफ' या छोट्या कवितेत पोप म्हणतो की, मी अगदी अल्पसंतुष्ट माणूस आहे. पैतृक वारशातून मिळालेली काही एकर शेती, स्वच्छ, शुद्ध हवा, दुधासाठी काही जनावरे, आरोग्य, रात्रीची शांत झोप, मोकळा वेळ, आणि काही मनोरंजन, एवढे असले की सुख ते आणखीन कोणते हवे? मग मी असा जगापासून दूर राहून शांतपणे जगेन आणि निर्नाम मरेन. नाही चिरा, नाही पणती; थडग्याचा दगडदेखील माझे नाव सांगणार नाही : 'नॉट अ स्टोन टेल व्हेअर आय लाय.'

आयुष्याच्या उत्तरार्धात पोप आपल्या आईसह टेम्स नदीकाठी वसलेल्या ट्विकनम या निसर्गरम्य ठिकाणी घर करून राहू लागला. मित्रांच्या सहवासात काव्यशास्त्रविनोद चाखण्यात, चवदार खानपान उपभोगण्यात त्याचा काळ व्यतीत होऊ लागला. बागकामाचीदेखील त्याला पुष्कळ आवड होती. आपल्या काही कवितांचे त्याने परिष्करण केले, त्यांत भर घातली. निखळ शरीरस्वास्थ्य, आरोग्य त्याच्या वाट्याला कधीच आले नाही. ''दिस लाँग डिसीज, माय लाइफ'' (माझे जगणे हेच एक दुखणे आहे / विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः । जीवन हीच एक विकृती आहे असे विद्वज्जन सांगतात.) असेच त्याने आपल्या जीवनाचे वर्णन केले आहे. तो जन्मतःच खुजा, कुबडा होता. शेवटी दमा आणि जलोदर या दुखण्यांनी ३० मे १७४४ रोजी वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी इंग्रजी कवितेतल्या या अघोषित राजकवीने देह ठेवला.

अभिजात अभिरुचीवर पोसलेले आणि तीवर श्रद्धा असलेले विद्वान अभ्यासक डॉ. जॉन्सन यांनी पोप याचे कवी म्हणून मूल्यमापन करताना म्हटले आहे, ''पोप हे जर कवी नसतील तर मग कोणास कवी म्हणावे?''

हा मोठाच गौरव आहे.

# सुरेंद्र दरेकरांच्या तीन कथा

## अश्विनी अयाचित



**‘चिंतयामि अत: अस्मि’**

**वर्णमुद्रा –दिवाळी २०२३**

दिवाळी मौज २०२१ मधली सुरेंद्र दरेकरांची ‘वर्जित मध्याचा नियम’ ही लक्षवेधी कथा वाचली आणि मग दरेकर यांच्या साऱ्याच कथा मिळवून वाचण्याचा चंग बांधला. ‘बुडता आवरी मज’, ‘अस्तिसूत्र’, ‘आपुला ठावो न सांडिता’ या कथासंग्रहातील कथा तात्त्विक पातळीवर एखाद्या सिद्धांताचा किंवा तत्सम आशयसूत्रातून काही एक मूलगामी शोधण्याचा प्रयत्न करतात.

मागच्या वर्षीच्या ‘अक्षरधारा’ दिवाळी अंकातील ‘अवचिता परिमळू’ या कथेला सर्वोत्कृष्ट कथेचा पुरस्कार मिळाला.

‘आपुला ठावो न सांडिता’ या कथासंग्रहाच्या प्रकाशन समारंभात माझ्यासारख्या सामान्य वाचकाला कथेचं आस्वादन व आकलन मांडण्याची संधी मिळाली होती.

’चिंतयामि अत: अस्मि’ ही ‘वर्णमुद्रा’ दिवाळी अंकातील कथा आहे. दरेकरांच्या कथांची शीर्षके व आशय संत वाङ्मयातील किंवा तत्त्वज्ञानातील उक्तीला अनुसरणारी असतात. त्यांच्या कथेतील शीर्षके व आशय यांचा संबंध कधी सरळ तर कधी वक्रोक्तीने घनिष्ठ असतो.

‘चिंतयामि अत: अस्मि’ हे शीर्षक आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक रने देकार्त याच्या (I think therefore I am) ‘विचार करतो म्हणून मी आहे’ या सूत्रावर आधारलेले आहे.

ही कथा घटना, प्रसंग व निवेदनातून साधी वाटत असली तरी, सखोलतेने अस्तित्व जाणिवांचा मागोवा घेणारी आहे. कथेचा नायक अजय. त्याच्या दाढ दुखण्याच्या वेदनेतून कथेची सुरुवात होते व ती कुटुंब व परिसरातील अनेक नात्यांचा शोध घेत ‘मी आहे’ अशा अस्मिभावाला जोडलेल्या कारकातून घेण्याचा प्रयत्न करते.

त्यामुळे दाढदुखीच्या असह्य वेदनेतून देकार्तच्या वचनाच्या धरतीवर ‘दुखते म्हणून मी आहे’ ('I ache therefore I am'), असे अजय म्हणतो.

पुढे ‘मी आहे’शी संलग्न असणारी कारकतत्त्वे बदलत जातात.

प्राध्यापक म्हणून काम करून घर सांभाळणारी शुभा. तिला सतत तडजोड करावी लागते. तडजोड करीत ती समोर येणाऱ्या परिस्थितीला अनुकूल करून घेत, संघर्षाचे ओरखडे मनावर उमटू देत नाही. तडजोड करताना ती परखडपणे रिॲक्ट होते आणि म्हणून, 'I react therefore I am' हे तिच्या वर्तनाशी व स्वभावधर्माशी सुसंगत वाटते.

मीनामावशींचे यजमान– काका त्यांना सीमेवर आपले प्राप्त कर्तव्यधर्म पार पाडताना हात गमवावा लागला. त्यांनी भैय्यासाहेबांच्या आश्रमात मोठ्या कष्टाने बाग फुलवली. काकांच्या धैर्याला व पार पाडलेल्या या संकल्प विस्ताराला, I dare therefore I am, म्हणावे लागले.

रंगार गल्लीत वेश्यावस्तीत राहणारी गजरा. सासरच्या जाचाला कंटाळून पोटापाण्यासाठी हा व्यवसाय पत्करते. आईला या व्यवसायाबद्दल रोष व तिडीक असूनही ती निराधार गजराला मदत करते. इथे अस्मिभावाला विश्वास व माणुसकी वेगळ्या रूपाने जोडली जाते. व म्हणून देकार्तच्या मूळ प्रमेयाला I trust therefore I am हे रूप द्यावे लागते.

बर्वे दाम्पत्याचा मतिमंद मुलगा वैभव वाहत्या गटारात पडून गमावला जातो. त्यामुळे दोघेही दुःखी व एकाकी होतात. पण जगण्याचे आव्हान व चिवट आशावाद यांच्या संयोगातून ते जोखीम पत्करून, पुन्हा संधी घेतात. म्हणून I hope therefore I am असा' मी' चा अस्मिभाव प्रकट होतो.

अशा रीतीने या कथानकाचा स्थायीभाव, अस्मिभावाची प्रत्येकाला येणारी विविध रूपे अधोरेखित करण्याचा मूळ उद्देश असला, तरी ही कथा त्यातील घटना, व्यक्तिरेखा, प्रसंग, तितक्याच आशयानुरूप उठावदार झाल्या आहेत.

अनुजा, चंदन, आई-वडील आत्या व तिचे यजमान. भैय्यासाहेब, दीपेन हे सारेच आपापला ठसा उमटवतात.

अनुजाने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्वतःला सांभाळत, सावरत, धैर्यपूर्वक, सकारात्मक विचाराने व कृतीने देकार्तच्या मूळ जाणिवेला, तत्त्वाला दिलेला विधायक प्रतिसादच होय.

माझ्या मनात विचार आला,

आय-थिंक, रिऍक्ट, डेअर, होप, ही अस्मिभावाला जोडणारी कारके-

'मी'ला सिद्ध करण्यासाठी संघर्ष, लढाई ही आलीच.

मग आठवला कर्मयोग आणि कर्मसिद्धांत.

तो म्हणाला,

मी लढायला तयार आहे

नि मग सारथ्याने युद्धभूमीच्या दिशेने रथ वळवला!

एकूणात एका वैचारिक सूत्राला कथारूप दिलेली ही अनोखी कथा वाचायलाच हवी.

***

## शब्देविण संवादातील प्रेमाची, उत्कट अनुभूती
## 'आपुला ठावो न सांडिता'

दरेकरांचा तीन दीर्घकथा असलेला हा कथासंग्रह.

मी फक्त 'आपुला ठावो न सांडिता' या कथेवरच व्यक्त होणार आहे.

'कां आपुला ठावो न सांडिता । आलिंगिजे चंद्रू प्रकटता ।
हा अनुराग भोगिता । कुमुदिनी जाणे ।।

ज्ञानेश्वरी, अध्याय पहिला, ओवी ६०

'आपुला ठावो न सांडिता' ही दीर्घकथा १०८ पानांची असून कथासंग्रहाचा अर्धा भाग व्यापते. कथा अधिक दीर्घ आहे, कारण कथेच्या विषयाची ती मागणी आहे.

आत्या आणि भाचा नानू ही कथेतील प्रमुख पात्रे. नानू वीस वर्षांनंतर परदेशातली नोकरी सोडून आत्याकडे येतो. आत्या त्याला ओळखत नाही. आत्याला स्मृतिभ्रंश झालेला आहे. आत्याच्या या अवस्थेला कारणीभूत झालेल्या घटनांचा शोध म्हणजे ही दीर्घकथा.

आत्याने आप्पासाहेबांशी दुसरे लग्न केलेले असतं. आत्याचा पहिला नवरा क्लबमध्ये नोकरीला असतो. तो व्यसनी. त्यात त्याची नोकरी जाते. आत्या आपल्या मैत्रिणीच्या मदतीने नर्सिंगचा कोर्स करते.

आप्पासाहेबांची पत्नी कांता ही आजारी असते. तिची शुश्रूषा आत्या करत असते. दरम्यान क्लबच्या अंतर्गत कलहामुळे आत्याच्या नवऱ्याचा गळा दाबून खून होतो. नवऱ्याच्या खुनात आत्याला अडकवलं जातं. आप्पासाहेब हुशार व बुद्धिमान वकील असतात, ते तिला सोडवतात.

अप्पासाहेबांच्या पत्नीचं आजारात निधन होतं. कांताला दिलेल्या शब्दासाठी आत्या अप्पासाहेबांशी लग्न करते.

आप्पासाहेबांच्या मालमत्तेची वारसदार आत्या होते. आप्पासाहेबांचा पुतण्या आत्याला अतिशय त्रास देतो. तर इकडे माहेरच्या जमिनीच्या हक्कावर आत्याला पाणी सोडावं लागतं. हे सारे घाव आत्याच्या मेंदूवर परिणाम करतात. सासर व माहेर तुटलेलं. आत्या निराधार होते. आत्या व आप्पासाहेबांनी प्रेमाने जोडलेली माणसं आत्याच्या मदतीला धावून येतात. मेंदूचं ऑपरेशन होतं. काळजी व वेळेवर औषधोपचार न घेतल्याने तिची स्मृती जाते. भल्या मोठ्या घरात मौन व विस्मृतीचा सामना करत आत्या जगत असते.

नानू आत्याच्या या अवस्थेचा शोध घेतो. पूर्वीची आत्या त्याला हवी असते. त्या दृष्टीने तो प्रयत्न करतो घराची डागडुजी, वारसाहक्काच्या कागदपत्रांचा वकिलामार्फत शोध, वैद्यकीय उपचार, आत्याला आवडणारे धार्मिक कार्यक्रम, धार्मिक स्थळांना भेटी आणि मुख्य म्हणजे नानूचं आत्याबद्दलचं प्रेम, जिव्हाळा यातून आत्या सुधारते व बोलू लागते. स्मृतिभ्रंश नाहीसा होतो.

कथेचा पट मोठा आहे. कथा आकार घेताना अनेक पात्रं, घटना व कथानकं येतात. ही एका कुटुंबाची कथा असल्यामुळे नात्याचा गोतावळा तर आहेच, त्यातला गुंता, त्यातून होणारा संघर्ष हे सर्व आहे. अनेक पात्रं असूनही कथेत कुठलेही पात्र उपरं वाटत नाही. प्रत्येक पात्र स्वतंत्र व स्वतःचं अस्तित्व शोधून जपणारं आहे. प्रत्येक पात्राचं जगणं वेगळं पण वाचकाला अंतर्मुख करणारं आहे. त्यामुळे कथा कुठेही सपाट होत नाही. वाचकाच्या बोटाला धरून ती पुढे सरकते.

या कथेत नात्याचे अनेक पदर उलगडले गेले आहेत. आत्या, मामा, मावशी, काका या नात्यातली सारी भावंडे, जोडलेले शेजारी यांच्यामध्ये जिव्हाळ्याचे बंध व सुसंवाद आहे. त्यातून घडलेल्या घटनांचा शोध घेतला जातो.

नानू आणि आत्या या नात्यात लेखकाने सुंदर रंग भरले आहेत. अतिशय अलवार, प्रेमळ जिव्हाळ्याने ओतप्रोत असे एक जिवंत चित्र लेखक रंगवतो. आणि मग वाचकही त्यातलाच एक रंग होऊन जातो.

नानू आणि आत्या यांच्यातला मूकसंवाद बोलका झाला आहे. आत्याला आठवत नाही. ती मौनात गेली आहे. ती फक्त हातवारे करत व्यक्त होते. तिच्या मनात विचारांचा कल्लोळ दाटला आहे. पण व्यक्त व्हायला शब्द सापडत नाहीत ती असहाय्य आहे. नानूचा तिच्यासाठी जीव तुटतो. मग तो तिच्या हालचालीचा, प्रतिसादाचा अर्थ उमजून घेतो. त्याला लहानपणी हरवला असता शोधणारी. तळहातावर लोण्याचा गोळा ठेवणारी, मनापासून जीव लावणारी आत्या आठवते.

एकदा नानू बाहेरून येतो. प्रचंड भूक लागलेली असते. तसे तो आत्याला सांगतो. आत्या त्याला मूकपणे जेवायला वाढते. तिने त्याच्या आवडीची लसणाची चटणी व वांग्याची भाजी केलेली असते. नानू मूकपणे चवीने जेवत असतो. आत्या संमिश्र भाव दाटलेल्या डोळ्यांनी दुरून त्याच्याकडे बघत असते. नानूला हे ठाऊक असते. आपुला ठाव न सांडता केलेलं हे प्रेम!

हा प्रसंग अनुभवताना कथा एका विशिष्ट उंचीवर जाते व वाचकही त्यात सहभागी असतो. आशय आणि

अभिव्यक्ती यांची एकरूपता प्रत्ययाला येते.

या कथेतलं कायम लक्षात राहणारं आणखी एक पात्र म्हणजे मिशेल. नानूची परदेशातली मैत्रीण. एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. तिला सृष्टीतल्या प्रत्येक सजीव-निर्जीव वस्तूबद्दल कृतज्ञता आहे. नानूचा वैचारिक गोंधळ मिशेलच्या विचाराने दूर होतो.

मिशेलकडे तिच्या बॉयफ्रेंडने दिलेला मैना असलेला एक पिंजरा आहे. मैनेशी संवाद साधला की, तिला पडलेले प्रश्न सुटतात. सॉलिलोक्की रेमडी, एम्पथी वगैरे तिच्या तत्त्वज्ञानाचा भाग आहे. झेन तत्त्वज्ञान तिला प्रिय आहे. अनुभव, वाचन, चिंतन यातून ती प्रगल्भ झाली आहे. कबूतर प्रिय व्यक्तीच्या मीलनाचा सांगावा आणतं, असं तिला वाटतं. नानू आणि मिशेल यांच्यातलं अतूट मैत्र ठाव न सांडता फुलत गेलं आहे.

एखादा लेखक आपला आवडता असतो. मग त्याच्याबद्दल किती आणि काय बोलावं असं होतं. तर काही वेळेला शब्दच अबोल होतात. दरेकरांचं कथालेखक म्हणून असलेलं स्थान, त्यांचा व्यासंग, विविध विषयाचा व अनेक भाषांचा अभ्यास हे सर्वज्ञात आहे त्याबद्दल काय बोलणार?

शेवटी शांताबाई शेळके यांचा एक दाखला देते.

एक नोबेल पारितोषिकविजेता लेखक म्हणतो, लेखकाचे लेखन म्हणजे शुद्ध गवंडीकाम. तो विटांवर विटा रचत जातो. पण विटा रचताना एक वेळ अशी येते, की अचानक एक खिडकी उघडते. अननुभूत असा प्रकाश त्यावर पडतो व सारे उजळून निघते.

दरेकर यांच्या कथेतला प्रकाशाचा एक कवडसा वाचकाच्या जगण्याचं भान प्रगल्भ करतो.

***

## गार्गीचा 'स्वरूप'शोध : 'अस्तिसूत्र'
## संवेदना प्रकाशन.

'अस्तिसूत्र' कादंबरीतले मध्यवर्ती पात्र गार्गी.

कादंबरीची सुरुवात आपण कोण? कुठून? काय? कसले? अशा आत्मशोध घेणाऱ्या प्रश्नांनी होते. लहानपणापासूनच गार्गी या प्रश्नाच्या उत्तराच्या शोधात आहे. मनात घर करून राहिलेले हे प्रश्न- त्याची उत्तरे कशी मिळणार?

गार्गी ही एक सामान्य मुलींपेक्षा एक वेगळी मुलगी आहे. खोल विहिरीचा काचेसारखा तळ शोधणारी. आपल्याला सतत पडणाऱ्या अंतर्विरोधाचं काय करायचं? हा तिचा खरा प्रश्न आहे.

आपण चालावे व इतरांना सोबत न्यावे या सूत्राने आयुष्य पुढे जात असते. आपण मात्र सामान्य वकुबाच्या, मृगजळामागे धावतोय.

कुणालसारखा हुशार होतकरू जोडीदार गार्गीला मिळतो. पण त्याचेही बिझनेसचे प्रश्न- चढउतार- त्यात संघर्ष -अनिश्चितता -विचित्र घडणाऱ्या घटना-

जिवाभावाचा भाऊ श्रेयस अचानक जर्मनीला निघून जातो. तिकडेच लग्न करतो. आत्येभाऊ माणिकचा कड्यावरून पडून मृत्यू होतो.

कसा लावायचा या साऱ्यांचा अर्थ? तिला 'शनिमाहात्म्य'मधला रत्नहार गिळणारा चित्रीचा हंस आठवतो.

घटना घडतात कशा ? इच्छेने की आपोआप, अनायासेच -

मग त्या ठरवतो कोण- आयुष्याला सादर व्हायचं तर मग आयुष्यातली धडपड कशासाठी- गार्गीचे प्रश्न

संपतच नाहीत.

कुणालबरोबर र्टिपला जाते, सारं रमणीय असतं तरी पण मनाच्या तळाशी काहीतरी टोचत असतं.

ट्रिपमधल्या छोट्या सनीला गार्गी हृदयाशी धरते त्यावेळचं शहारणं, स्पर्शाने जागी झालेली वेगळीच भावना – श्यामलचं गरोदरपण आठवणं– गार्गीला वाटतं हे आहे का आपलं अस्तित्वाचं सूत्र?

काहीतरी करायचं आहे, पण काय? पैसे मिळवायचे? तसं काही नाही. आपल्यातलं अकर्तेपण आपली पाठ का सोडत नाही?

कसं ओळखायचं स्वतःला? डोळ्यांतून वाहणारे हे कढ कधी संपणार? हे अवघडलेपण आणि तो 'मंगळ' ठणकत राहणारा– काय करायचं?

आपल्या नात्यातील व्यक्तींना मनासारखं त्यांचं जीवनसूत्र गवसलंय. मग आपलंच सूत्र का शोधता येत नाही? नि मग एक दिवस विपश्यना साधनेच्या शिबिराच्या निमित्ताने गार्गीला रसिका भेटते. आणि गार्गीला तिचं प्राप्तव्य भेटतं. गार्गीला 'स्वरूप' गवसतं.

विपश्यना– स्वतःचा शोध घेण्याची साधना. 'हार्डकोअर डाऊन टू अर्थ' ध्यान– कठोर तप.

गार्गीला वाटतं की, आपल्या आतला कठीण कातळ वितळतो. आतलं आपलं असं जवळ तर असत आपल्या!

रसिका आणि गार्गी यांच्यातला संवाद मूळ कादंबरीतच वाचायला हवा– वाचताना त्यातली खोली नितळपणा अनुभवायला हवा.

अहंभाव, नम्रता, अविरोध, द्रष्टा, द्वैत, निर्गुण, ऐहिक, सात्त्विक, तामस, गुणातीत, साक्षित्व, फलित आणि स्वरूप. हे सारं वाचताना मला संतांची मांदियाळी आठवली. त्यांनी तरी वेगळं काय सांगितलं?

'सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ।
दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुद्ध स्वरूपा जाणिजे । या नाव स्वरूपज्ञान ।।'

असो.

दरेकर यांची ही कादंबरी, चार प्रकरणांची छोटीच आहे, पण तिचा आवाका भारी आहे. कादंबरीत अनेक पात्रे आहेत. माई–बाबा, काका–काकू, शरू–तेजपाल, श्रेयश –श्यामल, वरुण–नंदिनी. आणि र्टिपमध्ये भेटणारे अनेक. सारेच आपला 'स्व' जपणारे. ही सर्वच पात्रे ठसठशीत व आपल्या वैशिष्ट्यांसह भेटतात. मनात राहतात.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लेखकाने आत्या, मावशी, मामा, काका, त्यांची मुले म्हणजे वेगवेगळ्या नात्यांतली भावंडे यांचं नातं लेखकाने फार सुंदर मांडले आहे. या नात्यांतले पदर उलगडताना त्याचं 'गर्भरेशीम' सुखावून जातं. आजच्या विभक्त कुटुंबाच्या पार्श्वभूमीवर हे फार लोभसवाणं व सुंदर व्यक्त झालंय असं वाटत राहतं. ही सारी लेखकाची किमया!

दुसरं म्हणजे यात सारी शास्त्रं गुण्यागोविंदानं नांदतात. इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, भविष्य, अध्यात्म, धर्म, श्रद्धा, मिथक–विज्ञान.

त्याचबरोबर अनेक भाषा हिंदी, तमिख ,कन्नड, इंग्लिश यावर असलेलं लेखकाचं प्रभुत्व. मराठी तर मायभाषा तिची शब्दकळा, भाषावैभव, अप्रतिमच!

पुस्तकातून लेखक वाचकाला भेटतो, आस्वादातून अनुभवाची प्रचीती देतो. वाचकाला घडवतो.

दरेकरजी, असंच लिहीत राहा. 'आरण्यक' वाचली. तिच्यावर नंतर.

# पीएच.डी. : एक करणे

## श्रीनिवास हेमाडे



साध्या, भोळ्या, भाबड्या, सुशिक्षित आणि कनिष्ट (ष्ठ नव्हे) ते सर्वोच्च मध्यमवर्गीय मराठी माणसाला ज्या काही चक्रमोत्तम सवयी असतात त्यातील एक म्हणजे दिवाळी अंक वाचणे. (दुसरी नाटके पाहणे आणि नाटके करणे! हल्ली मराठी कुटुंबे सीरियल्स खाण्याच्या नव्हे – बघण्याच्या सीरियल्सही करीत आहेत!) या दिवाळी अंकांमध्ये गेल्या काही वर्षांत मला जाणवलेला एक महत्त्वाचा बदल म्हणजे बहुतेक अंकांतील कथा–कादंबरी नायक व नायिकांचा शैक्षणिक दर्जा पीएच.डी. पर्यंत उंचावला आहे. एवढेच नव्हे तर इतरही लेखनात हा दर्जा दाणकन् समोर येऊन आढळतो.

साहित्यातील फार पूर्वीचे नायक व नायिका मॅट्रिक ते एम.ए. च्या टर्म्स भरीत असत. (एम.एस्सी. च्या नादी कुणी लागत नसे आणि कॉमर्सला जाण्याची पद्धतीच नव्हती! शिवाय नॉनमॅट्रिक ही पण एक्स्ट्रा पदवी होतीच.) बहुधा हे एम.ए. सुद्धा मराठीतच असे, कारण लेखकरावलोक मराठीचे प्रा (पोकळटिंब) असत. नुकत्याच सुरू झालेल्या तालुकावजा कॉलेजात (निर्ढावलेपणे) किंवा शहरातल्या जुन्या, प्रतिष्ठित कॉलेजात (दबकून दबकत दबकत ) हे लेखकरावलोक 'मराठी साहित्य' नामक थोर विषय शिकवित असत. (अख्ख्या मराठी यम्मेत जणू काही हाच एकमेव पेपर असतो, इतर काही पेपर नसतातच!) त्याकाली या लेखकरावांतील क्वचितच कुणी एखाद्दुसरा (किंवा दुसरी तिसरी चौथी लेखिकारावीण) पीएच.डी. झालेली असे. म्हणजेच हे प्रमाण अतिशय दैवदुर्मीळ असे. त्यामुळे पूर्वीच्या लेखक व लेखकिणींचे कथानायक व नायिका त्यांच्यापेक्षा कमीच शिकलेले इंटर, पी.डी. किंवा एफ्वाय बी.ए.च्या अथवा यम्मेच्या शेवटच्या वर्षाच्या टर्म्स भरीत राहत असत. (आत्ताच्या सोप्या भाषेत वर्गात हजर राहत असत. नोट्स काढण्याचे प्रयत्न करीत, अन् शेवटी कथानकाचे पूर्वकर्माचे फल म्हणून एकमेकांकडे वह्या मागत, त्यातून चिठ्ठ्याचपाट्या...)

पण अलीकडे नायक व नायिकांचा दर्जा सुधारला असून ते चक्क व झक्क पीएच.डी. करीत असलेले किंवा झालेले आढळतात. याचे कारण लेखकराव व लेखकराविणी पीएच.डी. झाले आहेत, असे नव्हे. ते बहुतेकजण पीएच.डी. चा चान्स हुकलेलेच असतात. मग स्वतःचे समाधान (व वाचकांवरील सूड म्हणून), स्वतःच्या अतृप्त शैक्षणिक वासनापूर्तीचा भाग म्हणून हे तथाकथित ज्ञानकामुक लेखक व लेखकिणी आपल्या नायक व नायिकांना पीएच.डी. करावयास भाग पाडतात किंवा त्यांना स्वतः कुलगुरूच असल्याच्या थाटात चक्क ती देऊनच टाकतात! मक्काय?! या नायक–नायिकांना कॉलेजांत, युनिर्व्हसिट्यांत नोकऱ्याही सहज व पटापट मिळतात.

(पण गंमत म्हणजे नेट–सेट ही प्रा (पो. टिं.) होण्याची essential and necessary condition आहे, या गोष्टीचे वारे मात्र अद्यापी या लेखकरावांना व राविणींना लागलेले नाही. (ते सगळे किचकटकट कटकटकटकटकट.... G.R. एक सामाजिक जबाबदारी म्हणून या लेखक–लोकांना पाठविण्याचे कष्ट महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय घेईल काय? – एक आवाहन!) पुन्हा जातपात, नातेवाईकशाही, संस्थेला देणग्या न देता त्यांना या प्राध्यापकीच्या

नोकऱ्या चक्क केवल गुणवत्तेनुसारच मिळतात. हा एक साहित्यिक व काव्यगतच चमत्कार म्हणावयाचा. रिझर्वेशन, सामाजिक समता, न्याय इत्यादी बाबीही या लेखकांच्या ध्यानात नसतात.)

गेल्या काही वर्षांपासून पुण्यामुंबईची सर्व प्रकारच्या लेखनांतील सुपर दादागिरी संपल्यामुळे इतर शहरांमधून (म्हणजे जरा मोठ्या खेड्यांमधून) व सुस्पष्ट बेफाम ग्रामीण भागातूनही लेखकलोक उदयास आले असून त्यांच्या त्यांच्या लोकबोलीत लेखन होत आहे. ही अर्थात मराठी सारस्वतास भूषणावह बाब आहे. (यात शंका कसली?) पण शहरी-ग्रामीण इत्यादी विविधता वगळता बहुतेक बिनपीएच.डी. लेखकांनी त्यांच्या लेखनात या पीएच.डी. या पदवीच्या उच्चाराचे तीनतेरा वाजवल्याचेच आढळते. पण वेगवेगळ्या पद्धतीने लिहिले गेल्यामुळे तिचे अर्थही वेगवेगळेच होतात, हे लक्षात घेण्यास मात्र त्यांना लेखनकामाठीतून वेळ मिळत नाही असे दिसते. (मराठीतील आद्य विनोदाचार्य चिं. वि. जोशी यांनी त्यांच्या 'चौर्य चिमणराव' या कथेत पीएच.डी.ची वेगळीच गंमत सांगितली आहे, पण ती सांगतानाही त्यांनी उच्चाराचे बारा वाजविलेले नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे.)

केवळ दिवाळी अंकच नव्हे तर नियतकालिके, मासिके, द्वैमासिके इत्यादी ठिकाणच्या रतिबामध्येही हीच अवनत स्थिती आढळते. 'त्यात आपलाही सिंहाचा वाटा असू द्यावा' की काय या भावुकश्रद्धेने काही मराठी वृत्तपत्रेही या पदवीच्या उच्चार-लेखनात घोडचुका करीत असल्याचे सजग वाचकांच्या लक्षात येईल. विशेषतः जिल्हा, तालुका इत्यादी पातळींवरील वृत्तपत्रांमध्ये तर हमखास या चुका आढळतात. (अशा लेखनचुकांना फार पूर्वीच्या वृत्तपत्रांमध्ये 'उ.सं.डु.' म्हणण्याची पद्धती होती. म्हणजे 'उप संपादकांच्या डुलक्या'. रात्रपाळीच्या (किंवा क्वचित दिवसपाळीच्याही) उपसंपादकाने डुलक्या घेत घेत काम केले की अशा चुका घडत. त्यामुळे तसे नाव पडले, पण स्वतःला दर्जेदार, अतिउच्च समजल्या जाणाऱ्या प्रकाशन संस्थेत अशा चुका घडल्या की 'मुद्राराक्षसांचा विनोद' अशा शब्दात या चुकांचे बारसे करून त्यांचा सांस्कृतिक दर्जा वाढविण्यात येई.)

या चुकांना जिल्हा पातळीवरील संपादकलोक दोन प्रकारे जबाबदार असतात. त्यांना स्वतःला भाषेची शुद्धाशुद्धता माहीत नसते. त्यामुळे त्यांच्याकडून चुका घडतातच, पण त्याच कारणामुळे लेखकांनी दिलेला मजकूर म्हणजे काही पवित्र धार्मिक आदेश अथवा देवाज्ञा असल्यासारखे वाटवून घेऊन तो मजकूर त्यातील चुकांसह जसाच्या तसा ठेवण्याची श्रद्धा बाळगायची ! कुणी विचारलंच तर ''लेखकांनी तसं लिहिल्लंय, त्याला आमी काय करणार? त्यांना विचारा'' असे भाविक उत्तर देऊन टाकायचे (म्हणजे अक्षरशः टाकून द्यायचे!)

हल्ली शुद्धलेखनाची जबाबदारी लेखकांवर न टाकता जबाबदार वृत्तपत्रांनी, दर्जा टिकविणाऱ्या प्रकाशन संस्थांनी खास मुद्रितशोधनासाठी माणसे नेमलेली असतात, किंबहुना तो स्वतंत्र विभागच असतो. ही मंडळी डोळ्यात तेल घालून भाषेची शुद्धता, पावित्र्य जपतात. पण त्यांनाही (व वाचकांनाही) जाहिरातीतील भाषिक चुकांपुढे नांगी व पेन टाकावे लागते. (जाहिरातीतील चुका दुरुस्त करण्याचे धोरण राबविणारे संपादकमहोदय अथवा व्यवस्थापन जन्मास घालण्याचे धाडस खुद्द सर्वधर्मीय ईश्वरानेही अद्यापी केलेले नाही, तिथे इतरांचं काय?)

या शुद्धलेखनात पीएच.डी. या पदवीचे दुभाग्य विशेषकरून दर्जेदार आहे. तिच्या लघुरूपाशी होणारा खेळ जीवघेणा व विनोदीच म्हणावा. खास करून ग्रामीण भागातील प्रा. माणूस; त्यातही पुरुष असेल तर त्याचे आप्त, नातेवाईक, मित्रमंडळी, तो जर संस्थेचा पदाधिकारी असेल तर तेथील लोक पीएच.डी. या शब्दाच्या उच्चार व लेखनाची जी काही वाट लावतात, ती आंतरराष्ट्रीय हायव्ह्चेच असते!!!! बरं या जाहिराती चांगल्या आठ कॉलमी, अर्धा पान भरून असतात.

बरे, ही साहित्यिक, लेखक व लेखकूमंडळी एकवेळ दर्जेदार व शुद्ध गाढवपणा करतात, असे म्हणण्याची सवलत देताही येईल. पण ही पदवी देणारी विद्यापीठे आणि शासकीय कार्यालयेसुद्धा असेच करतात, हे पुराव्यानिशी दाखवून देता येईल. उदाहरणार्थ, आपल्या सर्वांच्या आवडत्या आणि Oxford of The East चा ढोल

वाजविणाऱ्या पुणे विद्यापीठाने ‘समर्थ भारत अभियान’ या प्रकल्पाच्या प्रसिद्ध केलेल्या कार्यपुस्तिकेच्या मलपृष्ठावरही पी.एच.डी. असे लिहिलेले आहे. शासकीय कार्यालयातील अनेक प्रकारच्या आदेशांवर, पत्रांवरही पी.एच.डी. लिहिलेले असते. विशेषतः हे आदेश पीएच.डी. संबंधात असतील तेव्हा तर हे हमखास घडते. गंमत म्हणजे त्या आदेशांखाली सही करणारे अधिकारी स्वतः पीएच.डी. झालेले असतात. फार काय पण एका पीएच.डी.प्राप्त विदुषीच्या प्रबंधाच्या मुखपृष्ठावरच मी P.H.D. असे लिहिलेले पाहिले! गोल्डन एम्बोसिंग!! सुपरवायजरने सही केली, विद्यापीठानेही पदवीही दिली!! आता बोला (काय बोला? डोंबलं!)

सर्वसामान्य लोकांपासून ते निर्ढावलेल्या लेखकरावापर्यंत सर्वांनाच भुरळ टाकणाऱ्या या पदवीचे रहस्य तरी काय आहे? कोण देतं ही पदवी? मिळते कुठे? काय करावं लागतं त्यासाठी? त्याचा या लेखात एक धावता आलेख मांडला आहे. समस्त लेखक व लेखकिर्णीनी अनुक्रमे बाह्या आणि पदर, टी-शर्ट, छोटा टॉप इत्यादी आवरून-सावरून या वर्षाच्या दिवाळी अंकांसाठी लेखनाचे सांडगे घातले असतीलच.! हा लेख विशेषतः त्यांच्यासाठी (व मग उरल्यासुरल्या जनसामान्यांसाठी) आहे म्हंटले तरी चालेल.

दुसरे म्हणजे हा लेख कष्ट करून प्रामाणिकपणे केल्या जाणाऱ्या पीएच.डी. संबंधीचा आहे. लॉबिंग करून पदवीचा खेळखंडोबा करणाऱ्या पीएच.डी.बद्दल नाही. किंबहुना या पदवीचा इतिहास लक्षात न घेतल्यानेच लॉबिंग इत्यादी सवंगपणा व दर्जेदार अवकळा आणवली गेली आहे, असे म्हंटल्यास वावगे ठरू नये.

**सर्वोच्च पदवी**

पीएच.डी. ही सर्वोच्च दर्जाची शैक्षणिक पदवी असून ती मिळविलेल्या व्यक्तीला स्वतःला 'डॉक्टर' म्हणवून घेता येते. या पदवीचा लाँग फॉर्म Doctor of Philosophy असा असून शॉर्ट Ph. D. असा (PhD असाही) लिहिला जातो. या शॉर्टफॉर्म लिहिण्यापासूनच लेखकांच्या ज्ञानात्मक दिवाळखोरीची जाहिरात सुरू होते.

या पदवीचा उच्चार बिघडविण्यातील अतिअतिफेमस रूपडे म्हणजे पी.एच. डी. त्यानंतर पि.यच.डी., पिएचडी. पिएचडि., पीयचडि., पी.एचडी., पि. एउटी.इ.इ. तर ओरिजिनल इंग्लिशमध्ये लिहिण्याच्या अनिवार वासनेपायी तिचे लेखन P.H.D., P. hd., PH.d. P.HD. इत्यादी प्रकारांत केले जाते. हे लघुरूप कसे लिहिले तर त्याचा अर्थ काय काय चमत्कारिक होईल याचा मात्र तीळभरही विचार केला जात नाही.

खाली एक तक्ता दिला असून या तक्त्यात P. H.D. असे लिहिले जाणाऱ्या रूपाचे मूळ दीर्घरूप, संदर्भ, अर्थ व ज्या विचारविश्वात ही आद्याक्षरे वापरली जातात ती स्पष्ट केली आहेत (गृहपाठ म्हणून तुम्ही शब्दकोशात त्यांचे अर्थ शोधण्यास माझी तरी काहीच हरकत नाही, फक्त मला कळविण्याचे कष्ट करू नयेत, ही विनंती):

**PHD is short for :**

| Meaning | Category |
|---|---|
| 1. Paltry Hunka Dough | Miscellaneous--> Funnuies |
| 2. Partial Head Damage | Miscellaneous --> Funnies |
| 3. Particularly Hard Dancing | Community --> Sports |
| 4. Patent Application Information Retrieval | Governmental --> US Government |

| | |
|---|---|
| 5. Patented Hosel Design | Business --> General |
| 6. Perky Happy Disciple | Miscellaneous --> Funnies |
| 7. Permanent Head Damage | Miscellaneous --> Funnies |
| 8. Permanently Head Damaged | Internet --> Chat |
| 9. Personal Health Diary | Medical --> Physiology |
| 10. Philosophiae Doctor | Academic & Science --> Academic Degrees |
| 11. Physical Health Defined | Medical --> Physiology |
| 12. Piled High And Deep | Miscellaneous --> Funnies |
| 13. Pizza Home Delivery | Business --> General |
| 14. Pizza Hut Delivery | Business --> Firms |
| 15. Playa Hata's Degree | Miscellaneous --> Funnies |
| 16. Playa Hatin Degree | Academic & Science --> Universities |
| 17. Please Hire Desperate | Miscellaneous --> Funnies |
| 18. Poly Hedra Datacase | Computing --> File Extensions |
| 19. Poor Hungry -nd Determined | Miscellaneous --> Funnies |
| 20 . Port Hueneme Division | Governmental -->Military |
| 21. Port Huron and Detroit Railroad Company | Regional --> Railroads |
| 22. Post Hole Digger | Miscellaneous --> Funnies<br>Business --> Products |
| 23. Power Hungry Dog | Miscellaneous --> Funnies |
| 24. Premium Hot Dog | Miscellaneous --> Food |
| 25. Press Here, Dummy | Academic & Science --> Electronics |
| 26. Pretty Handsome Darling | Internet --> Chat |
| 27. Pretty Handsome Domestic | Miscellaneous --> Funnies |
| 28. Pretty Hard To Do | Community --> Educational |
| 29. Pretty High Dude | Community --> Educational |

| | |
|---|---|
| 30. Pretty Hokey Dialogue | Internet --> Chat |
| 31. Professional Hair Dresser | Business --> Positions |
| 32. Professional Hardware Diagnostics | Computing --> General |
| 33. Programs For Human Development | Community--> Educational |
| 34. Progress Harmony And Development | Community--> Educational |
| 35. Puclic Highway Distance | Governmental-->Transportation |
| 36. Purveyor Of Hyped Drivel | Internet--> Chat |
| 37. Push Here Dummy | Business--> Products |
| 38. Push Here, Dummy | Miscellaneous --> Funnies |

**संदर्भ :** www.hisa-wi.ore dictionary.htm

**गंभीर इतिहास!**

या पदवीचा इतिहास व तिचे महत्त्व फार मोठे आहे. ती एक अतिशय गंभीर प्रौढ पदवी आहे. ही पदवी मिळविणाऱ्यांची जगातीलच आजची संख्या जेमतेम एक टक्का आहे. पीएच.डी. या पदवीत मुख्य दोन संकल्पना आहेत! पहिली Doctor, दुसरी Philosophy. पहिली वैद्यकीय तर दुसरी शुद्ध तत्त्वज्ञानात्मक क्षेत्रातील मग सांधेजोड घालण्याचे कारण काय असेल?

**Doctor म्हणजे काय?**

Doctor या शब्दाची जातकुळी (आपणा मराठी विद्वानांना ज्याचा मोठा मूलभूत आधार असतो त्या) ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीने (OED) शोधून समस्त मानवजातीला (विशेषतः मराठी मानवजातीला) अनुदानच दिले आहे. या EOD च्या मते लिखित इंग्लिश भाषेत doctor हा शब्द इ. स. १३०३ नंतरच आला असावा. त्याचा त्या कालातील अर्थ doctors of the church म्हणजे 'चर्चचे शिक्षक' असा पर्यायाने 'खिस्ती धर्मग्रंथांचा अभ्यासक' असा आहे. १३७७ नंतर या शब्दाला आजच्या वैद्यकीय परिभाषेतील 'आजारांवर उपचार करणारी व्यक्ती' हा अर्थ प्राप्त झाला, अनेक संदर्भात हा शब्द कसा वापरला गेला, त्याचा संक्षिप्त इतिहास OED देते.

('विसाव्या शतकात भारतवर्षातील महाराष्ट्रदेशीच्या काही शहरी, बहुतेक जिल्हा वृत्तपत्रांनी, नियतकालिकांनी तो हवा तसा वापरला आणि मराठी दिवाळी अंकातील लेखकमंडळींनी तर त्याच्या लेखनपद्धतीतील पर्यायांनी एकच हैदोस थिंगाणा घातला आणि संकल्पनात्मक पातळीवर देशीवादाची मुळे रचली' असे म्हणण्याची पाळी लवकरच OED वर येणार असल्याची सनातन गुप्त वैदिक बातमी आहे, असे कळते. चु.भू. घे. पूर्णविराम, देणे नव्हे.)

Doctor या शब्दाचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. प्राचीन फ्रेंच भाषेतील व प्राचीन लॅटिन भाषेतील doctor चा अर्थ शिक्षक, मार्गदर्शक 'teacher- religious teacher' असा आहे. Docre या क्रियापदापासून doctor हे नाम बनते. Doctour याचेही मूळ docere म्हणजे दाखविणे, शिकविणे यात असून 'विद्यापीठातील सर्वोच्च पदवी धारण करणारा' हा अर्थ १३७५ मध्ये नोंदविला गेला. Medical professional हा अर्थ १३७७ मध्ये या शब्दास

प्रथम लागला. पण सोळाव्या शतकापर्यंत तो प्रचलित नव्हता, युरोपात जादूगारिणीस १७१८ साली witch doctor म्हणण्यात येत असे. Psychiatry ला १७०३ सालापर्यंत mad-doctor म्हंटले जात असे. Doctrine, Doctrinism इत्यादी शब्दही doctor पासूनच बनतात. Doctor Martens हा बुटांचा एक अवजड प्रकार १९७७ साली बाजारात आला. विणकराला spin doctor म्हणण्याची पद्धत १९८४ मध्ये आली. Doctor Brandy नावाची ब्रॅण्डीही आहे! (एक आध्यात्मिक + धार्मिक + शैक्षणिक योगदान व 'शिक्षक/शिक्षणसेवक' या जीवाणूंविषयी आदरभाव म्हणून दारूनिर्मात्यांनी Teacher's नावाची एक व्हिस्कीही बाजारात आणली आहे, बरं का! ती भारतात शिक्षकांचा बैलपोळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'शिक्षकदिनी' विशेष चवीची लागते.!)

**खिश्चॅनिटीतील डॉक्टर्स :**

'धर्मोपदेश तत्त्वज्ञ' या अर्थाचे काही डॉक्टर्स खिश्चन परंपरेत फार प्रसिद्ध आहेत. Saint Amcrose (इ.स.333 an 397), Saint Joreme, Pope Gregory The Great (इ.स.335 an 395), Saint Augstine (J.e.354 0 430), हे चौथ्या शतकातील चार धर्मतत्त्वज्ञ The Doctors of the Western Church नावाने सुपरिचित आहेत. तर Athanasius (373), Basil (379), Gregory of Nazianzum (390) आणि St John Chrysostom (406) हे चार पर्वत The Doctors of the Eastern Church म्हणून प्रसिद्ध आहेत. अन्य प्रसिद्ध डॉक्टर्स त्यांचा काल व त्यांची डॉक्टरकीची लोकनामे पुढीलप्रमाणे!

| क्रमांक | नाव | काल | डॉक्टरकीचे लोकनाम |
|---|---|---|---|
| 1 | Alexander of Hales | 1185-1245 | Doctor Irrefragacilis Irrefragacility: 'ज्याचे खंडन करता येत नाही' एक जुना लॅटिन शब्द. |
| 2 | Saint Thomas Aquinas | 1225-1274 | Angelic Doctor Doctor Cummnis |
| 3 | Roger Bacon | 1214-1293 | Doctor Miracilis Miracility: 'थक्क करणारे आश्चर्य' किंवा 'अतिशय उच्च दर्जा' एक जुना लॅटिन शब्द. |
| 4 | Albert The Great | 1193-1280 | Doctor Universalis. |
| 5 | Saint Bonaventure | 1221 - 1294 | Doctor Seraplhicus |
| 6 | Richard of Middleton | माहीत नाही | Doctor Illuminatus |
| 7. | Giles of Rome | माहीत नाही | Doctor Fundatissumus |
| 8 | Henry of Ghent | माहीत नाही | Doctor Solemnis |
| 9. | Duns Scotus | 1266 - 1308 | Doctor Suctilis |

या विचारवंतांनी खिस्ती धर्म व ॲरिस्टॉटलचे (इ.स. पू. ३८२–३२२) तत्त्वज्ञान यांचा मेळ घालून त्यातून एक चिरेबंदी स्वरूपाची तात्त्विक व धार्मिक व्यवस्था निर्माण करण्यात फार मोठे योगदान दिले आहे. हे सर्वजण चर्चच्या

तत्त्वज्ञानाचे अधिकृत प्रवक्ते होते. (जाणकारांनी या यादीत भर घालावी.)

या सर्वांना Doctor म्हंटले जात असले तरी खिश्चनधर्माच्या मते खरे तर कोणत्याही मर्त्य मानवाला Doctor ही पदवी देता येत नसते. कारण जगात Doctor असे ज्यास यथार्थतेने म्हणता येते अशी दैवीगुणसंपन्न केवल आणि केवल एकमेवाद्वितीय व्यक्ती म्हणजे खुद्द येशूच! असे जुन्या करारात म्हंटले आहे. (सेंट मॅथ्यूचे शुभवर्तमान २३. १० इति OED! पण या संदर्भाबाबत मला शंका आहे. हा संदर्भ मी शोधण्याचा प्रयत्न केला. पण बायबलच्या कोणत्याही आवृत्तीत या शुभवर्तमानात मूलतः Doctor हा शब्द वापरल्याचे मला आढळले नाही. त्याऐवजी Teacher 'गुरू' (Religious Teacher या अर्थाने) हा शब्द आणि Master ही संज्ञा येशूखिस्ताला समान अर्थाने उद्देशून वापरली आहे. पण OED ने मात्र संदर्भ देताना शब्दकोशात Doctor हाच शब्द वापरला आहे.

दुसरे म्हणजे सेंट ल्युकच्या शुभवर्तमानात Doctor of Law असा शब्दप्रयोग येतो. येथे Law म्हणजे प्रभूची आज्ञा. बायबलच्या Genesis, Exodus, Leviticus Nbmcers, Deuteronomy या पहिल्या प्रकरणांना - Acts म्हणतात. या Act च्या अभ्यासकांना व ते शिकविणाऱ्यांनाही Doctor म्हंटले जाते. ही पाच प्रकरणे म्हणजे ''प्रभूची आज्ञा – Laws'' आहेत, अशी श्रद्धा आहे त्यामुळे त्यांच्या अभ्यासकांनाच खरे तर Doctors of Law म्हणण्याची पद्धती आहे. विशेषतः ज्यू धर्मोपदेशकांना ही पदवी दिली जात असे. येशूखिस्त हाच स्वर्गीय डॉक्टर असल्याचेही जुन्या करारात अन्यत्र (?) म्हंटले आहे, असे OED म्हणते.

**Philosophy म्हणजे काय?**

या प्रश्नाचे उत्तर (तुमची वाचण्याची अथवा ऐकण्याची तयारी असेल तितका वेळ व तितकी वर्षे) विस्तारपूर्वक देणे मला शक्य असले तरी मी ती माहिती येथे थोडक्यात पुरेशी व उपयुक्त ठरेल इतकी देतो.

Philosophy चा अनुवाद मराठीत 'तत्त्वज्ञान' असा आहे. पण Philosophy व तत्त्वज्ञान ही परस्परांची योग्य भाषांतरे नाहीत. कारण तत्त्वज्ञान' या संज्ञेला संस्कृत भाषा व वैदिक परंपरेत विशेष अर्थ आहे. त्यानुसार अंतिम सत्य समजल्या जाणाऱ्या, माणसाचे मूळ स्वरूप समजल्या जाणाऱ्या 'ब्रह्म'चे ज्ञान= ब्रह्मज्ञान' म्हणजे तत्त्वज्ञान होय. खेरीज 'दर्शन' असाही शब्द असून Philosophy चे मराठी भाषांतर म्हणून तत्त्वज्ञान ऐवजी 'दर्शन' हा शब्द वापरणे, योग्य समजले जाते. शिवाय इतर अवैदिक अर्थही आहेतच, पण या सगळ्या खोलात जाण्याचे इथे कारण नाही. (सोपेपणासाठी दोन्हीतिन्ही शब्द येथे समानार्थकतेनेच वापरीत आहे.) बहुतेक आध्यात्मिक चॅनलांवरून तत्त्वज्ञानसदृश्य गोष्टींचा भडिमार चालू असतो, त्याचा या वैचारिक स्वरूपाच्या तत्त्वज्ञानाशी काडीचाही संबंध नाही.

Philosophy हा इंग्लिश शब्द असला तरी त्याचे मूळ मात्र प्राचीन ग्रीक भाषेत, तत्त्वज्ञानात, संस्कृतीत आहे. Philosophy हा शब्द Philo आणि Sophia यांच्या संधीतून बनतो. (त्यांचे मूळ धातू अनुक्रमे Philein, Sophia. Philein म्हणजे Love आणि Sophia म्हणजे Wisdom म्हणून Philosophy L= ove of Wisdom शहाणपणाविषयी प्रेम.)

प्राचीन ग्रीक कालात (इ.स.पूर्व अंदाजे ८०० वर्षापासून ते इ.स.चे दुसरे शतक) तत्त्वज्ञान, विज्ञान, कला, साहित्य, संगीत, धर्म इत्यादी सर्व प्रकारच्या ज्ञानप्रकारांना Philosophy हे एकच नाव होते. आज जसा आपण सामाजिक शास्त्रे व नैसर्गिक शास्त्रे, मानव्यविद्या इत्यादी फरक करतो, तसा फरक ग्रीक कालात केला जात नसे. कारण तसे निकष व ज्ञानाची विभागणी नव्हती. त्यामुळे जे कोणी स्त्री–पुरुष ज्ञानविषयक चर्चा करीत, क्वचित लिहीत असत, त्यांना सर्वांनाच Philosopher म्हंटले जाई. उदाहरणार्थ सॉकेटिस, प्लेटो, त्याचा शिष्य ॲरिस्टॉटल (इ.स.पू. ३८४ ते ३२२). ॲरिस्टॉटल हा अनेक शास्त्रांचा जनक असूनही तो 'शास्त्रज्ञ' म्हणून प्रसिद्ध असण्याऐवजी

‘तत्त्वज्ञ’ म्हणूनच जास्त प्रसिद्ध आहे, याचे कारण वरीलप्रमाणे देता येईल. वास्तवात ग्रीकांमध्ये स्वतःला Philosopher म्हणवून घेणारा पहिला विचारवंत म्हणजे पायथागोरस (इ. स.पू. ५८२ ते ५०६) हा गणिती.

**विज्ञानांची आई**

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाने तत्त्वज्ञान या विषयातच एक काटेकोर विभागणी कालक्रमात विकसित केली. ती अशी : सद्वस्तुशास्त्र (Metaphysics), ज्ञानशास्त्र (Epistemology), तर्कशास्त्र (Logic) नीतिशास्त्र (Ethics), सौंदर्यशास्त्र (Aesthetics) यांना ‘तत्त्वज्ञानाच्या शाखा’ म्हणता येईल. तत्त्वज्ञानाने असे वर्गीकरण धारण करणे म्हणजे तत्त्वज्ञान प्रगल्भ, समृद्ध व प्रौढ अवस्थेत येणे, असे समजले जाते. या वर्गीकरणामुळे त्या त्या तत्त्वज्ञानाचा स्वतंत्रपणे किंवा तुलनात्मक अभ्यास अधिक सुस्पष्टपणे व सम्यक्, यथार्थ आकलनास सहाय्यभूत ठरतो. शिवाय कोणत्याही नव्या ज्ञानशाखांची रचना करताना तत्त्वज्ञान त्या ज्ञानशाखेस तिची तात्त्विक स्वरूपाची मूलतत्त्वे निश्चित करून देते. (पण अलीकडे, विशेषतः आधुनिकोत्तर कालात हा मुद्दा वादग्रस्त बनला आहे) म्हणजे त्या ज्ञानशाखेने कोणते सत्य, ज्ञान, तर्कपद्धती, नीती, सौंदर्य जाणीव विकसित केली आहे, याचा शोध घेण्यास मदत करते.

तत्त्वज्ञान एका प्राचीन अर्थाने अनिश्चित प्रश्नांचा शोध घेणारी बौद्धिक कलाकृती असते. इतर सर्व शास्त्रांप्रमाणेच तत्त्वज्ञानाचासुद्धा ‘काहीएक ज्ञान मिळविणे’, हा प्रधान उद्देश असतो. तत्त्वज्ञानाला हवे असलेले ज्ञान म्हणजे सर्व प्रकारच्या विज्ञांनाना सामाजिक व निसर्ग विज्ञानांना एकत्रित करून त्यांची व्यवस्था लावणारी आपली ठाम मते, पूर्वग्रह आणि समजुती ज्या पुराव्यावर आधारलेल्या असतात त्यांच्या चिकित्सक परीक्षणातून निर्माण झालेले, अशा स्वरूपाचे असते. पण तत्त्वज्ञान जे प्रश्न उपस्थित करते, त्यांची निश्चित उत्तरे देण्यात ते नेहमी यश मिळवितेच असे नाही! पण ते सतत नवे नवे प्रश्न निर्माण मात्र करीतच असते. (खरे तर ‘उत्तराची अनिश्चितता’ ही तत्त्वज्ञानाची खासियत असते. ती ज्या समाजात बंद पडते तो समाजही स्वतःचा विकास करून घेण्यात कोणत्याही नवनिर्मितीच्या क्षेत्रात व्यवस्थितरीत्या बंद पडतो!)

उदाहरणार्थ, ईश्वर म्हणजे काय? मन म्हणजे काय? सत्य म्हणजे काय? ईश्वर म्हणजेच सत्य काय? विज्ञान म्हणजे काय? अशा गूढ समस्यांचा विचार ते करते, पण गंमत अशी की त्या प्रश्नाचे उत्तर सापडले की तो प्रश्न तत्त्वज्ञानापासून एखादे फळ पक्व होऊन अलग व्हावे तसा वेगळा होतो, म्हणजे एखाद्या शास्त्राविषयी निश्चित ज्ञान प्राप्त करून घेणे शक्य झाल्याबरोबर त्याची गणना तत्त्वज्ञानात करणे सोडून दिले जाते ते स्वतंत्र शास्त्र (The Science) बनते. एकेकाळी ग्रीककालापासून वेदकालापासून खगोलशास्त्राचा अभ्यास तत्त्वज्ञानात होत होता. पण निश्चित उत्तरे मिळू लागल्यानंतर खगोलशास्त्र स्वतंत्र झाले. न्यूटनच्या महान ग्रंथाचे नाव ‘भौतिक तत्त्वज्ञानाची गणिती तत्त्वे’ असे होते. नंतर हे ‘भौतिक तत्त्वज्ञान’ पदार्थविज्ञान म्हणून नावारूपाला आले. प्राचीन काळी मनाचाही अभ्यास तत्त्वज्ञानातच होत होता. पण आज त्याचेच मानसशास्त्र तयार झाले. गेल्या काही वर्षात ‘विचार करणारे यंत्र तयार करता येईल का?’ असा प्रश्न आला, आता त्याचे संगणकशास्त्र बनते आहे. (विचार न करणारे गुलाम तयार करता येतील का? या प्रश्नातून जगात वर्णव्यवस्था आणि भारतात जातीव्यवस्था आली.)

या अर्थाने तत्त्वज्ञान हे कोणत्याही ज्ञानशाखेचे उगमस्थान असते. कोणत्याही ज्ञानविषयक प्रश्नाचे स्वरूप मुळात तात्त्विक असते, त्याचे उत्तर मिळाले की त्याचे विज्ञान बनते, मग ते सामाजिक असेल अथवा निसर्ग विज्ञानाचे असेल वा मानव्य इत्यादी असेल. हा नियम सर्वच ज्ञानशाखांना लागू होतो. त्यामुळे तत्त्वज्ञानास ‘विज्ञानाचे विज्ञान’ (The Science of Sciences) म्हंटले जाते.

तत्त्वज्ञानाबद्दलचा आदरभाव व्यक्त करण्याची सुसंस्कृत रीत म्हणून तत्त्वज्ञानास ‘विज्ञानांची आई’ (The

Mother of All Sciences) असेही म्हंटले जाते. एखादे विशिष्ट तत्त्वज्ञान मान्य असण्यानसण्याचा संबंध हा आदरभाव व्यक्त करण्यात आडवा येत नाही स्वतः च्या आईला किंवा तत्सम ओळखीच्या (प्रसंगी अनोळखी स्त्रीला ही) 'आई' संबोधण्याने जो स्त्रीत्वाबद्दलचा, मातृसत्ताकतेबद्दलचा आदरभाव व्यक्त होतो, तोच तत्त्वज्ञानाला सर्व विद्यांची जननी, माता, आई म्हंटल्याने होतो, हे इथे लक्षात घेतले पाहिजे ! (पण एका आईची काही मुले चांगली तर काही वाईट, गुन्हेगारी प्रवृत्तीची असू शकतात. सर्व मुलांवर आई चांगले संस्कार करीत असली तरी काही मुले चापलूस निपजतातच. अशा प्रौढ व जाणत्या वाईट मुलग्या-मुलीच्या वाईट वर्तनाबद्दल आईला जबाबदार धरणे अतार्किक, अनैतिक असते. शिवाय भाऊबंदकीचा शाप वास्तवातील आईला जसा भोगावा लागतो तसा या तत्त्वज्ञानरूपी आईलासुद्धा भोगावा लागतोच. ती तर मानवाची शोकांतिका आहे. अधिकृत भारतीय तत्त्वज्ञान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अद्वैत वेदान्ताप्रमाणे सर्व मानवांमध्ये एक व्यापक आध्यात्मिक समता आहे. पण वास्तवातील वर्णव्यवस्थेनुसार एकाच विराट्पुरुषाचे मुलगे असूनही शूद्र भावाला इतर तीन भावांकडून सतत अन्यायच सहन करावा लागतो, ही तर थेट भारतीय तत्त्वज्ञानरूपी मातेच्या दृष्टीने आध्यात्मिक व तत्त्वज्ञानात्मक भाऊबंदकी झाली!)

### विद्यावाचस्पती

हे दोन्ही अर्थ लक्षात घेऊनच बहुधा Ph.D. चे मराठी भाषांतर पुणे विद्यापीठाने 'विद्यावाचस्पती' केले असावे. (प्रत्येक विद्यापीठ वेगवेगळे भाषांतर करते.) प्रामाणिक भाषांतर 'तत्त्वज्ञानातील शिक्षक' असे व्हावयास हवे. पण ते भाषांतर प्रामाणिक असले तरी योग्य वाटत नाही. उलट 'विद्यावाचस्पती'चे भाषांतरही काही Doctor of Philosophy असे होऊ शकत नाही. कारण आज या पदवीचा, Ph.D. चा धार्मिकतेशी काही संबंध उरलेलाच नाही निधर्मवादावर पीएच.डी. करता येते. शिवाय वाचस्पती या संज्ञेचा अर्थही वैदिक आहे. पण आजचे विद्यावाचस्पती वैदिक असतातच / असावेतच, असे नाही. (म्हणूनच एक परंपरा, सोय, किचकटपणा टाळण्यासाठी म्हणून आपले पुणे विद्यापीठ 'विद्यावाचस्पती'ला Doctor of Philosophy चे भाषांतर व पर्यायी शब्दयोजना म्हणून मोठ्या भाविकतेने वापरते झाले! असो. म्हणजेच नसो.)

### जगातील पहिली Ph.D.

'धर्मोपदेशक तत्त्वज्ञ' या गंभीर अर्थाची जगातील पहिली Ph.D. पदवी प्राचीन इटलीच्या उत्तर-मध्य प्रांतातील बोलोना (Bologna) येथे बाराव्या शतकात दिली गेली. ती बहुधा Seytn Austyn या धर्मोपदेशकास मिळाली असावी. तथापी त्याकालात तिचे नाव D.L. Doctor of Law असे होते. अर्थातच येथे Law म्हणजे 'प्रभूची आज्ञा' असा आहे. ही Doctor of Law पदवी प्राथमिक काळात ऑक्सफर्ड व हुरहॅम युनिर्व्हर्सिटीज्कडून दिली गेली. A Doctor of Laws ही केंब्रिज, डब्लिन युनिर्व्हसिटीज्कडून दिली जात होती.

### Doctors Commons

Doctor of Laws ही पदवी इतकी महत्त्वाची होती की तिच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठीच जणू काही १५०९ साली लंडनमध्ये एक सोसायटी स्थापन झाली. तिचे सर्व सदस्य Doctor of Laws चे पदवीधारक होते. ही सोसायटी सेंट पॉल्स कॅथड्रल या भव्य इमारतीत बैठका घेत असे. तेथील एका अतिशय अवाढव्य खोलीत या बैठका होत. ही बैठक साहजिकच एका प्रचंड आकाराच्या टेबलाभोवती भरे. या बैठकीलाच Doctors Commons असे नाव मिळून ही सोसायटी प्रसिद्ध झाली.

कालांतराने ही सोसायटीने १७६८ साली स्वतःला The College of Doctors of Laws (of Oxford and

Cambridge) असे नाव धारण केले. ती राजकीय व धार्मिक सत्तेत प्रबळ झाली, तिच्या बैठकांमुळे त्या महाकाय इमारतीच्या संबंधित भागालाच 'The College of Doctors of Laws' (of Oxford and Cambridge) नावाने ओळखले जाऊ लागले.

**Doctor कीच्या डिग्र्या!**

पाश्चात्त्य परंपरेत Doctor असण्याला इतके महत्त्व प्राप्त झाले आहे की Ph.D. पर्यंत तिचा वापर मर्यादित न राहाता तो सर्वव्यापी झाला, बहुतेक सर्व विद्याशाखांमध्ये वेगवेगळ्या रीतीने तरी उपयोगात आणला गेला, अनेक पदव्या त्यापासून तयार झाल्या.

D.D. Doctor of Divinity
D.Lit. Doctor of Literature
D. Litt .= Doctor of Letters (Literarum Doktor)
D. S. Doctor of Science
LL.D. Doctor of Laws (LL. म्हणजे Legum Doctor म्हणजे Doctor of Laws)
M. D. Doctor of Medicine (लॅटिन भाषेत Medicina Doctor, १७५५ मध्ये ही पदवी प्रचारात आली.)
Ph.D. आणि D.Phil. या दोन्हीचा एकच अर्थ Doctor of Philosophy.

**Dr. = कर्जदार**

आपण मोठ्या उत्साहात व्हीजिटिंग कार्डावर व दारावरच्या पाटीवर Dr. लिहितो, पण सावधान! या नुसत्या Dr. चा एक अर्थ debtor कर्जदार, देणेकरी असाही होतो! काही बँका, पतसंस्था येणे रकमेपुढे Dr. असे लिहितात तसेच doctoring म्हणजे विषप्रयोग करणे, असा अर्थ सुद्धा होतो.

हे असे अनेक अर्थ असले तरी मराठीत (अर्थात जगातच सर्वत्र म्हणा) Doctor म्हणजे जनसामान्यांच्या भाषेत ‘वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर’ व्यवहारात हाच अर्थ उपयोगी पडतो. उदाहरणार्थ एखादे प्राध्यापकमहोदय किंवा महोदयीण जरी 'Doctor झालेले /ली असते /ली तरी रेल्वे, विमानाच्या रिझर्वेशन फॉर्मवर ‘डॉक्टर आहे’ असे लिहिण्यास घाबरतात, कारण तेथे ‘डॉक्टर’ चा अर्थ शहाणा माणूस (किंवा शहाणपणा करणारा माणूस) असा नसून ‘दवापान्यावाला डॉक्टर’ असा असतो. म्हणून ही प्रा. (पोकळ टिंब) मंडळी मुकाट्याने प्रा. (तेच ते! आधीच्या कंसातले) असे गपचिप लिहितात. व्हिजिटिंग कार्डावर व घराच्या पाटीवर मात्र....) मराठीतील ‘डागतर’ हा कलोक्वीयल् लँग्वेजमधील शब्दसुद्धा वैद्यकीय अर्थाचाच शब्द आहे. पण काही डॉ. प्राध्यापक मात्र मेडिकल प्रिस्क्रिप्शन देतानाही मी पाहिले आहेत! (झालात ना थक्क? मी तर थक्केष्ट झालो होतो.)

**पाश्चात्त्य परंपरेत मूळ :**

Doctor हा शब्द जसा पाश्चात्त्य परंपरेतून आला तशी त्याची पदवीसुद्धा पाश्चात्त्य शैक्षणिक परंपरेतून आलेली आहे, हे वेगळे सांगावयास नको. (खरे तर तत्त्वज्ञास डॉक्टर म्हणण्याचा आद्य मान भारतीय परंपरेकडेच गेला पाहिजे. कारण गौतम बुद्धालाही वैद्य म्हंटले आहे. ‘दुःख’ या अतिप्राचीन रोगावर उपचार करणारा तो खरा वैद्य आहे. बुद्धासाठी वैद्य, Doctor, Teacher अशा संज्ञा बौद्ध वाङ्मयात जागतिक पातळीवर वापरल्या जातात, तेव्हा त्याचा अर्थ ‘शिक्षक’ व ‘वैद्य’ असा दोन्ही अर्थ शोधता येतील, इतका तो व्यापक होऊ शकतो.)

Doctor of Philosophy ही पदवी लॅटिन भाषेतील Philosophiae Doctor किंवा Doctor philosophiae चे रूपांतर असून त्याचा ग्रीक अर्थ Teacher of Philosophy असा होतो. त्यास बराच काळ D.Phil., असेही म्हंटले जात होते. लॅटिन भाषेतील docere, doceo म्हणजे शिकविणे या मूळ शब्दापासून doctor शब्द बनतो आणि मध्यमवयीन व्यक्तीला doctor म्हंटले जाते. या पदवी मिळविण्यातील दोन बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

पहिली बाब म्हणजे Ph.D. ही सर्वोच्च पदवी मुख्यतः तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ज्याने काही भरीव, दीर्घकालीन काम केले आहे, आपल्या पूर्वसुरींचे अनुमोदन मिळविले आहे, आपल्या अभ्यासविषयातील एखाद्या निवडक घटकावर, एखाद्या शाखेत व्यापक व मूलभूत संशोधनाचे काम केले आहे अशाच व्यक्तींना विद्यापीठांकडून दिली जाते.

दुसरी बाब म्हणजे ही पदवी एखाद्या तरुण माणसाला न देता मध्यमवयीन व्यक्तीला देण्याचा पाश्चात्त्य विद्यापीठांचा कटाक्ष होता !!

याचा अर्थ काय? तर ''संबंधित संशोधकाने तरुण वयात काम सुरू केले असून ते पूर्ण करण्याच्या वेळेस तो मध्यमवयास पोचला,'' असे गृहीत धरले आहे. ज्ञानप्राप्तीची परिपक्वता, गंभीरता, महत्त्व त्यास कळाले आहे, त्या पदवीचा ज्ञानात्मक वाचक अर्थ त्यास उमगला आहे. अध्ययनात ज्ञानार्जनात, ज्ञानप्रसारात त्याने आयुष्याचा इतका दीर्घकाल घालविला आहे की ज्यामुळे त्याला मध्यमवय प्राप्त झाले आहे. तो टाईमपास नाही, हे ज्यास कळते, तोच ही पदवी मिळण्यास पात्र गृहीत धरले आहे.

(आजकाल अतितरुण माणसे पी. जी. झाली की पीयच.डी.ला आता मिळवितात. गाईडलोकही मिळवून देतात, कलियुगाचा महिमा. दुसरे काय?)

**पीएच.डी. चा तात्त्विक अर्थ!**

पीएच.डी. म्हणजे तत्त्वज्ञानाचा शिक्षक असा अर्थ असेल तर इतर विषयांत, ज्ञानशाखांमध्ये पीएचडी करणे, याचा अर्थ काय? त्या संशोधनाचा, त्या ज्ञानशाखेचा व तत्त्वज्ञानाचा संबंध काय आहे? उदाहरणार्थ, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र इलेक्ट्रॉनिक्स, रसायनशास्त्र, मराठी, हिन्दी, वाणिज्य शाखा इत्यादींत पीएच.डी. मिळविणे याचा नेमका अर्थ काय होतो?

मुळात पीएच.डी. करणे म्हणजे संशोधकाने मानवी जीवनाचा मला उमगलेला अर्थ स्पष्ट करणे, जीवनाच्या ज्या पैलूचा मी अभ्यासक आहे त्या पैलूंतून, दृष्टिकोनातून, परिप्रेक्ष्यातून मला माणूस कसा भावतो, जाणवतो त्याचे यथार्थरीत्या हंसनीरक्षीरविवेकबुद्धीने चित्रण करणे असते! एका अर्थाने हे माझे तत्त्वज्ञान मांडणे असते, याचा अर्थ तात्त्विक विचार मांडण्याइतपत प्रगल्भता मिळविणे, गांभीर्याने जीवनाकडे पाहणे होय. मुख्य म्हणजे मी माझा स्वतःचा शिक्षणविषयक दृष्टिकोन विकसित करणे, त्याच्या व्यवहार्यतेचा शोध घेणे असते.

शिक्षण ही माणसाची जनावरापासून माणूस होण्याची प्रक्रिया असल्याने ''मी या मूलभूत घटकाकडे मूल्यात्मकतेनेच पाहिले पाहिजे, अशी माझी जबाबदारी पीएच.डी. करण्यात गृहीत असते. त्यातूनच माझा समाजाकडे, विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होत असतो. तो जितका सकस, निरोगी, कमाल पातळीवर लोकशाहीवादी असेल, तितका मी जास्त चांगला डॉक्टर होण्यास तात्त्विक अर्थाने पात्र होतो. ''

हे मर्म उमगले तर कोणत्याही विषयात पीएच.डी. करणे, याचा मूळ तात्त्विक अर्थ त्या विषयाचे तात्त्विक अधिष्ठानाचे स्वरूप संशोधकाने शोधले आहे, ज्ञानाची आदिमाता असलेल्या तत्त्वज्ञानाशी त्या ज्ञानशाखेचे, संबंधित

विषयाचे नाते स्पष्ट केले आहे, या ज्ञानाच्या वंशावळीत संबंधित पीएच.डी.च्या प्रबंधाने काहीएक विशिष्ट स्वरूपाची मूलभूत भर घातली आहे असा होतो. हे काम एखाद्या घराण्याच्या वंशावळीत स्वतःच्या विद्यमान पिढीची जागा काय आहे, हे निश्चित करण्यासारखे आहे !

थोडक्यात दोन महत्त्वाच्या प्रश्नांचे उत्तर कोणत्याही पीएच.डी.बाबत विचारले पाहिजेत :

एक : संबंधित संशोधकाने व त्याच्या संशोधनाने तत्त्वज्ञानाकडून कोणते संस्कार घेतले आहेत?

दोन : ते संशोधन एकूण ज्ञानव्यवस्थेतच कोणती नवी भर घालते?

या प्रश्नांची उत्तरे हे शोधणे म्हणजे पीएच.डी. करणे, आपण काय शोधू? ते आपणास माहीत नसते. त्यामुळेच हा अनिश्चिततेचाच शोध असतो. तेच तत्त्वज्ञान असते.

थोडक्यात, कोणत्याही विषयातील पीएच.डी. असो, तिच्यामुळे एकूणच मानवी संस्कृती, जीवन, कला, तत्त्वज्ञानात कोणती यथार्थ भर घातली आहे, हे शोधणे असते. आपल्या विषयात ज्ञानशाखेत पीएच.डी. करणे हा त्या मूळ महाव्यापक इ. ज्ञानप्रकल्पातील आपला केवळ खारीचा वाटा असतो.

**तत्त्वज्ञानातील पीएच.डी.**

असे तत्त्वज्ञानात्मक स्वरूप असलेली पदवी जेव्हा खुद्द 'तत्त्वज्ञान' या विषयातीलच असते तेव्हा तिचे स्वरूप आणखी किती उच्च, सर्वोच्च दर्जाचे व मूलभूत असते, याची कल्पना केलेली बरी! तत्त्वज्ञान या विषयातील कोणत्याही एका उपविषयावर अथवा एखाद्या घटकावर किंवा एखाद्या तात्त्विक समस्येवर पीएच.डी. करणे म्हणजे केवल आणि केवल शुद्ध तात्त्विक विचाराची निर्मिती करणे होय! Doctor Of Philosophy in Philosophy itself! किती उदात्त बाब असते ही!

आपला संशोधित विचार जागतिक विचारांमध्ये भर घालणारा, मानवी संस्कृतीला समृद्ध करणारा असला पाहिजे, ही किमान अपेक्षा तर येथे असतेच. पण इतरही अटी पूर्ण कराव्यात अशा अपेक्षा येथे असतात. कोणत्याही विषयातील पीएच.डी. पेक्षा तत्त्वज्ञान या विषयातील पीएच.डी. पदवी ही दर्जा, आकलन, तात्त्विकता, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष उपयोगिता इत्यादी अनेक बाजूंनी सर्वोच्च असते. निदान सैद्धान्तिकदृष्ट्या तरी.

**पीएच.डी. चे मूलभूत तीन घटक :**

**१. पहिला घटक :**

विद्यार्थ्याने नेहमीचे अभ्यासक्रम, पेपर्स इत्यादी कोर्सेस पूर्ण करणे, ते यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर तो विद्यार्थी स्वतःला Ph.D. चा candidate म्हणवून घेण्यास पात्र होतो, येथे असे गृहीत धरण्यात येते की, संबंधित अभ्यासक्षेत्रात सदर विद्यार्थ्याने संपूर्ण प्राविण्य प्राप्त केलेले आहे. ही अर्थात पाश्चात्त्य व युरोपीय विद्यापीठांमधील पद्धती आहे. (भारतीय विद्यापीठांमध्ये असे पीएच.डी. से कोर्स असतीलच असे नाही इथे पद्धती वेगळी असू शकते.)

**२. दुसरा घटक!**

आता त्याचे मुख्य काम म्हणजे जे पूर्णतः नवे अस्सल संशोधन करून ते त्याच्या संशोधन क्षेत्रात नव्याने भर टाकणारे, नवे ज्ञान ओडणारे असेल त्या विषयाचा विस्तार करणारे असेल.

**३. तिसरा घटक :**

या किमान गरजांमुळेच तर पीएच.डी. करण्यात एक संपूर्ण नवे स्वतत्त्वे विचार मांडणारे पुस्तक लिहिणे अपेक्षित असते. (इतरांकडून ते लिहून घ्यावयाचे नसते.) या पुस्तकालाच dissertation म्हणण्याची परंपरा आहे, (ज्यास भारतात भावनावेगात thesis म्हंटले जाते). या प्रबंधाचे स्वरूप मुख्यतः तीन मुद्यांवर आधारित असते.

- संदर्भसाहित्याचा आढावा
- अभ्यासाच्या पद्धतीशास्त्राची रूपरेखा
- शास्त्रीय, सामाजिक, ऐतिहासिक, तात्त्विक किंवा साहित्यिक विश्लेषण

**प्रावीण्य प्राप्तीसाठी काय करावे ? :**

विद्यार्थ्याने संबंधित विषयासंबंधी शक्य त्या सर्व साहित्याचा संदर्भाचा शोध घेतला पाहिजे. जे जे उपलब्ध होईल, ते ते सर्व त्याने वाचलेले असले पाहिजे. वैज्ञानिक विषयातील अभ्यासाची सुरुवात शालेय अभ्यासक्रमात लावलेल्या साध्या क्रमिक पुस्तकापासून केली पाहिजे, मासिके, नियतकालिके, वार्षिके, वृत्तांत, संकलने, संपादित पुस्तके– जे जे मिळेल ते त्याने हस्तगत केले पाहिजे.

**ज्ञानविस्तार**

आपल्या अभ्यासक्षेत्राचा विस्तार करावयाचा झाला तर मूलभूत चिंतन, मनन व निदिध्यासन करणे अटळ आहे. साधारणतः संशोधन म्हणजे प्रयोग करणे समजले जाते. पण संशोधनात प्रयोगापेक्षा अधिक गोष्टी आहेत. प्रयोग, त्याचे अर्थविवरण, त्याचे सखोल आकलन, नव्या तंत्रामंत्राचा शोध त्यात अपेक्षित आहे. नवा दृष्टिकोन, नवी तत्त्वे, नवी गणिते, नवे तर्कशास्त्र, ज्ञानशास्त्र, नवी यंत्रणा शोधणे अपेक्षित आहे.

**उत्पादनाशी नाते**

संशोधनाने नव्या उत्पादनांचा शोध लागू शकतो. अथवा नव्या उत्पादनात ते वापरता येते. तथापी व्यापारी कारणांसाठी शास्त्रीय संशोधन वापरले जावू नये अशी नीती आहे. (संशोधनाचे नीतिशास्त्र हा स्वतंत्र व मोठ्ठ्या लेखाचा विषय आहे.) कारण मुख्यतः संशोधन हे 'ज्ञानासाठी ज्ञान' या स्वरूपाचे असते. मानवी ज्ञानाचे आकलन उंचावणे, ते समृद्ध करणे, नवी क्षितिजे शोधणे, हाच कोणत्याही संशोधनाचा अंतिम हेतू असतो. अर्थात असे व्यवहारात घडत नाही. उदाहरणार्थ अणुरचनेचे संशोधन आईनस्टाईनने 'शुद्ध ज्ञानप्राप्ती' म्हणून केले, पण आज सारे जगत अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे!

**विल्हेल्म युनिर्व्हसिटीपासून आरंभ :**

Ph.D. ही पदवी मुख्यतः १९ व्या शतकात वर्लिनमधील प्रेडरिक विल्हेल्म युनिर्व्हसिटीने विज्ञान किंवा मानव्यविद्यांमध्ये अस्सल संशोधन करणाऱ्यांसाठी प्रसारात, प्रचारात आणली (या विद्यापीठाचे मूळ नाव Humboldt University of Berlin असे होते. पुशियन शिक्षण सुधारक आणि भाषाशास्त्रज्ञ Wilhelm Humcoldt ने १८१० मध्ये तिची स्थापना केली. १८२८ मध्ये Frederick William University असे तिचे नामांतर झाले शेवटचे नामांतर १९४९ साली Humboldt University of Berlin असे झाले. हा इतिहास सांगण्याचे कारण असे की या विद्यापीठाने जगाला २९ नोबेल पुरस्कारविजेते दिले आहेत. फिश्टे, श्लायरमाखर,

हेगेल, शॉपेनहॉवर, शीलिंग, आईनस्टाईन, मॅक्स प्लांक, कार्ल मार्क्स, एंगल्स, राबर्ट शूमन हे त्यापैकी काही नामांकित तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ.)

तिथून ही पदवी अमेरिकेतील येल युनिर्व्हसिटीत १८६१ साली कॅनडात १९०० साली, युनायटेड किंगडममध्ये १९२१ मध्ये गेली. मग ती जगभरातच सर्वत्र पसरली. या विद्यापीठांमध्ये आधी असणारी पदवी म्हणजे D.Phil. अर्थ एकच, पण नवी म्हणून D.Phil.च्या ऐवजी Ph.D. म्हटले जाऊ लागले. युनिर्व्हसिटी ऑफ सेंट अॅड्रूजनेही D.Phil. (higher doctorate in the faculty of Philosophy) ऐवजी Ph.D. (research doctorate) असा अर्थ जोडला. अर्थात कोणत्याही विषयातील मूलभूत संशोधनाला D.Phil. म्हणण्याचे ऑक्सफर्ड, बगिहेम, सरोज, न्यूझीलंडमधील विद्यापीठांनी मात्र बराच काळ सोडले नव्हते.

**Ph.D. साठीच्या आज्ञा!**

बहुतेक सर्व पुरोपीय व पाश्चात्त्य विद्यापीठांमध्ये संशोधनक्षेत्रात पुढील संज्ञा वापरात आहेत. त्या भारतीय विद्यापीठांमध्ये क्वचित आढळतात. :

Doctorate Ph.D. शी समांतर असलेल्या कोणत्याही पदवी,

Terminal degree संशोधनासाठी दिली जाणारी सर्वोच्च पदवी, साधारणत: Ph.D.

Graduate student पदवीनंतरची पदवी मिळविणारा विद्यार्थी, जशी Ph.D.

C.Phil. – ज्याने Ph.D. coursework पूर्ण केले आहेत, पण dissertation लिहिलेले नाही.

Kandidat - विघटन झालेल्या सोविएत देशांमध्ये पूर्वी व आजही दिली जाणारी पदवी.

Licentiate - ही पदवी पोर्तुगाल, बेल्जियम, यू.के. जर्मनी, स्वित्झर्लंड, स्वीडन, फिनलंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथे दिली जाते.

**संशोधनासाठीचे (कळकळकळ) कळीचे प्रश्न (positive conditions)**

पीएच.डी. साठी नाव नोंदविण्यापूर्वी तुम्ही पुढील काही प्रश्न स्वतःला विचारून प्रामाणिक उत्तरे मिळविली पाहिजेत. हे प्रश्न म्हणजे पीएच.डी. करतानाच्या हव्या असलेल्या विधायक अटी होय. (Essentially positive conditions for positive thing. या अटींमध्ये तुम्हीही स्वानुभवानुसार काही नवी भर घालू शकता):

**(१) तुमचे करिअर संशोधकाचे आहे का? :**

पीएच.डी. साठी नाव नोंदविण्यापूर्वीच तुम्ही स्वतःलाच विचारले पाहिजे की तुमचे दीर्घकालीन उद्दिष्ट काय आहे? हे उत्तर जर संशोधनास वाहून घेण हे असेल तर आणि तरच मग तुम्ही योग्य मार्ग निवडला आहे.

**(२) तुम्हाला अॅकेडेमिक्समध्ये रस आहे की नाही?**

याचा अर्थच असा की तुम्हाला अॅकेडेमिक्समध्ये रस असला पाहिजे, विद्यापीठीय व कॉलेजपातळीवरही प्रत्येक प्राध्यापकाने पीएच.डी. असावे असे प्राचार्यांना वाटते. का? कारण प्रगत अभ्यासक्रम शिकविण्यास पात्र प्राध्यापक आमच्याकडे आहेत, असे त्यांना (विशेषतः नॅक्‌ला) सांगावयाचे असते. अमेरिकन स्टॅण्डर्डनुसार खरे तर डॉक्टरपेक्षा 'प्रोफेसर' मोठा असतो. प्रोफेसर पीएच.डी. धारक असतातच; पण प्रत्येक पीएच.डी. धारक प्रोफेसर असतोच असे नाही. (भारतात मात्र महाविद्यालयातील नुकताच कामाला लागलेल्या अधिव्याख्यात्याला अथवा अधिव्याख्यातिणीलाही 'प्रोफेसर' म्हणणे ही परम पवित्र परंपराच आहे. शिवाय लग्नाचा बाजार वधारतो, ते

वेगळेच.)

**(३) पदवीत अंतर्भूत आहे ते तुमच्यात आहे का?**

पीएच.डी. करणाऱ्यास आपल्या क्षमता ओळखणे कठीण जाते. त्यासाठी पुढील काही गोष्टी मार्गदर्शक ठरतील. या क्षमता असतील तरच पीएच.डी. करणे योग्य राहील :

१. बुद्धिमत्ता (Intellegence): तुमच्या पदवी, उच्च पदवी प्राप्त करणे, ही किमान बौद्धिकतेची अट आहे.

२. वेळ (Time) : या कामी काही महिनेच नव्हे तर काही वर्षे सुद्धा यातील याची कल्पना बाळगून तुमचे इतर कार्यक्रम तुम्ही मागे टाकणार का? टाकणार असाल तरच 'या'.

३. सर्जकता (Creativity): जुन्या घटनांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहिले तरच संशोधनाची शक्यता वाढते. मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या समस्यांमध्ये तुम्ही रस घेतला तर सर्जकता बहरेल.

४. तीव्र कुतूहल (Intense Curiosity) : भोवतालचे जग समजावून घेण्याची तुमची इच्छा तीव्र आहे का? संशोधनाचे जे जगाचे क्षेत्र निवडले आहे ते तुम्हाला कुतुहलाचे वाटते का? कारण तुमचे नैसर्गिक कुतूहल तुमचे संशोधन वेगवान करते.

५. स्वीकारार्हता (Adaptability) : बहुतेक पीएच.डी.चे विद्यार्थी पीएच.डी. साठी तयारच नसतात. त्यांना सरधोपट परीक्षांपेक्षा हे संशोधनाचे काम वेगळे वाटते. ज्याची उत्तरे माहीत नाहीत, अशा क्षेत्रात उडी मारल्याने ते घाबरतात. मग प्रश्न येतो की, ''तुम्ही नव्या पद्धतीने विचार करणार तर? ज्यास परंपरा नाही, अशी नवी उत्तरे तुम्ही शोधणार का?'' उत्तर 'हो' असेल तरच ठीक आहे, अन्यथा जे आणि जेथे आहे तेच ठीक आहे, म्हणायचे झाले!!

६. स्वयंप्रेरणा (Self Motivation) ः महाविद्यालयात चाचण्या, सहामाही, वार्षिक परीक्षांमध्ये मार्क्स, ग्रेड्स मिळविण्याची सवय इथे मोडली जाते, कारण अशा परीक्षा, टप्पे इथे नसतात तुम्ही स्वयंप्रेरितच असाल तर टिकाल कारण अभ्यासात, प्रयोगात रोज नवीन काही तरी तुम्हाला प्रेरणादायी काही असेलच असे नाही, क्वचित कंटाळवाणेच सारे काही असते.

७. स्पर्धात्मकता (Competitiveness): पीएच.डी. साठी नोंदणी करणे म्हणजे इतरांशी उत्तमतेसाठी स्पर्धाच करणे असते. तुमचे पूर्वज असलेल्या सीनिअर पीएच.डी. धारकांनी त्यांची स्पर्धात्मकता सिद्ध केलेली असतेच. तुम्ही त्या रेसमध्ये उतरणार का? हे नोंदणीपूर्वीच स्वतःला विचारा.

८. परिपक्वता (Maturity) : पीएच.डी.तील कोर्सवर्क वगळता उरलेला अभ्यास तुम्ही प्लॅन करू शकता, तितकी पक्वता तुमच्यात आली आहे, असे गृहीत धरता येते. तुमचे दैनंदिन कार्यक्रम, अभ्यासाची वेळ, चिंतनाची, लेखनाची वेळ तुम्ही ठरवू शकता, या अधिकच्या वेळ असण्याचे स्वातंत्र्य तुम्ही पेलू शकता का? असाल तरच....

**पीएच.डी. म्हणजे काय नाही? (negative conditions)**

या प्रश्नाबरोबरच काही नको असलेल्या विघातक (essentially negative conditions for positive thing) गोष्टीही लक्षात घेतल्या पाहिजेतच. विद्यार्थी काही वेळेस चुकीच्या कारणांसाठी व गैरसमजुतींतून पीएच.डी. साठी नावनोंदणी करतात. मग थोड्याच अवधीत त्यांच्या लक्षात येते की आपण चांगलीच झक् मारलेली आहे!. पण आता वेळ गेलेली असते! असे वाटू नये म्हणूनच पीएच.डी. म्हणजे काय नाही? ते लक्षात घ्यावे लागते, उदाहरणार्थ पीएच.डी. म्हणजे–

**१. प्रतिष्ठा नाही ! :**

प्रत्येक पीएच.डी. धारकांस आपण स्वतः केलेल्या तथाकथित कष्टांचे व पदवीचे मोठे अप्रूप वाटून अभिमानही वाटू लागतो. पदवी ही प्रतिष्ठेची बाब वाटू लागते. असे डॉ. स्वतःला भयानक प्रतिष्ठित समजतात. पण प्रतिष्ठेसाठी पीएच.डी. नाही.

**२. मताभिव्यक्तीची दादागिरी नाही :**

एकदा पीएच. डी, मिळाली की समाजात कोणत्याही विषयावर मत व्यक्त करण्याचा जणू काही जन्मसिद्ध अधिकार मिळाल्याचा काहीजणांचा भ्रम होतो. पण असे समजण्याचे काहीच कारण नाही. एका विषयात (किंवा आंतरविद्याशाखीय विषयात) पीएच.डी. मिळाली म्हणजे इतर विषयांतसुद्धा आपण फार शहाणे झालो, असे नव्हे. खरे तर स्वतःच्या विषयातलेही एखादे क्षेत्रच पीएच.डी. ने माहीत झालेले असते. सगळे नव्हेच. (पण सोंग आणले जाते बृहस्पतीचे, ब्रह्मदेवाचे दादाश्री असल्याचे!) विशेषतः विज्ञान शाखांमध्ये तर ते जास्तच खरे आहे. उलट पीएच.डी. केल्याने स्वतःच्या मर्यादा कळाल्या पाहिजेत. एक पदवी मिळविणे = इतर पदव्या नसणे.

**३. संशोधक झालाच, असे नव्हे. :**

पीएच.डी. पदवीमुळे तुम्ही केवळ पुढील संशोधन करण्यास पात्र होता. हे संशोधनाचे प्रशिक्षण असते. ते पूर्ण केलेले असते एवढेच. त्यामुळे पदवी मिळाली की तुम्ही संशोधक होताच असे नव्हे. ही पदवी म्हणजे ''भिंतीवरी कालनिर्णय असावे'' छाप कॅलेंडर नाही. (कॅलेंडरलाही भयानक कष्ट लागतात. त्याची कदर केलीच पाहिजे.) एखाद्या संशोधकाने वैज्ञानिकाने औपचारिक शिक्षण संपविल्यानंतर संशोधनासाठी काय केले पाहिजे, याचा वस्तुपाठ पीएच.डी. प्राप्तीने येतो.

**४. नोकरी मिळणारच ! :**

पीएच.डी. मिळाली म्हणजे नोकरी मिळालीच असे नाही. देशाची अर्थव्यवस्था मंदावली तर तुम्ही विज्ञान शाखेतील पीएच.डी. असूनही नोकरी मिळेल याची शाश्वती नाही, मग कला, मानव्य इत्यादींची गोष्ट लांबच ! भारतात तर परिस्थिती आणखी कठीण आहे.

**५. नातेवाईक / मित्रांवर छाप पाडणे नव्हे :**

तुम्ही पीएच.डी. झालात की तुमची आई किंवा बायको अथवा नवरोबासच (खंडोबा/थंडोबाफेम) फार तर प्रेम वाटेल की क्काय बुवा हा/ही तर डॉक्टर झाला/ली, मज्जा आहे एका माणसाची, तर है कौतुक घरीच ठेवा, पीएच.डी. यासाठी नसते, कौतुकासाठी इतर गोष्टी आहेत. (फार तर लग्न करा.)

**६. ''आपण किती शहाणे'' हे शोधण्याचा प्रयत्न :**

सॉरी, असले काही मनात आणू नका, त्यासाठी इतर गोष्टी क्षेत्रे आहेत. तिकडे जा. अनेक तास सलग कष्ट करणे, मानसिक ताण सहन करणे, गोंधळातून वाट काढणे, निष्कर्षाप्रत येणे हे संशोधन आहे. आपला शहाणपणा सिद्ध करण्यासाठी पीएच.डी. नाही.

**७. निवडलेला विषय म्हणजे मुक्काम पोष्टच! :**

आपण निवडलेला विषय म्हणजे त्या संशोधनक्षेत्रात अंतिम असून या पुढे आपला कोणताही विषय असू शकत नाही किंवा मी केले तसे काम इतर कुणीही या विषयात करू शकत नाही असे समजणे, हा उच्च दर्जाचा गाढवपणा आहे. विशेषतः विज्ञान शाखांमध्ये तर ज्ञान रोजच बदलते. रोज नवे शोध लागतात. त्यामुळे निवडलेला विषय कधी कधी मुदत संपण्याआधीच बाद, इतिहासजमा झालेला असतो, अशा वेळेस विद्यार्थ्याने नवा टॉपिक निवडणे हे शहाणपणाचे असते. (तशी संधी न देणे म्हणजे संशोधकावर अन्याय असतो.)

**८. इतर पर्यायांपेक्षा बरे :**

बहुतेक विद्यार्थ्यांना पीएच.डी. म्हणजे कटकट अन् वैतागवाडी वाटते, त्यामुळे उच्चपदवी मिळविलेल्यांमध्येच ''वासरात लंगडी गाय शहाणी व्हावयाचे'' की खरा संशोधक व्हावयाचे ते प्रत्येकाने मनापासून ठरविले पाहिजे.

**९. जादा कमाईचा मार्ग :**

आता हे खरे आहे की निदान भारतात तरी डॉक्टर झालेल्या प्राध्यापकास दोन इन्क्रिमेंट्स ज्यादा मिळतात, पण हा काही पैसे मिळविण्याचा मार्ग नव्हे, पैसे कमाविण्यासाठी बाजारात शेकडो मार्ग आहेत त्यासाठी पीएच.डी. कशाला हवी? (आता भारतात पीएच.डी. ही प्राचार्यपदाची अट आहे खरी पण ती प्राचार्यपदाची विद्यापीठीय शासकीय अट आहे एवढेच प्राचार्यपदासाठी इतरही बऱ्याच नॉनअॅकेडेमिक अटी आहेत! पण तो वेगळ्या लेखाचा विषय आहे.)

**चांगली बातमी :**

एवढ्या सूचना पाळून पीएच.डी मिळविली तर निखळ, निर्भेळ शुद्ध आनंदाची गोष्ट समजावी. आता ज्ञानमंदिराच्या दिशेने जाण्याची वाट तुम्हाला सापडली असून अधिक बुद्धिमान, खऱ्या शहाण्या, विनम्र, ज्ञानीजनांचा सहवास तुम्हाला लाभणार आहे, खरा संन्यासी होण्याचे ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व भक्तिमार्ग साधण्याची साधकाची पात्रता तुम्ही संपादित केली आहे !!

**संशोधनातील आनंद :**

एकदा एका प्रसिद्ध संशोधकाची जाहीर मुलाखत झाली. त्याला विचारण्यात आले की ही पीएच.डी. करण्याची एवढी किचकट कटकट तुम्ही केलीच कशासाठी? त्याचे उत्तर होते, ''ग्रंथालयात, प्रयोगशाळेत अखंड काम करीत बसण्यापेक्षा मला घरी जाण्याचा आणि लाखो लोक घरी जाऊन जे काही करतात ते करण्याचा पर्याय खुला होता खरा. पण लोक जे काही करीत असतील त्यापेक्षा 'अधिक मूल्यवान कृती' करण्याचा, मानवी जीवन अधिक सुखी करण्याचा, नव्या ज्ञानाचा शोध घेण्याचा पर्याय मला जास्तच योग्य, उचित, सत्य वाटला. शिवाय अधिक मूल्यवान कृती करणारा मी लाखो-करोडोंमधील एखादा नशीबवान आहे.''

त्याच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य सांगत होते की संशोधन हा निखळ आनंद आहे

''शोभते मुखं य एवं वेद'' = जो हे जाणतो, त्याचं मुख शोभून दिसते.

इथे 'हे' = तत्त्वज्ञान! म्हणून जो तत्त्व जाणतो तो तत्त्वज्ञ. (छांदोग्योपनिषद.)

तोच खरा Doctor of Philosophy.

सर्वार्थाने.

# लीना पांढरे यांची फेसबुक पोस्ट
# Ph.D.चे भ्रष्ट ओंगळवाणे वास्तव बदलता येईल?

Ph. D./विद्यावाचस्पती या पदवीचा लाँगफॉर्म आहे - Doctor of Philosophy. एखाद्या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर आपल्याला Ph. D. पदवीसाठी प्रवेश घेता येतो.

विद्यापीठाने नियुक्त केलेल्या मार्गदर्शक प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली आपणास रुची असणाऱ्या विषयात सखोल संशोधन करून प्रबंध सादर केला जातो. आणि या प्रबंधाचे विद्यापीठाबाहेरील (बहिस्थ परीक्षकांनी) परीक्षण करून अनुकूल अहवाल पाठवल्यानंतर त्या विषयावर आधारित बहिस्थ परीक्षकांसमोर(रेफ्री) मौखिक परीक्षा द्यावी लागते. त्यात उत्तीर्ण झाल्यानंतर ही पदवी प्राप्त होते.

१९८२ पूर्वी वरिष्ठ महाविद्यालय अथवा विद्यापीठामध्ये व्याख्याता/लेक्चरर आजच्या भाषेत सहाय्यक प्राध्यापक/असिस्टंट प्रोफेसर होण्यासाठी Ph. D. पदवीची आवश्यकता नव्हती. पदव्युत्तर शिक्षण प्राध्यापक होण्यासाठी पुरेसे असे.

त्यानंतर वरिष्ठ महाविद्यालयात नोकरीसाठी पदवी पदव्युत्तर शिक्षणाबरोबर M.Phil. (Master of Philosophy) ही पदवी अनिवार्य केली गेली. ही पदवी मिळवण्यासाठी काही महिने अथवा एका वर्षाचे कोर्स वर्क पूर्ण करावे लागायचे आणि त्यानंतर विद्यापीठाने नेमलेल्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून एक छोटा प्रबंध विद्यापीठाला सादर करावा लागायचा. विद्यापीठाबाहेरील बहिस्थ परीक्षकांनी त्यावर अनुकूल अहवाल दिल्यानंतर बहिस्थ परीक्षकांसमोर मौखिक परीक्षा व्हायची आणि मग ही पदवी संबंधित संशोधक विद्यार्थ्यांना प्रदान केली जायची.

M. Phil. ची पदवी प्राप्त केली नसेल तर विद्यापीठाकडून परमनंट प्रुव्हल मिळायचं नाही आणि त्याशिवाय नोकरीत कायम होता येणे शक्य नव्हते. त्यामुळे आज जसे Ph. D. या पदवीचे बाजारीकरण होऊन ही पदवी वाटणारी विद्यापीठे नव्हे तर कारखाने उभे राहिलेले आहेत, तसेच सवंग स्वरूप M. Phil. ला आलेले होते.

M. Phil. चे क्रॅश कोर्सेस घेऊन या पदवीचे वाटप केले जात होते. यामध्ये मदुराई वगैरेकडील विद्यापीठे खूपच गाजली होती.

तत्त्वतः M. Phil. ही Ph. D. पदवीच्या संशोधनाअगोदरचे लघुतम स्वरूपातील संशोधन असून पुढील विस्तृत Ph. D. चे संशोधन सुलभ जावे म्हणून अगोदरची पायरी आहे.

मूलभूत संशोधनतंत्राची, दीर्घकाळ अध्ययनाची, संशोधनवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी M. Phil. ही मधली पायरी आहे. परंतु वरिष्ठ महाविद्यालयात नोकरी मिळणे, ती नोकरी कायम होणे, तसेच M.Phil. मुळे दोन इन्क्रिमेंट अधिक मिळणे, Ph. D. मुळे तीन इन्क्रिमेंट अधिक मिळणे, या गोष्टीं M. Phil. व Ph. D. या पदव्यांशी जोडल्या गेल्यामुळे त्यांना बाजारू व सवंग रूप येऊन या पदव्यांचा दर्जा ढासळला.

M. Phil. व Ph. D. या पदव्या खरेदी करता येतात आणि यांचा दर्जा घसरतो आहे हे लक्षात आल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट (राष्ट्रीय पात्रता चाचणी)आणि सेट (राज्यस्तरीय पात्रता चाचणी) या परीक्षा सुरू केल्या आणि १९९१ मध्ये नियम केला की महाविद्यालय अथवा विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी नेट किंवा सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

मात्र १९९१ अगोदर ज्यांनी M. Phil. अथवा Ph. D. पूर्ण केलं असेल त्या प्राध्यापकांना यातून सूट देण्यात आली.

सेट आणि नेट परीक्षांचे सुरुवातीच्या काळातले स्वरूप हे कठीण होते. तिथे विस्तृत वर्णनात्मक (descriptive) उत्तरे लिहावी लागायची. पण नंतर या परीक्षांचे स्वरूप बदलून वस्तुनिष्ठ (objective) स्वरूपापुरते मर्यादित केले गेले. त्यामुळे या परीक्षांमध्ये सहज उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढले.

सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याची बोगस प्रमाणपत्रे सादर करून प्राध्यापकाची नोकरी प्राप्त केलेल्या काही घटना समोर आलेल्या आहेत.

तथापी, या परीक्षांमुळे शिक्षणाच्या बाजारीकरणाला वचक बसला होता. असं असताना २०१८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट पात्रता परीक्षेला Ph. D. चा पर्याय दिला.

परिणामी, वरिष्ठ महाविद्यालय अथवा विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी अत्यंत कष्टाने नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले बेकार राहिले व नेट-सेट न झालेले पण Ph. D. विकत घेतलेले महाभाग नोकरीसाठी पात्र ठरले !

नेट-सेट ची महत्ता अशी शून्यवत केली व Ph. D. चे स्तोम पदोन्नतीसाठीसुद्धा वाढवून ठेवले. म्हणजे, सहाय्यक प्राध्यापक/Assistant Professor पदापासून सहयोगी प्राध्यापक/Associate Professor व्हायचे असेल तरी Ph. D. अनिवार्य आहे! प्राध्यापक/Professor आणि प्राचार्य /Principal पदासाठी Ph. D. पदवी अनिवार्य आहे !

त्यामुळे Ph. D. पदवीवाटपाची प्रचंड आर्थिक उलाढाल असणारी एक बाजारपेठ उभी राहिली.

शासनमान्य विद्यापीठे आणि तसेच अभिमत विद्यापीठे येथील विविध विषयांचे विभाग तसेच या विद्यापीठांना संलग्न महाविद्यालये येथे संशोधन केंद्र स्थापन करून Ph. D. च्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ लागला.

यामध्ये एक लाखापासून दहा लाखांपर्यंतचे शुल्क आकारले जाऊ लागले. Ph. D. ला प्रवेश मिळण्यासाठी झएढ ही प्रवेश परीक्षा घेतली जाते. पण अनेक अभिमत खाजगी विद्यापीठातून या परीक्षेचे स्वरूप अत्यंत सुलभ केलेले आहे. निव्वळ मांडवाखालून जाणे अशा स्वरूपात ही परीक्षा घेतली जाते.

पूर्वी Ph. D. साठी Guide (मार्गदर्शक) होणे हे अत्यंत कठीण होते. पण आज Ph. D. प्राप्त झाली की दुसऱ्या दिवशी मार्गदर्शक होता येते !

त्यामुळे विषयाचा व्यासंग, अभ्यास, अध्यापन या गोष्टींचा विचार केला जात नाही. त्यामुळे अनेक मार्गदर्शकसुद्धा विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती पाहत नाहीत तर त्याचा आर्थिक स्तर पाहतात व त्याला आपला विद्यार्थी म्हणून स्वीकारतात.

आणि मग त्या विद्यार्थ्याकडून आपली अनेक व्यक्तिगत कामे करून घेणे, निरनिराळ्या स्वरूपामध्ये भेटवस्तू घेणे, धनप्राप्ती करून घेणे हा भ्रष्टाचार सुरू झाला. यांमध्ये स्त्रीमार्गदर्शकही मागे नाहीत. सुवर्णालंकारांपासून पैठणींपर्यंतच्या भेटी स्वीकारल्या जातात. पुरुष मार्गदर्शकांना दिल्या गेलेल्या ओल्या पार्ट्यासुद्धा या क्षेत्रातील चर्चेचा विषय आहे.

त्यापुढचा भ्रष्टाचार हा मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक नेमताना केला जातो. मार्गदर्शक/गाईडनेच

आपल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी बहिस्थ परीक्षकांची नावे विद्यापीठाला सुचवायची असतात ! आणि मग त्यातून जे बहिस्थ परीक्षक निवडले जातात ते त्या मार्गदर्शकाचे मित्र असतात. मग यामध्ये साटेलोटे व्यवहार असा घडून येतो की, मी तुझे काही विद्यार्थी पास करतो, तू माझे काही विद्यार्थी पास कर !

या बहिस्थ परीक्षकांना आणि मार्गदर्शकाला मौखिक परीक्षेसाठी विद्यापीठात येण्याचा जाण्याचा राहण्याचा सर्व खर्च विद्यापीठाकडून मिळतो. तरीसुद्धा संबंधित विद्यार्थ्यांला, प्रचंड पैसा खर्च करून मार्गदर्शक आणि कधी सहकुटुंब सहपरिवार येणारे बहिस्थ परीक्षक यांची उत्तम हॉटेलमध्ये राहण्याची आणि खानपान तसेच नंतरच्या भेटवस्तू यांची व्यवस्था करावी लागते.

या मौखिक परीक्षांचे स्वरूप अत्यंत हास्यास्पद असते. अर्ध्या तासात ही मौखिक परीक्षा उरकली जाते. विद्यार्थी आत्मविश्वासाने आपल्या विषयावर काहीही बोलू शकत नाही. त्याची समोरच्या स्क्रीनवरील पीपीटीवरील नजर सुद्धा ढळत नाही. तो पीपीटी वाचून दाखवतो.

खरं म्हणजे मौखिक परीक्षा घेताना त्याचे नोटिफिकेशन या विषयाच्या संदर्भातील अनेक अभ्यासकांना आणि विद्यार्थ्यांना पाठवले गेले पाहिजे. त्या मौखिक परीक्षेला निदान या विषयातील दहा वीस विद्यार्थी उपस्थित असायला हवेत. ओपन डिफेन्स झाला पाहिजे. पिंजून काढणारे प्रश्न संबंधित विद्यार्थ्याला विचारले गेले पाहिजे. पण असे काहीही न होता परीक्षेला फक्त विद्यार्थ्याचे पालक, आप्त आणि मित्रमंडळी जमा झालेले असतात. तो एक कौटुंबिक सोहळा होऊन जातो.

पीपीटी वाचून दाखवण्याचा मौखिक परीक्षेचा उपचार कसाबसा उरकला गेल्यानंतर बाहेर गाड्या तयार असतात. त्यामध्ये मार्गदर्शक, बहिस्थ परीक्षक, विद्यार्थी व त्याचे नातेवाईक बसून मेजवानीसाठी ताबडतोब हॉटेलमध्ये रवाना होतात !

कोणे एकेकाळी प्रबंध online प्रकाशित करण्याची सुविधा नव्हती. त्यामुळे, उदाहरणार्थ – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्याने बनारस विद्यापीठातील जुना प्रबंध मिळवून प्रबंधाच्या शीर्षकात फेरफार करून तो आपला प्रबंध म्हणून सादर करणे, अशा घटनाही घडल्या आहेत.

Ph. D. करणाऱ्या विद्यार्थ्यांला दोन संशोधन निबंध, संशोधन पत्रिकेतून प्रकाशित करणे अनिवार्य आहे. तसेच सहयोगी प्राध्यापक किंवा प्राध्यापकपदासाठी बढती हवी असेल तर त्याकरता अधिक गुणसंपादनासाठीही असे संशोधननिबंध प्रकाशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका अशा शीर्षकाखाली गल्लीबोळामधून अशी नियतकालिके प्रकाशित केली जाऊ लागली !

आयोगाच्या हे लक्षात आल्यानंतर अनेक नियतकालिके UGC CARE listed मधे असणे आवश्यक केले गेले. यावर असा उपाय शोधला गेला की, एखादे संशोधनपर नियतकालिक online छापील अंक स्वरूपात आयोगाच्या यादीमध्ये असेल तर तेच नाव घेऊन बनावट online प्रसिद्ध करायचे !

आणि त्यामधून भरपूर पैसे घेऊन संबंधित उमेदवारांचे संशोधननिबंध/Research article की आढावा निबंध/Review article ? प्रकाशित करायचे आणि त्या उमेदवाराला खोटे गुण प्राप्त करून द्यायचे.

खरा संशोधक विद्यार्थी जागतिक दर्जाच्या संशोधनपत्रिकेमध्ये आपला शोधनिबंध प्रसिद्ध करतो. एक संशोधननिबंध लिहिण्यासाठी रोज १२/१३ तास कष्ट घेऊन वर्षभरात एक निबंध प्रकाशित करू शकतो. आणि इथे बारा महिन्यांत बारा काय, चोवीस तथाकथित शोधनिबंध आम्ही प्रसिद्ध करतो !

T to T म्हणजे Title to Thesis तयार करून देणारी एक बाजारपेठ यामुळे निर्माण झाली. तीन हजार रुपयांपासून पाच हजार रुपयांपर्यंत खर्च केल्यास एक संशोधननिबंध लिहून मिळेल. ३ ते ५ लाखांपर्यंत खर्च केल्यास संपूर्ण प्रबंध तयार करून मिळेल !

मौखिक परीक्षेसाठी तयार करायची पीपीटी प्रेझेंटेशन, संशोधननिबंध, सर्व काही रेडिमेड तयार करून मिळेल. त्यामुळे जे प्राध्यापक आहेत आणि त्यांना दरमहा एक ते दोन लाख उत्पन्न आहे, ती मंडळी बाजारात पैसे फेकून संशोधन निबंध, ISBN प्राप्त झालेली पुस्तके लिहून घेऊ लागली. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून लाखो रुपयांचे अनुदान घेऊन minor d major research project ही लिहून घेऊ लागली.

ज्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती दरमहा नियमित मिळत आहेत, त्यातील अनेक विद्यार्थी स्वतः संशोधन न करता या बाजारपेठत पैसे फेकून Ph. D. प्राप्त करून घेऊ लागली.

कायमस्वरूपी प्राध्यापकांसाठी विद्यापीठ अनुदान मंडळ लाखो रुपयांचे अनुदान वाटून केडेमीक टूरीझमला प्रोत्साहन देते. काही प्राध्यापक, विभागप्रमुख हे रशिया, मॉरिशस, थायलंड, फ्रान्स अशा विविध देशातील शिक्षण संस्थांशी भरपूर पैसे देऊन संधान साधतात आणि मग येथून प्राध्यापकांना संबंधित देशात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या खर्चाने नेले जाते. तेथे एखाद्या शिक्षणसंस्थेच्या सभागृहात तिथली दोन-तीन मंडळी शोभेपुरती मंचावर बसवून ठेवून आणि पाठीमागे बॅनर लावून या प्राध्यापकांचे तथाकथित संशोधन निबंध वाचून घेतले जातात ! आणि त्यांना प्रमाणपत्रे दिली जातात. कधी कधी तर निबंध वाचायचीसुद्धा तसदी न घेता नुसतीच बॅनरसमोर फोटो काढले जातात आणि मग सर्वजण त्या देशातील पर्यटनस्थळी मजा करण्यासाठी निघून जातात.

सदरहू संशोधननिबंध लिहून देणे, त्यासाठी आवश्यक असणारे फॉर्म भरणे, या सेवासुद्धा पैसे दिले की मिळतात.

यामुळे खरोखर अत्यंत अभ्यास करून परदेशातील प्रतिष्ठित विद्यापीठांकडून आलेल्या निमंत्रणाचा स्वीकार करून खरेखुरे संशोधन निबंध वाचण्यासाठी परदेशातील विद्यापीठांत जाणारे स्कॉलर प्राध्यापकसुद्धा बदनाम होतात.

विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधामधील Plagiarism/ चौर्य / copy cut paste शोधता येऊ नये, यासाठी सुद्धा अनेक सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत.

Chat GPT सारख्या app चा उपयोग केला जातो. सॉफ्टवेअर वापरून किंवा वाक्य खालीवर करून बदलून देणारे एक्स्पर्ट आहेत. त्यामुळे Plagiarism /वाङ्मयचौर्यातून सुटका करून घेता येते.

या सर्व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी एक सक्षम यंत्रणा विकसित केली पाहिजे.

सर्व विद्यापीठांतील संशोधन केंद्रांना सॉफ्ट कॉपीमध्ये उपलब्ध नसणारेसुद्धा सर्व प्रबंध तसेच मायनर मेजर रिसर्च प्रोजेक्ट स्कॅन करून पब्लिक डोमेनमध्ये online सर्वांना वाचण्यासाठी खुले करून द्यायला हवेत.

Ph. D. मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक नेमण्याचा अधिकार संबंधित गाईडला दिला जाऊ नये.

मौखिक परीक्षेची तारीख आणि विषय तीन महिने अगोदर जाहीर करून त्या विषयाशी संबंधित लोक उपस्थित राहून विद्यार्थ्याला अनेक प्रश्न विचारतील, अशी व्यवस्था करावी.

API /Academic Performance Indicator साठी प्राचार्यांनी गुण खिरापतीसारखे वाटू नयेत. Teaching learning, exam work या गोष्टी संबंधित प्राध्यापक खरोखरीच पूर्ण करतो आहे का ? या बाबी तपासता येतील, अशी व्यवस्था महाविद्यालयात निर्माण करणे आवश्यक आहे.

Ph. D. मार्गदर्शक होण्याच्या क्षमता आहेत की नाही याची कसून परीक्षा घेऊन मगच मार्गदर्शकपद देण्यात यावे.

सहयोगी प्राध्यापक होऊन तीन वर्षे झालेली आहेत आणि Ph. D. मार्गदर्शक आहे अशा किमान पात्रतेवर संबंधित व्यक्तीला प्राध्यापक / Professor पद देऊ नये.

विदेशातील अनेक विद्यापीठांमध्ये, प्राध्यापकपद काढून घेण्याचीसुद्धा तरतूद आहे. तुम्ही तीन वर्षांत काहीही नवीन संशोधन केले नाही, विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले नाही, आणि स्वतःला सिद्ध केले नाही, आपल्या

विषयातील ज्ञान अद्ययावत केले नाही, तर प्राध्यापकपद काढून घेतले जाते.

आपल्याकडे मात्र एकदा मिळालेले प्राध्यापक, प्राचार्यपद ताम्रपटाप्रमाणे अखेरपर्यंत मिरवता येते.

कधीतरी नव्या जुन्या Ph. D. धारक प्राध्यापक आणि प्राचार्यांना त्यांच्या प्रबंधाच्या संदर्भात विचारा. अनेकांना तर आपल्या प्रबंधांचे शीर्षक सुद्धा सांगता येणार नाही ! ही शोकांतिका आहे.

बोगस Ph. D. पदवीधारक शोधून त्यांची पदवी काढून घ्यावी. त्यांची नावे जगजाहीर करावीत.

Ph. D. पदवीप्रदानप्रक्रियेतील उपरोक्त उल्लेखित सर्व दोष निरस्त करून नव्याने ही प्रक्रिया सुस्थापित करावी व तोपर्यंत देशातील सर्व विद्यापीठांमधील सध्याची Ph. D. प्रवेश व प्रदानप्रक्रिया थांबवावी.

भ्रष्ट झालेल्या Ph. D. ला पुन्हा शिष्ट(संमत) स्थान प्राप्त करण्याची व्यवस्था निर्माण होईतो, कुणी Ph. D. धारक नाही झाला तर लगेच काही आकाश कोसळणार नाही.

एकप्रकारे ज्ञानक्षेत्राला संघटित गुन्हेगारीचे स्वरूप आले आहे व त्याला माझ्यासह मौन बाळगणारे आपण सर्व 'गुरुजन' जबाबदार आहोत, ही बाब मला माझ्या क्षेत्रातील आजी-माजी सहकाऱ्यांच्याही निदर्शनास आणून द्यावीशी वाटते.

**– लीना पांढरे (सेवानिवृत्त प्राचार्य व पीएच.डी. मार्गदर्शक)**

**रमेश सपकाळे :**

मॅडम आपण वास्तव मांडले आहे. अशा गोष्टी सर्रासपणे होत आहेत व याला कोणीही गांभीर्याने घेत नाही.

पूर्वी पीएच. डी. पदवीला एक महत्त्व दर्जा व मान होता. आता तर त्या पदवीचे अवमूल्यन होऊन तिला बी. एड.सारखी अवस्था आली आहे

काही अशा संस्था आहेत की फक्त त्यांची ठरलेली फी भरली की काहीही न करता तुम्हाला पीएच. डी. पदवी मिळू शकते. बाकी कागदोपत्री प्रक्रिया, औपचारिकता ते पूर्ण करून घेतात

संबधितांचा मान व आदर राखून सांगावेसे वाटते, महाराष्ट्रातील अनेक माजी मुख्यमंत्री, मंत्री व राजकारणी मंडळींना ही रीतसर अधिकृतपणे पीएच. डी. पदवी ( मानद नव्हे) दिली गेली आहे.

काही महिन्यांपूर्वी जळगाव जिल्ह्यातील एका प्राथमिक शिक्षकाने FB वर कॅनडातील विद्यापीठातून पीएच. डी. मिळाल्याची पोस्ट टाकली होती. आमचा परिचय असल्याने त्याला अभिनंदन करून कॅनडातील कोणत्या शहरांतील विद्यापीठ, प्रबंधाचा विषय मार्गदर्शक यांबद्दल विचारले असता त्याला काही सांगता येईना ,

आम्ही कॅनडाला जाऊन आलेलो आहोत, म्हणून त्याला अधिक विचारणा केल्यावर त्याने एक नाव सांगितले, शोध घेतला असता त्या नावाचे विद्यापीठ नसल्याचे आढळले. पदवीप्रदान समारंभही कॅनडात न होता भारतात पांडेचेरी, (पड्डूचेरी) येथे झाल्याचे कळाले.

पण अशी विचारणा केल्याने तो गृहस्थ नाराज झाला. आजही तो सभा-कार्यक्रमात डॉक्टर म्हणून भाषणे देत असतो..

तर अशा बनवेगिरी करणाऱ्या लोकांमुळे ही पीएच. डी.बद्दल लोकांमधे विश्वासार्हता राहिलेली नाही.

पण आपण म्हटल्याप्रमाणे केवळ प्राध्यापक, प्राचार्य होण्याच्या हव्यासापोटी असे प्रकार व बाजारीकरण वाढले आहे.

पूर्वी तर केवळ पदव्युत्तर पदवी असल्यावर प्राध्यापक व काही वर्षांचा अनुभव असल्यावर प्राचार्य होता येत

होते व त्या पदवीला ही महत्त्व व दर्जा होता..

आता पीएच. डी. चे इतके सोपस्कार करूनही त्यांचे महत्त्व वाटत नाही !!!

**दीपाली वारुळे :**

मौखिक परीक्षेमधे पण सिनेमातल्या निळू फुले सारखे लोक असतात का?

''बाई तुम्ही बारावी आहात का?''

''अहो सर मी B.A. आहे.''

''नाही B. A. असाल हो. पण बारावी आहात का?''

**गायत्री कुलकर्णी :**

जबरदस्त लिहिलं आहे मॅडम तुम्ही. आजकाल कोणीही उठतो आणि पीएच.डी. करतो. मुख्य म्हणजे या बोगस पीएच.डी.च्या प्रकारात अनेकांचे हात गुंतले आहेत. गाईडच्या घरी पाणी भरायलाही मागे पुढे पाहत नाहीत अनेकजण.

**नीतिन वैद्य :**

कुणीतरी आतल्या व्यक्तीनेच हे लिहिणे आवश्यक होते. आम्ही एम.फिल. प्रबंधांचे विषय हा शब्दशः चेष्टेचा विषय व्हावा सहज इतके उथळ झालेले पाहिलेत. पण तुम्ही केलेले हे पोस्टमार्टेम फारच परखड आहे.

**संजय रत्नपारखी :**

शैक्षणिक व्यवस्थेतील व्यक्तीने यावर लिहिणे आवश्यक होते. आपण ती भूमिका निभावली आहात. पीएच.डी. संशोधनाचा गुणात्मक दर्जा वाढावा, अशी शैक्षणिक व्यवस्थेची प्रामाणिक इच्छा नाही. ती असती तर आजचे भ्रष्ट आणि ओंगळ स्वरूप दिसले नसते. तुम्ही काही गुणात्मक बदलांचा आग्रह धरत आहात, हे महत्त्वाचे वाटते.

**भूषण वर्धेकर :**

जर आर्थिक लाभ होण्यासाठी एखादी गोष्ट करायला लागत असेल, तर त्या गोष्टीची बाजारपेठ आपोआप तयार होते. शिक्षणक्षेत्रात तर असे हे सर्वांत मोठे जाळे तयार करण्यात आले आहे.

**दीपक ताईकर :**

तुमचं म्हणणं कदाचित बरोबर आहे, मॅडम. पण सर्वांना एकाच तराजूत तोलू नये. अजूनही काही लोक असे आहेत की genuine पद्धतीने पीएच.डी. करतात. Elsevier, springer, willy, nature etc. सारख्या journals मध्ये शोधनिबंध प्रकाशित करतात. या जर्नल्समध्ये शोधनिबंध प्रकाशित करायला कमीत कमी ३ महिने ते एक वर्षाचा कालावधी लागतो. Ph. D. मार्गदर्शक जसा असेल, तसाच विद्यार्थी घडवतो. कुठलीही गोष्ट कंपल्सरी केली की असेच बाजारीकरण होते. UGC ने प्रमोशनकरिता शोधनिबंध कंपल्सरी केले, ज्यांना शोधनिबंध चांगल्या जर्नलमध्ये प्रकाशित करता आलं नाही, त्यांनी दुसरा मार्ग म्हणजे paid journal कडे वाटचाल केली. UGC ने एक

तर ही अट पूर्णपणे काढून टाकायला पाहिजे किंवा प्रमोशनकरिता फक्त चांगले दर्जेदार जर्नल्समध्ये प्रकाशित शोधनिबंधांना मान्यता दिली पाहिजे. आज आपण यूजीसी केअर लिस्ट बघितली तर यात सुद्धा बरेच फेक जर्नल्स आहेत. एक-दोन वर्ष हे जर्नल यूजीसी केअर लिस्टमध्ये असतात आणि नंतर निघून जातात. क्वॉलेटी मेंटेन करणं हे आपल्या हातात आहे.

**लीना पांढरे :**

Deepak Taikar सहमत. नाशिक, धुळे आणि जळगाव जिल्ह्यांतील माझी आई पहिली स्त्री Ph. D. होती. तिला कुठलाही आर्थिक लाभ त्यामुळे झाला नाही, पण संशोधनाची आवड म्हणून तिने हे केले. माझा थोरला सागर पांढरे सध्या IIT pawai मध्ये रिसर्च प्रोजेक्टवर काम करतो आहे. त्याचे FB प्रोफाइल पाहा. अत्यंत कष्टपूर्वक तो springer मधून त्याचे शोधनिबंध प्रकाशित करतो. माझे गाईड डॉ. विलास साळुंखे होते. ज्यांना इंग्लिश विषयाच्या संदर्भात कल्पना आहे, त्यांच्यासाठी यह नाम ही काफी है. आपल्याला अशा मूठभर लोकांबद्दल बोलायचं नाही. ९०% जणांची काय परिस्थिती आहे, ते इथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**हेमंत साठे :**

म्हटलं तर उघड आहे, परंतु कुणालाच दिसत नाही. तरीही तुम्ही स्वच्छ, स्पष्ट आणि सत्य लिहिलेत, याबद्दल आभार आणि अभिनंदन. फक्त याच नाही तर सर्वच क्षेत्रांत शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे. परीक्षा सोप्या होत गेल्या आहेत, सर्वांना त्यामुळे एक प्रकारचा खोटा विश्वास म्हणा किंवा लोभ म्हणा, परंतु अजून शिकायची ओढ आहे किंवा कुठल्याही पातळीवर खूपच लोक असल्याने नाइलाज झाला आहे. बरं एवढे करून त्या शिक्षणाचे करायचे काय हे कुणालाच नीट ठाऊक नाही. इतके सगळे शिकून खरे शिक्षण नोकरी, व्यवसाय, धंदा करायला लागले की मगच मिळत आहे. यातल्या जवळपास ९०% लोकांना बारावीपर्यंतचे शिक्षण नोकरी मिळण्यास पुरेसे असते. परंतु पूर्वीच्या ७० टक्क्यांपासून आता जवळपास १०० टक्क्यांपर्यंत गुण वाढले तरी उत्तीर्ण ३५ टक्क्यालाच आहे त्यामुळे उत्तीर्ण झाले तरी निरुपयोगी लोकांची संख्या प्रचंड आहे.

सूर्या व गणपती ही मुळात स्त्रीदैवते होती. देवांच्या आधी देवतांचे उल्लेख सापडतात. आद्यगणराणी निर्ऋति आहे.



# । वर्णमुद्रा पब्लिशर्स ।


**(वर्णमुद्राची अलीकडची प्रकाशित २५ पुस्तके)**

४७) ईश्वर मला गुणगुणतो दीप रागासारखा, बाबुषा कोहली, अनुवाद : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ, ३०४/- कविता
४८) शुन:शेप, वसंत आबाजी डहाके, हिंदी अनुवाद : प्रेरणा उबाळे, ३००/-कविता
४९) अर्ज मोठा नामी (पाच मुक्त नाटिका), अरविंद विश्वनाथ, २९४/- , नाटिका
५०) आदिबंधात्मक समीक्षा - डॉ. म.सु.पाटील, ४०४/- , समीक्षा
५१) इकडे सर्व ठीक आहे.काळजी नसावी - वसंत आबाजी डहाके, ४०४/-, एकांक व लघुतम नाटके
५२) सार्थ - संपादन, मनोज सुरेंद्र पाठक, ४६४/-, निबंध
५३) ते कोण लोक आहेत - पांडुरंग सुतार, ३७४/-, कविता
५४) निवडक कविता, सलील वाघ, ३५०/- , कविता
५५) लकडी पूल ते लंडन पूल - शिरीष चिंधडे, ४८४/-, प्रवासवर्णन
५६) रागविराग - वसंत केशव पाटील, ४५०/- , कविता
५७) दीर्घ - गणेश वामन कनाटे, ४४४/-, समीक्षा
५८) हृद, तुळसी परब, ४५०/-, कविता
५९) बिलामत, दिनकर दाभाडे, ५५०/-, कादंबरी
६०) झुरळ आणि इतर काहीबाही, प्रमोदकुमार अणेराव, ३२४/-, कथासंग्रह
६१) अभिजात, शैलेंद्र मेहता, ५२५/-, निबंध
६२) जगणं वाचणं, डॉ. राजेंद्र मलोसे, ४४४/-, कादंबरी
६३) हजार रक्तवर्णी सूर्य, राही डहाके, २४२/-, कविता
६४) जगावेगळी जीवने, शिरीष चिंधडे, ३२४/-, निबंध
६५) केवळ काही वाक्यं, उदयन वाजपेयी, अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार, ३०४/-, कविता
६६) तरंगत तरंगत जाऊ घरंगळत, हेमंत गोविंद जोगळेकर, २२४/- कविता
६७) अश्वत्थयुग्मांचे श्लोक, संतोष विठ्ठल घसिंग, ५७५/-, कविता
६८) दुराव्याची धूळ व्यापून, बाळकृष्ण सोनवणे, २५०/- कविता
६९) अपरंपारावरच्या कविता, रवींद्र लाखे, ३०४/-, कविता
७०) तत्त्वभान, श्रीनिवास हेमाडे, ६८०/-, निबंध
७१) गनिमी काव्याचे नमुने, विश्वास कणेकर, ३००/-, कविता

---

**मुख्य वितरक :** वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स शेगाव, जिल्हा बुलढाणा मो. : ९९२३७२४५५०
**उपवितरक :** १) पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मो. : ८६२४९७७०२९
२) मैत्री पब्लिकेशन, पुणे मो. : ९६५७२४०८२४
३) वाल्डन बुक स्टोअर, पुणे मो. : ९७६६९७५१६५
४) बुककट्टा अमरावती, मो. : ८३७८८९५९१६
**मुख्य कार्यालय :** वर्णमुद्रा पब्लिशर्स, पृथक रामकृष्ण नगर, शेगाव जिल्हा बुलडाणा ४४४ २०३
**E mail :** varnamudra.editors@gmail.com Wecsite : www.varnamudra.com Mo. : 9923724550


# अलीकडे प्रकाशित झालेली पुस्तके





२४२/– कविता




३२४/– निबंध





३०४/– कविता




२२४/– कविता



५७५/– कविता




२५०/– कविता




३०४/– कविता




६८०/– निबंध



३००/– कविता

वर्णमुद्रा इ–जर्नल नोव्हेंबर–डिसेंबर २०२३ हा अंक मालक, मुद्रक व प्रकाशक मनोज सुरेंद्र पाठक यांनी
वर्णमुद्राच्या वेबसाईटवर प्रकाशित केला असून, अंकाची मुद्रित प्रत
। पृथक । रामकृष्ण सोसायटी, एसबीआय कॉलनी, शेगाव, जिल्हा बुलढाणा – ४४४२०३ येथून केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली.
ईमेल : varnamudra.editors@gmail.com वेबसाईट : http://www.varnamudra.com/

मुख्य वितरक
वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, मोबाईल नंबर : ९९२३७२४५५०
वर्णमुद्राचे उप वितरक
पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मोबाईल नंबर : ८६२४९७७०२९
वाल्डन बुक स्टोअर, पुणे मोबाईल नंबर : ९७६६९७५१६५
मैत्री पब्लिकेशन, पुणे मोबाईल नंबर : ९६५७२४०८२४
बुककट्टा अमरावती, मोबाईल नंबर : ८३७८८९५९१६